
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २८ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २४० । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघात आदेश देऊन कामे करवून घेतली जात नाहीत. सगळ्या स्तरांवर, कार्यकर्त्यांबरोबर राहून त्यांच्या समवेत सर्व तऱ्हेची कामे करीत त्यांच्यात जो उत्साह आणि आपलेपणा निर्माण करता येतो, तो आदेश देऊन कामे करण्याने निर्माण होत नाही.

**- स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# लोकपरीक्षा दुरुस्ती विधेयकावर आज चर्चा

## दिवसभराच्या गोंधळानंतर कोंडी फुटली; विरोधक नरमले




**नवी दिल्ली, २७ जुलै**

परीक्षेतील पेपरफुट आणि संघटित स्वरुपाचे गैरप्रकार रोखण्यासाठी सरकारने सोमवारी लोकपरीक्षा (अनुचित प्रकाराला आळा घालणे) दुरुस्ती विधेयक २०२६ लोकसभेत सादर केले. लोकसभेत विरोधी पक्षांचा गदारोळ सुरु असताना विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी लोकपरीक्षा (अनुचित प्रकाराला आळा घालणे) दुरुस्ती विधेयक सादर केले. या विधेयकावर मंगळवारी सहा तास चर्चा होणार आहे.

गेल्या काही वर्षात पेपर फूट तसेच परीक्षांतील विविध प्रकारच्या अनियमिततांमुळे परीक्षा पध्दतीची पारदर्शिता, निःष्पक्षता आणि विश्वसनीयता प्रभावित झाली असल्याचे नमूद करत सरकारने म्हटले की, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी तसेच दोषींविरुध्द जलद आणि प्रभावी कारवाई करण्यासाठी यासंदर्भातील कायदा अधिक कठोर केला जाणार आहे. त्यासाठी लोकपरीक्षा (अनुचित प्रकाराला आळा घालणे) दुरुस्ती विधेयक- २०२४ मध्ये दुरुस्ती सूचवण्यात आली आहे.



माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे सोमवारी संसद परिसरात आगमन होताच भाजपा खासदारांनी त्यांचे जोरदार स्वागत केले

### लाठीहल्ल्यावर चर्चा करण्याची राज्यसभेत मागणी

विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या मुद्यावर सभागृहात तातडीने चर्चा घ्यावी, या मागणीवरुन सोमवारी राज्यसभेत गदारोळ झाला, यामुळे सभागृहाचे कामकाज आधी तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले. कामकाज सुरू होताच विरोधी पक्षांनी सभागृहाचे नियमित कामकाज स्थगित करुन पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेल्या लाठीहल्ल्याच्या मुद्यावर चर्चा सुरू करावी, अशी मागणी केली. या चर्चेला गृहमंत्री अमित शाह यांनी उत्तर द्यावे, असा सदस्यांचा आग्रह होता.

पेपर फूट प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्यासाठी जलदगती न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार या कायद्याने देशातील सर्व राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना मिळणार आहे.

आधी अशा प्रकरणात ५ वर्षाच्या शिक्षेची तसेच १ कोटी रुपये दंडाची तरतूद होती, त्यात वाढ करुन ती १० वर्षाची शिक्षा आणि १० कोटी रुपये दंडाची तरतूद या विधेयकातून करण्यात आली आहे.

**लोकसभेत पुन्हा गदारोळ, कामकाज स्थगित**

लोकसभेत आज दुसऱ्या आठवड्याच्या पहिल्या दिवशीही गदारोळ झाला. यामुळे कामकाम आधी तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

(तभा वृत्तसेवा)

### 'ताहीर हुसैनला फाशीची शिक्षा द्या'

**नवी दिल्ली, २७ जुलै**

दिल्लीमध्ये २०२० मध्ये उसळलेल्या दंगलीदरम्यान आपचा माजी नगरसेवक ताहीर हुसैन आणि इतर चार जणांनी आयबी अधिकारी अंकित शर्मा यांच्यावर अमानुषपणे हल्ला करताना पशूंची पातळी ओलांडून वर्तन केले, असे स्पष्ट करीत त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात यावी, अशी मागणी दिल्ली पोलिसांनी सोमवारी न्यायालयाकडे केली. दिल्ली पोलिसांनी हा युक्तिवाद अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रवीणसिंह यांच्यासमोर केला. दोषी व्यक्तींनी शर्मा यांचे अपहरण केले, त्यांच्यावर अमानुषपणे हल्ला केला आणि त्यानंतर त्यांची हत्या केली, असेही न्यायालयाला सांगण्यात आले.

(वृत्तसंस्था)



'स्कायरूट एरोस्पेस'चे सहसंस्थापक पवन चंदन आणि भारत डाका यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांना 'विक्रम-१'ची प्रतिकृती भेट देताना पवन चंदन

# एसआयटीत अंकेक्षकाचा समावेश करा

## सर्वोच्च न्यायालयाचे उत्तरप्रदेश सरकारला निर्देश | राम मंदिर देणगी अपहार प्रकरण

**नवी दिल्ली, २७ जुलै**

अयोध्या येथील राम मंदिरासाठी मिळालेल्या देणग्यांच्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी पोलिस महानिरीक्षक किरण एस. यांच्या नेतृत्वाखाली चार सदस्यांचे विशेष तपास पथक स्थापन केल्याची दखल सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी घेतली आणि उत्तरप्रदेश सरकारला या तपास पथकात एका न्यायवैद्यक अंकेक्षकाचा समावेश करण्याचे निर्देश दिले.

सुधारात्मक उपाययोजना कराव्या लागतील, असे नमूद करीत सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख आणि न्या. जॉयमल्या बागची, न्या. व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने, पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलली जातील, असे सष्ट केले. एसआयटीने दोन आठवड्यांत अहवाल सादर करावा, असे निर्देश न्यायालयाने दिले.



न्यायवैद्यक अंकेक्षकाला एसआयटीचा भाग बनवला जाईल, असे महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी उत्तरप्रदेश सरकारच्या बाजूने युक्तिवाद करताना न्यायालयास सांगितले. आम्ही पोलिस महानिरीक्षक किरण एस. यांच्या नेतृत्वाखाली एका विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली आहे. यात एका उपमहानिरीक्षकाचा, एका वरिष्ठ पोलिस अधीक्षकाचा आणि एका अतिरिक्त पोलिस अधीक्षकाचा समावेश आहे. २५ जुलै रोजी स्थापन करण्यात आलेल्या या पथकाने या प्रकरणाचा सुरू असलेला तपास हाती घेतला आहे, असेही त्यांनी सांगितले.

लोकांनी ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा देणगी म्हणून दिल्या आहेत, असे एका याचिकाकर्त्याच्या वतीने बाजू मांडताना ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी सांगितले. शेवटी ती रक्कम ट्रस्टपर्यंत पोहोचलेली नाही.

ट्रस्टला जी काही रक्कम मिळाली असेल, ती संकेतस्थळावर दर्शवली जावी, जेणेकरून लोकांना समजेल की त्यांचे पैसे पोहोचले आहेत. ही काही कायदेशीर वादाची किंवा खटल्याची बाब नाही, असे ते म्हणाले. एसआयटीला सर्व गोष्टींची माहिती उपलब्ध असेल आणि शिवाय, सध्या हे प्रकरण बंद केले जात नाही, असे न्यायासनाने सांगितले.

(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात घसरणीला ब्रेक

**मुंबई :** अमेरिका आणि इराणमधील लष्करी संघर्ष टळल्याने आणि कच्च्या तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणावर घट झाल्याने भारतीय शेअर बाजारात सोमवारी जोरदार खरेदी पाहायला मिळाली. सर्वच क्षेत्रांमधील समभागांना मागणी मिळाल्यामुळे गेल्या पाच सत्रांपासून सुरू



असलेल्या घसरणीच्या मालिकेला पूर्णविराम मिळाला. जागतिक स्तरावरील तणाव निवळल्याने सोमवारी सकाळी बाजाराने मजबूत सुरुवात केली. सुरुवातीलाच निफ्टीने २३,९०० चा टप्पा पार केला. दिवसभरातील बहुतांश वेळ बाजार एका ठराविक कक्षेत व्यवहार करत होता. मात्र, व्यवहाराच्या शेवटच्या तासात गुंतवणूकदारांनी तुफान खरेदी केली. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी दिवसाच्या उच्चांकी पातळीजवळ बंद झाले. व्यवहाराअखेर सेन्सेक्स ७७६.०१ अंकांची म्हणजेच १.०२ टक्क्यांची वाढ नोंदवत ७६,८३५.७८ वर स्थिरावला. तर निफ्टी २२८.५० अंकांनी म्हणजे ०.९६ टक्क्यांनी उंचावून २३,९९५.९५ वर बंद झाला. मुख्य निर्देशांकांसोबतच मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांमध्येही अनुक्रमे १ टक्का आणि १.३ टक्क्यांची वाढ दिसून आली. निफ्टीने २३,६०० च्या महत्त्वाच्या समर्थनाचा स्तर टिकवून ठेवत उत्तम पुनरागमन केले आहे. मात्र २४,००० ही पातळी निफ्टीसाठी अजूनही मोठा अडथळा ठरत आहे.

# उजनी धरण ९७.७९ टक्के भरले; ४० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग

### भीमा नदीकाठच्या नागरिकांना हाय अलर्ट

### ६५ हजार क्युसेकहून अधिक पाण्याची आवक

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२७ जुलै-**

पुणे जिल्ह्यातील भीमा नदीच्या वरच्या तसेच उजनी धरणाच्या स्थानिक पाणलोट क्षेत्रात सुरु असलेल्या पावसामुळे धरणातील पाण्याची आवक वेगाने वाढत आहे. धरणाचा उपयुक्त पाणीसाठा ९७.७९ टक्क्यांवर पोहोचला आहे. पूरनियंत्रणाच्या दृष्टीने सोमवार, दि.२७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजल्यापासून उजनी धरणाच्या सांडव्यावरुन भीमा नदीपात्रात ४० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला. दरम्यान, भीमा नदीकाठच्या नागरिकांना हाय अलर्ट देण्यात आला आहे.

सोमवारी सायंकाळी ६ वाजता करण्यात आलेल्या नोंदीनुसार उजनी धरणाची पाणीपातळी ४९६.७३० मीटर इतकी झाली आहे. धरणातील एकूण पाणीसाठा ३२८६.५४ दशलक्ष घनमीटर (११६.०५ टीएमसी) तर उपयुक्त (जिवंत)



पाणीसाठा १४८३.७३ दशलक्ष घनमीटर (५२.३९ टीएमसी) इतका आहे. जलसाठा क्षेत्र ३३३.५० चौ.कि.मी. इतके नोंदविण्यात आले आहे.

दौंड नदी मापन केंद्रावरुन उजनी धरणात ६५,०८४ क्युसेक पाण्याची आवक सुरु असून नदीची पाणीपातळी ५०१.४५० मीटर इतकी नोंदविण्यात आली आहे. वरच्या धरणांतून सुरु असलेला विसर्ग आणि पाणलोट क्षेत्रातील सततचा पाऊस यामुळे उजनी धरणातील आवक आणखी वाढण्याची शक्यता प्रशासनाने वर्तविली आहे. सीनामाढा उपसा सिंचन योजनेस २८० क्युसेक, दहीगाव उपसा सिंचन योजनेस ९० क्युसेक, भुयारी बोगद्यातून ९०० क्युसेक आणि मुख्य कालव्यातून २,४०० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे.

**आवक कायम राहिल्यास...**

धरणातील पाण्याची आवक पुढील काही तासांतही कायम राहिल्यास परिस्थितीनुसार विसर्गात आणखी वाढ करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. त्यामुळे भीमा नदीकाठच्या सर्व नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे उजनी धरण व्यवस्थापन विभागाचे कार्यकारी अभियंता सु.उ. डुंबरे यांनी सांगितले.

# 'एमपीएससी' करणार तक्रार दाखल

**मुंबई, २७ जुलै**

अन्न व औषध प्रशासन विभागातील निरीक्षक संवर्गाच्या १५४ पदांच्या भरती प्रक्रियेत प्रश्नपत्रिका फुटल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबत पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी दिली. विशेष म्हणजे, मुलाखत प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यातच आयोगाला दोन स्वतंत्र तक्रारींना सामोरे जावे लागले आहे.

मुलाखतींच्या शेवटच्या दिवशी, २२ जुलै रोजी गुणवत्ताधारक उमेदवारांची सर्वसाधारण यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. मात्र त्याआधीच, २१ जुलै रोजी गौरव पाटील या उमेदवाराशी संबंधित प्रश्नपत्रिका फुटल्याच्या संशयावरून एक तक्रार व त्यासोबतचे पुरावे आयोगाकडे दाखल झाले होते.

(वृत्तसंस्था)




# भ्रष्टाचार हा समाजाला झालेला कर्करोग

## उच्च न्यायालयाची टिप्पणी | लाचखोर पशुसंवर्धन अधिकाऱ्याचा जामीन अर्ज फेटाळला




**नागपूर, २७ जुलै**

भ्रष्टाचार हा समाजाला झालेला कर्करोग असून, अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये वारंवार सहभाग असणाऱ्या आरोपींना जामीन दिल्यास कायद्याचा धाक उरणार नाही. लाचेची मागणी करणे गंभीर गुन्हा आहे, असे निरीक्षण नोंदवीत अमरावती महानगरपालिकेच्या लाचखोर पशुसंवर्धन अधिकाऱ्याचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने फेटाळून लावला आहे. कंत्राटदाराचे देयक मंजूर करण्यासाठी तब्बल २ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप पशुसंवर्धन अधिकाऱ्यावर आहे. न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. सचिन छगनप्पा बोंद्रे असे आरोपी अधिकाऱ्याचे नाव आहे.

अमरावती महानगरपालिकेत प्रभारी पशुसंवर्धन अधिकारी म्हणून कार्यरत असताना, आरोपी सचिन बोंद्रे याने कंत्राटदार सागर अशोकराव मैदांडकर यांच्याकडून कामाचे देयक मंजूर करण्यासाठी २ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. कंत्राटदाराने याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. १० जून २०२६ रोजी केलेल्या पडताळणीदरम्यान आरोपीने २ लाख रुपयांची मागणी केल्याचे आणि तडजोडीअंती १ लाख रुपये आधी व उर्वरित १ लाख रुपये देयक मंजूर झाल्यावर देण्याचे ठरल्याचे 'व्हॉईस रेकॉर्डर'मध्ये स्पष्ट झाले. यावरून कोतवाली पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, व्हॉईस रेकॉर्डरच्या ट्रान्सक्रिप्ट आणि पंचांच्या साक्षीवरून लाचेची मागणी सिद्ध होत आहे. कायद्यानुसार प्रत्यक्ष रक्कम स्वीकारली नसली तरी केवळ लाचेची मागणी करणे हासुद्धा गंभीर गुन्हा आहे. आरोपीवर यापूर्वीही भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला होता. पहिल्या गुन्ह्यातून बोध न घेता त्याने पुन्हा तसाच गुन्हा केला आहे. भ्रष्टाचारामुळे समाजाचे आणि देशाचे अतोनात नुकसान होत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा दाखला देत न्यायालयाने स्पष्ट केले की, भ्रष्टाचाराविरुद्ध 'झीरो टॉलरन्स' धोरण ठेवणे आवश्यक आहे. तपास अजून सुरू असून, दोषारोपपत्र दाखल व्हायचे आहे. अशा परिस्थितीत आरोपीला जामीन दिल्यास तो पुराव्यांत फेरफार करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळून लावला.

**गुन्हेगारी पृष्ठभूमी असल्याने जामीन नाकारता येत नाही**

आरोपीच्या वकिलांनी असा दावा केला की, कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यामुळे त्याने ही खोटी तक्रार केली आहे. तसेच देयक मंजूर करण्याचे अधिकार आरोपीकडे नाहीत आणि केवळ गुन्हेगारी पृष्ठभूमी आहे म्हणून जामीन नाकारता येत नाही.

(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कमी गुण मिळाल्याने तरुणीची आत्महत्या

**अहिल्यानगरः** महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात तरुणीने आत्महत्या केली. तिच्या घरातून सापडलेल्या चिठ्ठीत २१ जूनच्या नीट परीक्षेत कमी गुण मिळाल्याने ती निराश झाल्याचे म्हटले आहे, असे पोलिस अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. कर्जत तालुक्यातील जलालपूर गावची रहिवासी असलेल्या अंकिता सांगळे हिने २५ जुलै रोजी तिच्या घरात गळफास घेतला. तिने नुकतीच १२वीची परीक्षा पूर्ण केली होती आणि २१ जून रोजी राष्ट्रीय पात्रता-सह-प्रवेश परीक्षा दिली होती. आम्हाला तिच्या घरातून एक सुसाईड नोट सापडली आहे. त्या चिठ्ठीत, तिने नीट परीक्षेत कमी गुण मिळाल्याने निराश झाली होती आणि त्यामुळेच हे टोकाचे पाऊल उचलले आहे, असे म्हटले असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. कर्जत पोलिस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. पेपरफुटीनंतर ३ मे रोजीची नीट-यूजी परीक्षा रद्द करण्यात आली, त्यानंतर २१ जून रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली. या फेरपरीक्षेचा निकाल १६ जुलै रोजी जाहीर झाला. ज्यामध्ये ११.२१ लाखांहून अधिक विद्यार्थी पात्र ठरले.

### ड्रोन दिसल्यानंतर शोधाशोध

**जम्मू :** अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री संशयित पाकिस्तानी ड्रोन दिसल्याच्या वृत्तानंतर, सुरक्षा दलांनी सोमवारी जम्मू आणि काश्मीरच्या सांबा आणि राजौरी जिल्ह्यांमधील आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवरील अनेक आघाडीच्या भागांमध्ये शोधमोहीम सुरू केली. सांबामधील आंतरराष्ट्रीय सीमेजवळील नंदपूर आणि राजौरीच्या नौशेरा सेक्टरमधील नियंत्रण रेषेजवळील तरकुंडी-साज येथे सतर्क लष्करी तुकड्यांना ड्रोनची हालचाल दिसून आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दोन्ही भागांवर कडक निगराणी ठेवण्यात आली होती आणि संशयित ड्रोनमधून कोणतेही अमली पदार्थ किंवा शस्त्रे टाकण्यात आली नाहीत याची खात्री करण्यासाठी, पोलीस आणि इतर सुरक्षा यंत्रणांच्या मदतीने लष्कराने पहाटे शोधमोहीम सुरू केली.

### स्फोटातील मृतांची संख्या झाली तीन

**शिवकाशीः** एका बेकायदेशीर फटाके निर्मिती कारखान्याच्या ठिकाणी सोमवारी बचावकार्य तीव्र करण्यात आले. तिथे रविवारी झालेल्या भीषण स्फोटात तीन जणांचा बळी गेला होता. नातेवाईकांनी आणखी दोन कामगार बेपत्ता असल्याची माहिती दिल्यानंतर आपत्कालीन कर्मचाऱ्यांनी ड्रोनचा वापर केला आणि एका सिंचन विहिरीतील पाणी उपसले. या जागेचे जखमी सह-मालक, आर. रामचन्द्रन, जे ६० टक्के भाजल्यामुळे २६ जुलै रोजी विरुधुनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल होते, त्यांचा सोमवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली. ०२६ जुलै रोजी झालेल्या स्फोटात त्यांचे भाऊ, आर. रामप्रकाश आणि एक अज्ञात कामगार ठार झाले होते.

# मातृत्व हा सभ्यतेचा पाया

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन
## हैदराबाद येथे दोन दिवसीय प्रबोधन बैठक संपन्न



कार्यक्रमात सहभागी डॉ. मोहनजी भागवत व इतर मान्यवर

**हैदराबाद, २७ जुलै**

मातृत्व हा सभ्यतेचा पाया आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. विश्वमांगल्य सभेद्वारे २५-२६ जुलै रोजी हैदराबादमधील युसुफगुडा येथील एनआय-एमएसएमई येथे दोन दिवसीय प्रबोधन बैठकीचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा भाग म्हणून विश्वमांगल्य सभेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी कोमाराम भीम आदिवासी भवन, हैदराबाद येथे 'युगानुकूल मातृत्व' या विषयावर आयोजित विशेष चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

हैदराबाद येथील सेवालाल बंजारा भवन येथे दोन दिवसीय 'दक्षिण भारत प्रबोधन बैठक' रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. समारोप सत्राला डॉ. मोहनजी भागवत यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी युगानुकूल मातृत्व या विषयावर मुख्य भाषण केले.

मातृत्व हाच सृष्टी, पालनपोषण आणि मानवी अस्तित्वाच्या सातत्याचा मूळ आधार आहे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले. कोणत्याही विषयावर बोलताना अनुभवापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे कोणतेही प्रमाण नाही, असे त्यांनी नमूद केले. आपली प्राचीन संस्कृती ही जगातील सर्वांत प्राचीन संस्कृतीपैकी एक असल्याने, आपल्या देशातील मातृत्वही तितकेच प्राचीन आहे. अत्यंत सखोल अनुभव असलेल्या मातांविषयी बोलण्यास सांगणे हीच मुळात आपल्यासाठी एक कसोटी होती, असे त्यांनी आपल्या खास विनोदी शैलीत सांगितले.

गेल्या अनेक शतकांपासून भारत विदेशी राजवटींखाली राहिला आहे आणि परकीय संस्कृतींच्या प्रभावामुळे केवळ आपल्या सांस्कृतिक परंपरांमध्येच नव्हे, तर आपल्या दैनंदिन जीवनशैलीतही महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. याच पृष्ठभूमीवर युगानुकूल मातृत्व या विषयावरील चर्चा सुसंगत आणि आवश्यक ठरतात, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

समाजाची विचारसरणी हळूहळू बदलत आहे आणि बदलत्या काळानुसार व परिस्थितीनुसार होणारा हा बदल स्वाभाविक आहे. तथापि, त्यांनी सावध केले की, ज्याप्रमाणे प्राचीन ग्रंथांकडे पूर्णपणे परत जाणे शक्य नाही, त्याचप्रमाणे पाश्चात्त्य संस्कृतीचे आंधळेपणाने अनुकरण करणेही इष्ट नाही, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला विश्वमांगल्य सभेचे संस्थापक जितेंद्रनाथ महाराज, राष्ट्रीय संघटन मंत्री डॉ. वृषाली जोशी, अखिल भारतीय विश्वमांगल्य सभेचे मार्गदर्शक प्रशांतजी, राष्ट्रीय अध्यक्ष नलिनी हावाडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष सूरज डामोर, स्वागत समिती अध्यक्ष भगवती बलदवा आणि सहसचिव श्रुती बोडू, गाईड व सहसचिव बोडू यांची उपस्थिती होती. तेलंगणा, आंध्रप्रदेश, गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळसारख्या दक्षिण भारतातील राज्यांमधून 'विश्वमांगल्य सभे'चे सुमारे १५० कार्यकर्ते या कार्यक्रमात सहभागी झाले होते. (वृत्तसंस्था)

### विवाह हाच कुटुंबाचा पाया

**कौटुंबिक मूल्यांच्या महत्त्वावर भाष्य करताना डॉ. मोहनजी भागवत यांनी पती आणि पत्नीच्या जबाबदाऱ्यांवर भर दिला आणि सांगितले की, विवाह हाच कुटुंबाचा पाया असतो. कौटुंबिक मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत आणि ती मूल्ये त्यागावर आधारलेली असतात, या गोष्टीवर त्यांनी विशेष जोर दिला.**

### स्त्रियांकडे सृजनशीलतेची अद्वितीय शक्ती

समाजातील सर्व व्यक्ती समान आहेत आणि स्त्री-पुरुष प्रत्येक क्षेत्रात समान आहेत, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले. स्त्रियांकडे सृजनशीलतेची अद्वितीय शक्ती असते, असेही त्यांनी अधोरेखित केले. भारतीय संस्कृतीत स्त्रियांना शक्तीचे स्वरूप मानून आदर केला जातो. त्यामुळे बदलत्या काळात स्त्रियांना दुय्यम स्थान देणे हे योग्यही नाही आणि स्वीकारार्हही नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.



पश्चिम बंगालमध्ये बिरभूम जिल्ह्यातील पुरंदरपूर येथील सरकारी शाळेतच तृणमूल काँग्रेसचे कार्यालय थाटले होते. सोमवारी स्थानिक प्रशासनाने कार्यालय हटविले. यावेळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती

### शस्त्रांची तस्करी करणारे जाळ्यात

**चंदीगड :** सीमापार शस्त्रे आणि अमली पदार्थांच्या तस्करीशी संबंधित रॅकेटमध्ये सहभाग असल्याच्या आरोपावरून पंजाब पोलिसांनी अमृतसरमध्ये चौघांना अटक केली. आरोपींकडून अत्याधुनिक .३० बोअरची पाच पिस्तुले, २ किलोहून अधिक हेरॉईन आणि अमली पदार्थांच्या व्यापारातून मिळवलेली संशयास्पद ५ लाख रुपयांची रोख जप्त करण्यात आली आहे, अशी माहिती पंजाबचे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी दिली. बिट्टू कुमार ऊर्फ भय्या, साहिब सिंग, संजीव कुमार ऊर्फ नन्नू आणि संदीप सिंग ऊर्फ सनी यांचा अटक केलेल्यांमध्ये समावेश आहे. हे आरोपी बेकायदेशीर शस्त्रे आणि अमली पदार्थांच्या सीमापार तस्करीमध्ये सहभागी होते.

## पीडित कुटुंबीयांना नोकरी देण्याच्या आदेशाला स्थगिती

### मद्रास उच्च न्यायालयाचा विजय सरकारला धक्का

**चेन्नई, २७ जुलै**

मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई न्यायालयाने सोमवारी तामिळनाडूतील करूर चेंगराचेंगरी प्रकरणात एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. चेंगराचेंगरीत प्राण गमावलेल्यांच्या कुटुंबीयांना सहानुभूतिपर सरकारी नोकऱ्या देणारे राज्य सरकारचे आदेश न्यायालयाने रद्द केले. हा आदेश पीडितांच्या कुटुंबीयांसाठीच्या पुनर्वसन पॅकेजचा एक भाग होता. या प्रकरणात दाखल जनहित याचिकांवर निकाल दिला.



मद्रास उच्च न्यायालयाने म्हटले की, सीबीआय सध्या करूर चेंगराचेंगरी प्रकरणाचा तपास करत आहे. या तपासावर सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष आहे. हे प्रकरण तपासाधीन असल्याने आणि सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली असल्याने न्यायालय या प्रकरणाच्या गुणवत्तेवर भाष्य करणार नाही. यासोबतच न्यायालयाने तामिळनाडू सरकारचे सरकारी आदेश रद्द केले.

मुख्यमंत्री विजय यांनी १० जुलैला करूरला भेट देत चेंगराचेंगरीत बाधित झालेल्या कुटुंबांसाठी पुनर्वसन कार्यक्रम सुरू केला. त्यांनी प्राण गमावलेल्या ४१ जणांच्या कुटुंबीयांमधील ३२ पात्र सदस्यांना सहानुभूतीच्या आधारावर सरकारी नोकऱ्यांची नियुक्तिपत्रे सुपूर्द केली. राज्य सरकारने प्रत्येक बाधित कुटुंबातील एका पात्र सदस्याला सरकारी नोकरी देण्याचा निर्णय घेतला होता.

**निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान**

मुख्यमंत्री विजय यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. त्यानंतर त्यांनी पीडित कुटुंबीयांना सहानुभूतीच्या आधारावर सरकारी नोकरी देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय पुनर्वसनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात होते. या निर्णयाला मद्रास उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. या जनहित याचिकांवर सुनावणी घेतल्यानंतर उच्च न्यायालयाने हा सरकारी आदेश रद्द केला. (वृत्तसंस्था)

## ऑर्केस्ट्रा परवान्यांना पूर्णविराम; राज्य सरकारचा मोठा निर्णय

### अश्लील नृत्यांवरील बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी; जुने परवानेही होणार रद्द

**नागपूर, २७ जुलै**

महाराष्ट्र सरकारने राज्यातील ऑर्केस्ट्रा परवान्यांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यापुढे महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ अंतर्गत प्रत्यक्ष संगीत सादरीकरण (ऑर्केस्ट्रा) यासाठी नवीन परवाने मंजूर केले जाणार नाहीत. तसेच यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या ऑर्केस्ट्रा परवान्यांचे नूतनीकरणही करण्यात येणार नाही. याबाबत गृह विभागाने २७ जुलै २०२६ रोजी परिपत्रक जारी केले आहे.

शासनाच्या परिपत्रकानुसार, 'महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यामधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्याबाबत व त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६' लागू झाल्यानंतर नृत्य परवान्यांमध्ये मोठी घट झाली. मात्र, या कायद्यातील निर्बंधांना बगल देण्यासाठी अनेक ठिकाणी ऑर्केस्ट्रा परवान्यांचा पर्यायी मार्ग म्हणून वापर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. ही पळवाट बंद करण्यासाठी राज्य सरकारने ऑर्केस्ट्रा आस्थापनांनाही २०१६ च्या कायद्याच्या कक्षेत आणले आहे. त्यानुसार पोलिस अधिनियमांतर्गत स्वतंत्र ऑर्केस्ट्रा परवाने देण्याची तरतूद प्रभावीपणे बंद करण्यात आली आहे. यासंदर्भातील विधेयकाला २ जुलै २०२६ रोजी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. त्यानंतर पावसाळी अधिवेशनात विधिमंडळाने ते संमत केले आणि राज्यपालांच्या मंजुरीनंतर २२ जुलै २०२६ रोजी अधिनियम क्रमांक ३६ म्हणून राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला. गृह विभागाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षकांना या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. परिणामी राज्यातील ऑर्केस्ट्रा व्यवसायावर या निर्णयाचा थेट परिणाम होणार असून, अशा आस्थापनांना नवीन कायदेशीर चौकटीचे पालन करावे लागणार आहे.

**डान्सबारच्या नावाखाली वेश्यावृत्ती**

तज्ज्ञांच्या मते, काही ठिकाणी ऑर्केस्ट्राच्या नावाखाली अश्लील नृत्य, महिलांचे लैंगिक शोषण, मानवी तस्करी आणि वेश्यावृत्तीला खतपाणी घालणाऱ्या बेकायदेशीर कारवाया सुरू असल्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येत असतात. अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारी, अमली पदार्थांचा वापर, खंडणी, अल्पवयीन मुलींचे शोषण आणि महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. सरकारने ऑर्केस्ट्रा परवान्यांवरील निर्बंधांचा निर्णय घेताना अशा गैरप्रकारांना आळा घालणे, महिलांच्या सन्मानाचे संरक्षण करणे आणि सार्वजनिक सुव्यवस्था कायम ठेवणे हा प्रमुख उद्देश असल्याचे परिपत्रकातून स्पष्ट होते. (तभा वृत्तसेवा)

## याचिकेवर उत्तर देण्यासाठी सोनिया-राहुल गांधींना मुदत

**नवी दिल्ली, २७ जुलै**

'नॅशनल हेराल्ड'शी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात काँग्रेस नेते सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्ध दाखल केलेले आरोपपत्र विचारात घेण्यास कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या नकाराला आव्हान देत ईडीने दाखल केलेल्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी या दोन्ही नेत्यांना दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी तीन आठवड्यांची मुदत दिली.

या प्रकरणी १० सप्टेंबर रोजी सुनावणी केली जाईल, असे न्या. मनोज जैन यांनी सांगितले. आम्ही आज या प्रकरणावर सुनावणी करू शकत नाही. वेळेचे बंधन असलेल्या इतर दोन प्रकरणांवर सुनावणी करायची आहे. बोर्डावर कामाचा बोजा आहे, असे न्या. मनोज जैन यांनी स्पष्ट केले. प्रतिवादींच्या वतीने उपस्थित असलेल्या वरिष्ठ वकिलांनी ईडीच्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी वेळ मागितला. (वृत्तसंस्था)

## आसाममध्ये पुराचे तांडव; ५.२४ लाखांहून अधिक लोक प्रभावित

**गुवाहाटी, २७ जुलै**

आसाममधील पूरस्थिती हळूहळू सुधारत आहे, परंतु संकट पूर्णपणे टळलेले नाही. यावर्षी राज्यात पूर आणि संबंधित घटनांमध्ये आतापर्यंत ६८ जणांचा मृत्यू झाला आहे. सोमवारपर्यंत पाच जिल्ह्यांमधील ५.२४ लाखांहून अधिक लोक पुरामुळे प्रभावित झाले होते. ७६३ गावे पाण्याखाली होती. यात सुमारे ४८,७४२ हेक्टर पिकाखालील जमिनीचे नुकसान झाले आहे.

सर्वाधिक प्रभावित जिल्ह्यांमध्ये चराईदेव, शिवसागर आणि जोरहाट यांचा समावेश आहे. चराईदेवमध्ये जवळपास १.९ लाख, शिवसागरमध्ये १.५ लाखांहून अधिक आणि जोरहाटमध्ये जवळपास १.४ लाख लोक पुरामुळे प्रभावित झाले आहेत. प्रशासनाने पूरग्रस्त भागांमध्ये मदत आणि बचावकार्य तीव्र केले आहे. चार जिल्ह्यांमध्ये ३५४ मदत शिबिरे आणि मदत वितरण केंद्रे कार्यरत असून, ३७,७२४ विस्थापित लोकांना आश्रय देण्यात आला आहे. पुरामुळे बंधारे, रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधांचेही नुकसान झाले. तसेच ८८,२४० पाळीव जनावरांना फटका बसला. लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा, तसेच पोलिसांची पथके मदत आणि बचाव कार्यात गुंतलेली आहेत.




ब्रह्मपुत्रा नदीला महापूर आला असून पुराचे पाणी अनेक गावांमध्ये घुसले आहे. मोरिगाव जिल्हा जलमय झाला असून जीव वाचविण्यासाठी सुरक्षितस्थळी जाताना खांडखट्टी गावातील नागरिक

**बाधितांचे पुनर्वसन, नुकसान भरपाई बनले आव्हान**

गत आठवड्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे परिस्थिती खूपच गंभीर होती. त्यावेळी २५ जिल्ह्यांमधील ९ लाखांहून अधिक लोकांना फटका बसला होता. तर १,८०० हून अधिक गावे पुराच्या विळख्यात होती. पाणी ओसरल्यामुळे, बाधित जिल्ह्यांची आणि लोकांची संख्या कमी झाली आहे. परंतु पुरामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करणे आणि बाधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचे आव्हान कायम आहे. पुरामुळे झालेल्या नुकसानीचा अंतिम अंदाज अद्याप उपलब्ध नाही. केंद्रीय पथके बाधित जिल्ह्यांमधील घरे, पायाभूत सुविधा आणि उपजीविकेच्या साधनांना झालेल्या नुकसानीचे मूल्यांकन करत आहेत. (वृत्तसंस्था)

# विदर्भ ते कोकण... राज्याला पडणार पावसाचा वेढा

## गोंदिया, चंद्रपूरसह घाटमाथ्याला 'ऑरेंज अलर्ट'



**मुंबई, २७ जुलै**

मुंबई वेधशाळेने राज्यातील पुढील पाच दिवसांच्या हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, विदर्भासह संपूर्ण राज्यावर पुन्हा एकदा पावसाचे ढग दाटून आले आहेत. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाचा इशारा देण्यात आला आहे. विशेषतः विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत तसेच पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर पावसाचा जोर अधिक राहणार असल्याने येथे 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी हवामानाच्या स्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

घाटमाथ्यापासून ते किनारपट्टीपर्यंत सर्वत्र पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. २७ जुलै रोजी रायगड, रत्नागिरी, सातारा आणि पुणे जिल्ह्यांच्या घाट परिसरात मुसळधार पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. तर मुंबई शहर, उपनगर, ठाणे आणि सिंधुदुर्ग या भागातही पावसाची संततधार राहणार असून येथे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच, जळगावसह मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर भागातही पुढील दोन ते तीन दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**पावसाची जोरदार बॅटिंग**

संपूर्ण राज्यासोबतच विदर्भातही पावसाचा जोर वाढणार आहे. बुलढाणा, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आजपासूनच यलो अलर्ट देण्यात आला आहे. अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला आणि वाशिमसह संपूर्ण विदर्भात पुढील चार दिवस वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. २९ जुलै हा विदर्भासाठी सर्वाधिक सतर्कतेचा दिवस असणार असून, चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदियात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असल्याने या जिल्ह्यांना 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे. (तभा वृत्तसेवा)

### चार दिवसांचा हवामान अंदाज आणि सतर्कतेचा इशारा

**२७ आणि २८ जुलैः** रायगड, रत्नागिरी, पुणे व साताऱ्याच्या घाट परिसरात ऑरेंज अलर्ट. तसेच मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, जळगाव, मराठवाडा आणि नागपूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोलीसह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत यलो अलर्ट.

**२९ आणि ३० जुलैः** विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत पावसाचा जोर वाढणार असल्याने ऑरेंज अलर्ट. नाशिक, जळगाव, मराठवाडा आणि उर्वरित विदर्भ तसेच कोकण व घाटमाथ्यावर यलो अलर्ट राहील.

### ठाकरे गटाचे शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत

**ठाणे, २७ जुलै**

अहिल्यानगर, पुणे आणि नांदेड जिल्ह्यांतील शिवसेनेचे (उबाठा) शेकडो पदाधिकारी ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सामील झाले आहेत. रविवारी रात्री एका भव्य कार्यक्रमात शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पुढाकाराने श्रीरामपूरचे उपजिल्हाप्रमुख सचिन बड्डे, नेवाशाचे उपजिल्हाप्रमुख हरिराम शेळके यांच्यासह अहिल्यानगरमधील प्रमुख नेते, तसेच राहुरी आणि अकोले येथील पदाधिकारी पक्षात सामील झाले. तर पुणे जिल्ह्यात इंदापूर तालुका प्रमुख नितीन शिंदे, जिल्हाध्यक्ष सुरेंद्र जेवरे आणि दौंड विधानसभा मतदारसंघातील अनेक स्थानिक प्रतिनिधींनी पक्ष बदलला आहे. (वृत्तसंस्था)

## झारखंडमध्ये १६ माओवादी आज येणार शरण

### रांचीमध्ये पोलिसांसमोर ठेवणार शस्त्रे

**रांची, २७ जुलै**

शिरावर १५ लाख रुपयांचे बक्षीस असलेला संतोष ऊर्फ वासुदेवसह एकूण १६ माओवादी मंगळवारी येथे पोलिसांसमोर शरणागती पत्करणार आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

१६ माओवाद्यांपैकी सहा जणांच्या शिरावर एकूण ३९ लाख रुपयांचे बक्षीस आहे. यामध्ये प्रादेशिक समितीचा एक सदस्य, विभागीय समितीचा एक सदस्य, उपविभागीय समितीचे दोन सदस्य आणि क्षेत्रीय समितीच्या दोन सदस्यांचा समावेश आहे. या गटात अनेक महिला सदस्यांचाही समावेश आहे. सीपीआयचा (माओवादी) प्रादेशिक सदस्य असलेल्या संतोषने केलेले आत्मसमर्पण ही एक मोठी कामगिरी मानली जात आहे. तो विविध जिल्ह्यांतील पोलिस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या १२८ प्रकरणांमध्ये हवा होता आणि त्याच्यावर १५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते, असे पोलिसांनी सांगितले. या प्रसंगी सीपीआयच्या (माओवादी) विभागीय समितीचा सदस्य चंदन लोहरा हा देखील शरणागती पत्करणार आहे. त्याच्यावर ७८ गुन्हे दाखल असून, त्याच्यावर १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. माओवादी सहा इन्सास रायफल्स, दोन एके-४७ आणि प्रत्येकी एक एचके-३३, यूएस कार्बाइन व एम-१६ रायफल, तसेच ३८ मॅगझिन्स आणि १,५६२ काडतुसेही पोलिसांसमोर ठेवतील. (वृत्तसंस्था)



मागील काही वर्षांमध्ये महाराष्ट्रात विविध परीक्षांचे पेपर लीक झाले. या परीक्षांसाठी गरिबांची मुले खूप परिश्रम घेतात. पण महाराष्ट्रात पैसे देऊन आणि आपल्या विचाराची लोक यंत्रणेत असावी या हेतूने पेपर लीक केले जात आहेत.

- **रोहित पवार**, आमदार, शप गट


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

मंगळवार २८ जुलै २०२६ ३


राऊतांनी मोदींची चिंता करू नये. जनता ही केवळ डायलॉगबाजीला नाही तर कामाला महत्त्व देते. हिंदुत्व सोडून काँग्रेसच्या वाटेवर गेलेले राऊत पूर्णपणे उघडे पडले असून त्यांची नौटंकी महाराष्ट्राने ओळखली आहे. ते मनकवडे नाहीत तर कवडीमोल आहेत.

-**नवनाथ बन**, प्रवक्ते, भाजपा



# हल्ले थांबल्याने चर्चेला गती

## होर्मुझमध्ये मात्र तणाव कायम



**कैरो, २७ जुलै**

मध्यस्थी करणाऱ्यांनी अमेरिका आणि इराणला पुन्हा वाटाघाटींच्या टेबलावर आणण्याच्या तसेच मध्यपूर्वेतील सर्वंकष युद्ध टाळण्याच्या प्रयत्नांत प्रगती केली आहे, अशी माहिती सोमवारी दोन प्रादेशिक अधिकाऱ्यांनी दिली. तणाव वेगाने वाढल्यानंतर आता हल्ले थांबले आहेत. सलग तीन दिवस कोणत्याही बाजूने हल्ले झाल्याचे वृत्त नाही, ज्यामुळे सुमारे दोन आठवडे चाललेल्या आणि व्यापक संघर्षाची भीती निर्माण करणाऱ्या सततच्या बॉम्बहल्ल्यांनंतर काहीसा दिलासा मिळाला आहे.

कतार आणि पाकिस्तानच्या नेतृत्वाखालील मध्यस्थ वॉशिंग्टन आणि तेहरानमधील अंतर कमी करण्याचा आणि अलिकडील हल्ल्यांमुळे धोक्यात आलेल्या अंतरिम युद्धविराम कराराचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे चर्चेच्या संवेदनशीलतेमुळे नाव न सांगण्याच्या अटीवर दोन अधिकाऱ्यांनी सांगितले.

जागतिक तेल वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या जहाजांवर इराणने हल्ले केल्यानंतर सुरू झालेल्या आणि जवळपास दोन आठवडे चाललेल्या तणावपूर्ण परिस्थितीत, इराणच्या किनारपट्टीवरील भाग व पायाभूत सुविधांना लक्ष्य केल्यानंतर अमेरिकेने आपले हल्ले थांबवले. मात्र, पेंटागॉनने याबाबत विचारलेल्या प्रश्नांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चर्चा थोडी रोखून धरत आहे, असे अमेरिकेचे संयुक्त राष्ट्रांमधील राजदूत माईक वॉल्ट्झ यांनी सांगितले. मागील काही दिवसांत, ओमान आणि इराण तसेच आमचे इतर अनेक वार्ताकार सर्वोच्च पातळीपासून ते तांत्रिक पातळीपर्यंतच्या सर्व स्तरांवर सक्रिय राहिले आहेत.

इराणच्या हल्ल्यांना हवेतच रोखणाऱ्या क्षेपणास्त्रांचा अमेरिकेजवळील साठा संपत चालला आहे, या शक्यतांचाही वॉल्ट्झ यांनी इन्कार केला. इराणच्या लष्करी प्रवक्त्याने रविवारी सरकारी दूरचित्रवाणी वाहिनीला सांगितले की, अमेरिकेने गेल्या दोन रात्रींपासून हल्ले थांबवल्यामुळे इराणनेही तसेच केले आहे. अलिकडच्या काळात इराणने अमेरिकन सैन्याला आश्रय देणाऱ्या या भागातील देशांविरुद्ध प्रतिहल्ले केले आहेत; यामध्ये जॉर्डनमधील तळावर किमान तीन आणि इराकमध्ये एका लष्करी जवानाचा मृत्यू झाला आहे.

◂ (वृत्तसंस्था)

### मध्यस्थीच्या प्रयत्नांमध्ये लक्षणीय प्रगती

प्रादेशिक अधिकाऱ्यांपैकी एकाने मध्यस्थीच्या प्रयत्नांमधील प्रगतीला लक्षणीय म्हटले आणि सांगितले की, मध्यस्थ इराण आणि ओमानसोबत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाजांच्या वाहतुकीचे व्यवस्थापन करण्यासाठी एका यंत्रणेवर काम करीत आहेत. हाच तो मुद्दा आहे ज्यामुळे हल्ले आणि प्रत्युत्तरादाखल हल्ल्यांची ताजी फेरी सुरू झाली. ■

### अमेरिकेसोबत थेट चर्चा नाही : इस्माईल बघाई



मध्यस्थ संदेश पोहोचवत आहेत. परंतु अमेरिकेसोबत कोणतीही थेट चर्चा झालेली नाही. प्रदेशातील चालू घडामोडींबाबत अमेरिकेकडून मध्यस्थ आमच्यापर्यंत संदेश पोहोचवू शकतात, मात्र सध्या अमेरिकेसोबत आमची कोणतीही चर्चा सुरू नाही, असे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी सोमवारी सांगितले. ■



'नीट' परीक्षा पेपर फुटीविरोधात पश्चिम बंगालमध्ये झालेल्या आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला होता. या हिंसाचाराचा विरोध करण्यासाठी सोमवारी कोलकाता शहरात भारतीन जनता पार्टीच्या वतीने भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली

## सेप्टिक टँकमध्ये पडून चिमुकल्याचा मृत्यू

**खंडवा, २७ जुलै**

मध्य प्रदेशातील खांडवा जिल्ह्यातील ओंकारेश्वर या तीर्थक्षेत्रात सेप्टिक टँकमध्ये पडून एका तीन वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर प्रशासनाने चौकशी सुरू केली असून निष्काळजीपणाबद्दल पालिका अधिकाऱ्याला निलंबित केले आहे, असे अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले.

महाराष्ट्रातील नागपूरचा रहिवासी असलेला पीडित मुलगा, तनुष उसरथे, २४ जुलैच्या पहाटे आपल्या कुटुंबासह ओंकारेश्वरला आला होता, असे त्यांनी सांगितले. हे कुटुंब ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात प्रार्थना करण्यासाठी आले होते. बसमधून उतरताच, तो लहान मुलगा अंधारात पुढे धावला आणि सेप्टिक टँकमध्ये पडला. ◂ (वृत्तसंस्था)

# 'सार्क'च्या पुनरुज्जीवनासाठी हालचाली

## भारताचा विरोध; पाकिस्तानला होणार फायदा

**माले/नवी दिल्ली, २७ जुलै**

दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेवरील (सार्क) वाटाघाटी पुन्हा सुरू करण्यासाठी मध्यस्थी करण्यास आम्ही तयार आहोत, असे संकेत मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांनी दिले आहे. ते म्हणाले, मालदीव सार्कसह अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचा सदस्य आहे. मालदीवसह सात संस्थापक देशांच्या पुढाकाराने सार्कची स्थापना झाली होती. सार्कमुळे दक्षिण आशियाला महत्त्वपूर्ण लाभ झाला आहे. परंतु, त्याचे उपक्रम जवळपास नऊ वर्षांपासून थांबले आहेत, असेही त्यांनी सांगितले.



सार्कच्या पुनरुज्जीवनाची मागणी करणारे मालदीवचे अध्यक्ष एकटे नाहीत. बांगलादेशातील शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यापासून त्याच्या पुनरुज्जीवनासाठी सातत्याने मागणी होत आहे. मोहम्मद युनूस यांचे अंतरिम सरकार आणि पंतप्रधान तारिक रहमान यांचे सध्याचे सरकार या दोघांनीही सार्कला पुन्हा सक्रिय केले पाहिजे, असे म्हटले आहे. मात्र, भारत या मागण्यांना प्रतिसाद देत नाही. नेपाळनेही सार्कचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी केली आहे.

पाकिस्तानला सार्कचे पुनरुज्जीवन करण्याची तीव्र इच्छा आहे. भू-राजकीय तज्ज्ञ हॅपीमॉन जेकब यांनी असा युक्तिवाद केला की, सार्कचे पुनरुज्जीवन केल्याने दिल्ली 'मजबूत' होईल. पण प्रत्यक्षात, सार्कमुळे पाकिस्तानलाच अधिक सामर्थ्य मिळेल. पाकिस्तानला भारतासोबत समान दर्जा हवा आहे आणि भारत पाकिस्तानला कोणतीही सवलत देण्याच्या मनःस्थितीत नाही. पण मोहम्मद युनूस, तारिक रहमान किंवा मोहम्मद मुइझ्झू असोत, ते सर्व पाकिस्तानच्या विचारसरणीचे समर्थक आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

### भारताच्या शेजाऱ्यांवर चीनचा डोळा

हॅपीमॉन जेकब असा युक्तिवाद करतात की, नवी दिल्लीसमोर आपल्या शेजारच्या प्रदेशाबाबत दोन विशिष्ट आव्हाने आहेत. पहिले म्हणजे, या प्रदेशात भारत जितका जास्त गुंततो, तितकाच तेथील लोकांकडून त्याला अधिक रोषाचा सामना करावा लागतो, मग तो रोष योग्य असो वा नसो. दुसरे म्हणजे, या प्रदेशातून भारत जितकी जास्त माघार घेतो, तितकेच त्याला अधिक नुकसान सोसावे लागते. परंतु भारतासाठी समस्या ही आहे की, जर त्याने आपल्या शेजारच्या देशांवर जास्त लक्ष केंद्रित केले, तर त्याचे जागतिक उद्दिष्टांवरून लक्ष विचलित होईल. दुसरीकडे, चीन भारताच्या शेजारच्या प्रदेशात आपला प्रभाव सातत्याने वाढवत आहे. या प्रदेशाबाबतचे अमेरिकेचे धोरणही भारताच्या धोरणाशी जुळत नाही. त्यामुळे, सार्क पुन्हा सुरू न करण्यासाठी भारताकडे अनेक ठोस कारणे आहेत. ■

# 'ते' चार सैनिक अधिकृत मृत्युयादीतून बाहेर

पेंटागॉनने तयार केली यादी

**वॉशिंग्टन, २७ जुलै**

इराण आणि अमेरिकेत अलिकडच्या आठवड्यांत नव्याने सुरू झालेल्या संघर्षात मृत्युमुखी पडलेल्या चार अमेरिकी सैनिकांना पेंटागॉनच्या अधिकृत मृतांच्या यादीतून बाहेर ठेवण्यात आले. परंतु, त्यांचा समावेश एका स्वतंत्र श्रेणीमध्ये करण्यात आला आहे.

हॉर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याच्या उद्देशाने ट्रम्प प्रशासनाने इराणवरील हल्ले तीव्र केले. मात्र, अनेक अमेरिकींमध्ये नाराजीचे कारण ठरलेला हा संघर्ष नेमका कसा थांबवला जाईल, याचे कोणतेही स्पष्ट संकेत दिलेले नाहीत. अशा परिस्थितीत अमेरिकन सैनिकांवर होणाऱ्या परिणामांची योग्य प्रकारे अंदाज घेण्याबाबत काही प्रश्न उपस्थित होत आहे.

◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### करणने तेजस्वीला पाण्याखाली केले प्रपोज



**मुंबई :** मॉरिशसमध्ये अभिनेता करण कुंद्राने तेजस्वी प्रकाशला पाण्याखाली प्रपोज केले. करणने यूट्यूब चॅनलवर शेअर केलेल्या ट्रॅव्हल व्लॉगमध्ये या ट्रिपची झलक दाखवली. या व्लॉगमध्ये, स्कूबा डायव्हिंग करताना करण पाण्याखाली गुडघ्यावर बसून तेजस्वीला लग्नासाठी प्रपोज करताना दिसतो आहे. न बोलता, इशारे करून करणने आपल्या प्रेमाची कबुली दिली, ज्याचे उत्तर तेजस्वीने हसून दिले. व्हिडीओमध्ये स्कूबा डायव्हिंग करताना करण आणि तेजस्वीने आधी आपल्या हातांनी हृदयाचा आकार बनवला. त्यानंतर करण पाण्याखाली गुडघ्यावर बसला आणि तेजस्वीशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. पाण्याखाली करणने न बोलता प्रेमाची कबुली दिली. यावर तेजस्वीनेही आनंदाने हसत उत्तर दिले. ■

### 'मैं वापस आऊंगा' ओटीटीवर होणार प्रदर्शित

**मुंबई :** इम्तियाज अली दिग्दर्शित 'मै वापस आऊंगा' चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. दिलजीत दोसांझ, नसीरुद्दीन शाह आणि शर्वरी यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट आता ओटीटीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटगृहांमध्ये चांगली कमाई आणि समीक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळवल्यानंतर तो हिट ठरला. विशेष म्हणजे, २०२६ मधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या हिंदी चित्रपटांच्या यादीत त्याने आठवे स्थान पटकावले. हा चित्रपट आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. 'मैं वापस आऊंगा' हा चित्रपट ७ ऑगस्टपासून नेटफ्लिक्सवर स्ट्रीम होणार आहे. भारताच्या फाळणीच्या पृष्ठभूमीवर प्रेम, विरह, आठवणी आणि मानवी नात्यांच्या भावनिक प्रवासावर आधारित हा चित्रपट प्रेक्षकांना एक हृदयस्पर्शी अनुभव देतो. ■




### 'ओ माय डॉग' प्रदर्शनाची तारीख ढकलली पुढे

**मुंबई :** 'ओ माय डॉग' चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख ढकलण्यात आली आहे. बॉक्स ऑफिसवरील मोठी टक्कर टाळण्यासाठी निर्मात्यांनी हा निर्णय घेत आहे. पंकज त्रिपाठी यांची मुख्य भूमिका असलेला आगामी कौटुंबिक चित्रपट 'ओ माय डॉग'च्या प्रदर्शनाची तारीख बदलण्यात आली आहे. सुरुवातीला ३१ जुलै रोजी चित्रपट प्रदर्शित करण्याचे नियोजन होते. मात्र, आता हा चित्रपट ७ ऑगस्ट रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दिग्दर्शक अमित राय यांच्या या चित्रपटाला केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतरही प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे मार्वल स्टुडिओच्या बहुचर्चित 'स्पायडर-मॅनः ब्रँड न्यू डे' चित्रपट आहे. हा चित्रपट ३१ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. ■



# सिएटल फूड फेस्टिव्हलमध्ये गोळीबार

**सिएटल, २७ जुलै**

सिएटलमधील 'स्पेस नीडल'च्या खाली आयोजित एका गजबजलेल्या खाद्य महोत्सवात झालेल्या गोळीबारात तीन जण ठार आणि एका लहान मुलासह अन्य चौघे जखमी झाले. या घटनेनंतर पोलिसांनी एका संशयिताला अटक केली असून, दुसऱ्याचा शोध घेत आहेत.

हे दोन संशयित एकमेकांवर गोळीबार करीत होते. त्यापैकी एक जण अद्याप फरार असला तरी, नागरिकांना त्याच्यापासून कोणताही धोका नाही, असे सिएटल पोलिस दलाचे सहाय्यक प्रमुख टायरोन डेव्हिस यांनी रविवारी रात्री घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. फरार असलेल्या संशयिताचे वर्णन पोलिसांकडे नाही. त्याला शोधण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत, असे डेव्हिस यांनी सांगितले.

गोळीबारात दोन जणांचा घटनास्थळीच, तर तिसऱ्याचा रुग्णालयात मृत्यू झाला. जखमी झालेल्या चारही जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती सिएटल अग्निशमन दलाच्या प्रवक्त्या ग्रेस नुनेझ यांनी दिली.




गोळीबारानंतर जखमी व्यक्तीला मदत करताना पोलिस कर्मचारी

शेकडो खाद्यपदार्थ आणि किरकोळ विक्रेते आणि कलाकारांना आकर्षित करणाऱ्या वार्षिक तीन-दिवसीय महोत्सवात सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास हा गोळीबार झाला. या कार्यक्रमाच्या ठिकाणी १२ पेक्षा जास्त अधिकारी सुरक्षा व्यवस्था सांभाळत होते आणि त्यातील काहींनी संशयितांपैकी एकाला गोळीबार करताना पाहिले. एका संशयिताने घटनास्थळीच शरणागती पत्करली. मात्र, दुसरा पळून गेला. सुरक्षा दलांनी परिसरात शोध घेतला. परंतु, त्यांना यश आले नाही.

पोलिस आणि आपत्कालीन पथकांचे कर्मचारी मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी सिएटल सेंटरच्या विस्तीर्ण परिसराभोवतीचा भाग रिकामा करण्यास सुरुवात केली. मित्रांसोबत एका क्रेप विक्रेत्याकडून खाद्यपदार्थ घेऊन आले, तितक्यात गोळीबार सुरू झाला, असे फेथ आदिया हंटर नावाच्या प्रत्यक्षदर्शीने सांगितले. त्यांच्या जवळच एक बंदूकधारी असल्याचे तिच्या लक्षात आले. तिने आणि इतरांनी जवळच असलेल्या 'सिएटल चिल्ड्रन्स म्युझियम'मध्ये आश्रय घेतला. ◂ (वृत्तसंस्था)

# केवळ भारताची नव्हे, ही सर्वांची लढाई

## विद्यार्थी आंदोलनात ग्रेटा थनबर्गने खुपसले नाक

**लंडन, २७ जुलै**

शिक्षण क्षेत्रातील अनियमिततेच्या मुद्यांवर कॉक्रोच पार्टीच्या नेतृत्वात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनात पर्यावरण कार्यकर्ता ग्रेटा थनबर्गने नाक खुपसले आहे. ही केवळ भारताची नव्हे, तर सर्वांची लढाई असल्याचे वक्तव्य तिने केले. या आंदोलनात जनतेच्या ताकदीचा खरा अर्थ सांगण्यात आल्याचे तिने म्हटले आहे.

स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाने (एसएफआय) लंडन येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ग्रेटा बोलत होती. विद्यार्थ्यांचा न्यायासाठीचा लढा आणि लोकशाही व स्वातंत्र्यासाठीचा व्यापक संघर्ष हा संपूर्ण जगाचा सामायिक लढा आहे. भारतीय विद्यार्थी चळवळीने आपल्या सर्वांना अभिमान वाटायला लावला आहे. निषेधासाठी एकत्र आल्यावर लोक काय साध्य करू शकतात, हे या चळवळीने दाखवून दिले आहे. तिने जनशक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवला आहे, असे ग्रेटा थनबर्ग म्हणाली. भारतीय विद्यार्थ्यांचा न्यायासाठीचा लढा आणि लोकशाही व स्वातंत्र्यासाठीचा त्यांचा संघर्ष हा जगभरातील लोकांचा सामायिक संघर्ष आहे. सर्वांनी एकत्र येऊन भारताच्या समर्थनात उभे राहिले पाहिजे, असे ती म्हणाली. ◂ (वृत्तसंस्था)



कार्यक्रमाला संबोधित करताना ग्रेटा थनबर्ग

## जानमोनी दासने मागितली माफी

**कोची, २७ जुलै**

ट्रान्सजेंडर मेकअप आर्टिस्ट आणि माजी रिॲलिटी शो स्पर्धक जानमोनी दास हिने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या वंशपरंपरेबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल जाहीरपणे माफी मागितली. वक्तव्यामुळे कोणी दुखावले गेले असेल, तर त्यांना जाहीरपणे माफी मागायची आहे. तसेच, वक्तव्य करण्यापूर्वी वस्तुस्थितीची पडताळणी करायला हवी होती, हे इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये मान्य केले. नवी दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनासंदर्भात माध्यमांच्या एका गटाशी बोलताना या सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्टने पंतप्रधान मोदींबद्दल केलेल्या अनुचित वक्तव्यांमुळे समाज माध्यमावर संताप व्यक्त झाला होता.

◂ (वृत्तसंस्था)

# भारत ठरला वैद्यकीय पर्यटनाचे केंद्र

**४.५ पटीने वाढली विदेशी रुग्णांची संख्या**

**लवकर उपलब्ध होतात डॉक्टर्स**

**नवी दिल्ली, २७ जुलै**

भारत आता केवळ स्वस्त उपचारांचे ठिकाण नाही, तर वैद्यकीय पर्यटनाचे एक मोठे जागतिक केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. २००९ मध्ये जिथे १.१२ लाख विदेशी रुग्ण उपचारांसाठी भारतात आले होते. २०२५ मध्ये ही संख्या वाढून ५.०७ लाख झाली. म्हणजेच १६ वर्षांत विदेशी रुग्णांची संख्या सुमारे ४.५ पटीने वाढली.

या वाढीचे कारण कमी खर्चात उपचार तसेच भारतात तज्ज्ञ डॉक्टर्स लवकर उपलब्ध होणे हे आहे. याशिवाय, तपासणी अहवाल त्वरित मिळणे आणि उपचाराचा खर्च आधीच निश्चित असणे हे देखील विदेशी रुग्णांना आकर्षित करत आहे. अमेरिकेत ज्या उपचारावर १५ हजार रुपये खर्च होतात, तोच उपचार भारतात एक ते दोन हजार रुपयांमध्ये शक्य आहे. नेदरलँड्समध्ये दातांच्या सामान्य उपचारावर १६ हजार रुपये जास्त लागतात, तर लखनौमध्ये हाच उपचार तीन हजार रुपयांमध्ये होतो. यामध्ये बांगलादेश, इराक, उझबेकिस्तान, सोमालिया, ओमान आणि केनियामधून मोठ्या संख्येने रुग्ण भारतात पोहोचले. भारताचे वैद्यकीय पर्यटन बाजार २०२५ मध्ये ८४ हजार कोटी रुपयांचे होते. २०३० पर्यंत ते वाढून १.५६ लाख कोटी रुपये होईल, असा अंदाज आहे.

भारताकडे वैद्यकीय पर्यटन हाताळण्यासाठी मोठी आरोग्य पायाभूत सुविधा देखील उपलब्ध आहे. देशात एकूण ६९,३६४ रुग्णालये आहेत. यापैकी ४३,४८६ खाजगी आणि २५,७७८ सरकारी रुग्णालये आहेत. १२ लाख नोंदणीकृत डॉक्टर आहेत. १,२९९ रुग्णालयांना रुग्णालये आणि आरोग्यसेवा देणाऱ्या राष्ट्रीय मान्यता मंडळाची मान्यता आहे. १७२ देशांना भारत आता ई-मेडिकल व्हिसा देत आहे. ◂ (वृत्तसंस्था)




### भारताबद्दल वाढला विश्वास

पूर्वी जे उपचारांसाठी तुर्कस्तान आणि थायलंडला जात होते ते रुग्ण देखील आता भारतात उपचारासाठी येत आहेत. याची कारणे म्हणजे तज्ञ डॉक्टर, रुग्णालयांची मान्यता आणि खर्चातील मोठा फरक ही होय. डिजिटल माध्यमांमुळे आता रुग्ण डॉक्टर, रुग्णालय आणि उपचारांच्या प्रक्रियेची माहिती आधीच मिळते. यामुळे उपचारकर्त्यांसह कुटूंबियांचा विश्वास वाढला आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# तंत्रज्ञानाला नैतिकतेचा आधार हवा...

भारतातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य स्पर्धा परीक्षा आणि विविध सार्वजनिक परीक्षांच्या पारदर्शकतेवर अवलंबून असते. 'नीट'सारख्या परीक्षांमध्ये झालेल्या पेपरफुटीच्या घटना आणि यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा अत्यंत गंभीर आणि संवेदनशील विषय बनला आहे. या समस्येचे मुळापासून उच्चाटन करण्यासाठी आणि संपूर्ण परीक्षा यंत्रणा अधिक सुरक्षित, विश्वासार्ह व पारदर्शक करण्यासाठी केंद्र सरकारने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पंतप्रधानांनी एका उच्चस्तरीय कार्यगटाची घोषणा केली असून, याचे नेतृत्व आयटी क्षेत्रातील दिग्गज आणि भारताच्या डिजिटल क्रांतीचे शिल्पकार नंदन निलेकणी यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. नंदन निलेकणी हे जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रातील अत्यंत आदरणीय नाव आहे. 'इन्फोसिस'चे सह-संस्थापक असलेल्या निलेकणी यांनी सार्वजनिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करून सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. आधार कार्ड देणाऱ्या युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांनी देशातील १३० कोटींहून अधिक नागरिकांना सुरक्षित डिजिटल ओळख मिळवून दिली. ही जगातील सर्वात मोठी बायोमेट्रिक प्रणाली. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून देशात डिजिटल पेमेंटची अभूतपूर्व क्रांती घडवून आणण्यात निलेकणी यांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा होता. आज भारत डिजिटल व्यवहारांच्या बाबतीत जगात अव्वल स्थानी आहे. ज्याप्रमाणे निलेकणी यांच्या नेतृत्वात 'आधार'द्वारे सुरक्षित डिजिटल ओळख आणि 'यूपीआय'द्वारे सुरक्षित आर्थिक व्यवहार शक्य करून दाखविले गेले, त्याच तंत्रज्ञानाच्या ताकदीचा वापर आता सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा प्रणाली उभारण्यासाठी केला जाणार आहे.

या कार्यगटाची रचना अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली असून, यामध्ये केवळ संगणक किंवा आयटी क्षेत्रातील तज्ज्ञच नव्हे, तर अंतराळ विज्ञान, सायबर सुरक्षा, उच्च शिक्षण आणि प्रशासकीय क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश आहे; जेणेकरून सर्वांगीण विचार व्हावा. पारंपरिक 'कागदी' परीक्षा पद्धतीमध्ये (पेपर बेस्ड एक्झाम्स) प्रश्नपत्रिकांच्या छपाईपासून, त्यांच्या वाहतुकीपर्यंत आणि परीक्षा केंद्रांवरील वितरणापर्यंत अनेक टप्प्यांवर मानवी हस्तक्षेप असतो. याच टप्प्यांवर गैरप्रकार किंवा पेपरफुटीचा धोका सर्वाधिक असतो. कार्यगटाकडून ही संपूर्ण साखळी मानवी हस्तक्षेपापासून पूर्णपणे मुक्त करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर होणे अपेक्षित आहे. परीक्षा केंद्रावर प्रवेश करताना विद्यार्थ्यांची आधार-आधारित बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन आणि चेहरा ओळखणारे (फेस रिकग्निशन) तंत्रज्ञान वापरले गेल्यास डमी उमेदवार परीक्षेला बसवण्याच्या प्रकारांना पूर्णपणे चाप बसेल. प्रश्नपत्रिका आधीच छापून केंद्रांवर पाठवण्याऐवजी, परीक्षेच्या काही मिनिटे आधी थेट परीक्षा केंद्रांवर अत्यंत सुरक्षित (एन्क्रिप्टेड) स्वरूपात डिजिटल पद्धतीने पाठवणे आणि त्या अनलॉक करण्यासाठी विशेष डिजिटल की चा वापर करण्याची पद्धत काही प्रगत देशांत आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रातील वर्गखोल्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर ठेवणे शक्य आहे. वर्गात कोणतीही संशयास्पद हालचाल झाल्यास ही प्रणाली तत्काळ नियंत्रण कक्षाला अलर्ट जारी करू शकते. परीक्षांचे निकाल, डिजिटल उत्तरपत्रिका आणि गुणपत्रिकांची नोंद ठेवण्यासाठी 'ब्लॉकचेन'चा वापर करण्याचा विचारही होऊ शकतो. यामुळे निकालांमध्ये फेरफार करणे किंवा बनावट गुणपत्रिका तयार करणे अशक्य होईल. जगातील अनेक विकसित देशांनी परीक्षांची सुरक्षितता आणि पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी आधीपासूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. निलेकणी कार्यगट या जागतिक मानकांचाही अभ्यास करणार आहे. अमेरिकेत अनेक राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा 'ॲडॉप्टिव्ह संगणक आधारित चाचणी' पद्धतीने घेतल्या जातात. या परीक्षा अत्यंत सुरक्षित, प्रमाणित आणि नियंत्रित चाचणी केंद्रांवरच होतात. तेथे उमेदवारांची 'पाम-वेन' (हाताच्या शिरांचे बायोमेट्रिक स्कॅनिंग) पद्धतीने ओळख पटवली जाते. चीनमधील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या 'गाओकाओ' या राष्ट्रीय प्रवेश परीक्षेत सुरक्षेची अत्यंत कठोर मानके आहेत. परीक्षा केंद्रांवर रेडिओ फ्रिक्वेन्सी सिग्नल जॅमर्स लावलेले असतात, जेणेकरून कोणतेही मोबाईल किंवा ब्लूटूथ डिव्हाईस काम करणार नाही. याशिवाय ड्रोन सर्व्हिलन्स आणि फेशियल रिकग्निशनद्वारे मॉनिटरिंग केले जाते. दक्षिण कोरियातील एका विद्यापीठ प्रवेश परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिकांची भौतिक व डिजिटल वाहतूक लष्करी दर्जाच्या सुरक्षेत केली जाते. परीक्षा सुरू असताना संपूर्ण देशातील वाहतूक आणि विमान उड्डाणांवरही नियंत्रण आणली जातात. ब्रिटन आणि सिंगापूरमध्ये डिजिटल पद्धतीने उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन केले जाते. भारतात दरवर्षी कोट्यवधी तरुण विविध स्पर्धा परीक्षा व शासकीय भरती परीक्षांना बसतात. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता नसल्यास प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे खच्चीकरण होते. नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखालील कार्यगट भविष्यातील गरजा लक्षात घेऊन अत्यंत सुरक्षित, अत्याधुनिक आणि मानवी हस्तक्षेपापासून मुक्त असा 'डिजिटल परीक्षा आराखडा' तयार करेल, अशी अपेक्षा आहे. पंतप्रधानांनी त्यांना त्याच अपेक्षेनुसार जबाबदारी दिली आहे.

यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे मानवी हस्तक्षेपाचा आणि त्यामुळे मानवी नीतिमत्तेचा. कितीही कडक कायदे केले, एआय किंवा बायोमेट्रिकसारखी प्रगत तंत्रज्ञाने आणली, तरी शेवटी ही यंत्रणा चालवणारी आणि परीक्षा देणारी माणसेच असणार. तंत्रज्ञान गैरप्रकाराचे मार्ग रोखू शकते, पण माणसाची नियत सुधारू शकत नाही. हे लक्षात घेता, तांत्रिक उपाय आणि नैतिक चारित्र्याची निर्मिती या दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी काम करणे गरजेचे आहे. परीक्षा हे आयुष्याचे अंतिम ध्येय नसून तो केवळ एक टप्पा आहे, हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे गरजेचे आहे. अपयशाला सामाजिक कलंक मानणे बंद झाले तर गैरमार्गाचा अवलंब करण्याची प्रवृत्ती आपोआप कमी होईल. पुस्तकी ज्ञान किंवा गुणांची शर्यत म्हणजे शिक्षण नव्हे, हे विद्यार्थ्यांवर बिंबवावे लागेल. जपानसारख्या देशांमध्ये प्राथमिक शिक्षणात पहिल्या काही वर्षांत इतर विषयांपेक्षा स्वच्छता, नागरिकशास्त्र, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी शिकवली जाते. या उपाययोजनांपासून शिकण्यासारखे आहे. केवळ धडे शिकवण्यापेक्षा, प्रामाणिक राहून मिळवलेल्या यशाचा गौरव करणे आणि गैरमार्गाने मिळवलेले यश शेवटी कसे विनाशकारी ठरते, याचे वास्तविक धडे विद्यार्थ्यांना द्यावे लागतील. नैतिकता ही आतून यावी लागते आणि ती प्रत्येकात नसते. त्यामुळे कायद्याचा धाक असणे आवश्यकच. तांत्रिक सुधारणांसोबतच परीक्षा गैरप्रकारात पकडल्या गेलेल्यांवर, मग तो विद्यार्थी असो, दलाल असो किंवा मोठा अधिकारी; त्यांच्यावर तातडीने आणि कठोर कारवाई झाली पाहिजे. कठोर कारवाई आणि भविष्यातील सर्व परीक्षांसाठी आजीवन बंदी यासारख्या उपायांमुळे गैरप्रकार करण्याचे प्रकार कमी होतील. शिवाय, नैतिकतेची पहिली शाळा कुटुंब ही असते. पालकच मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकतात. परिणामी मुले आणि त्यांच्यासोबत पालकही गैरमार्गाचा शोध घेऊ लागतात. पालकांनी आपल्या मुलांच्या क्षमतेचा स्वीकार करून त्यांना प्रामाणिकपणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. लक्षात ठेवायचे ते हे की, तंत्रज्ञान हे केवळ दरवाजा बंद करणारे कुलूप आहे. ते कुलूप तोडण्याची हिंमत होऊ नये, यासाठी कायदा हवा तर तशी बुद्धी होऊ नये, यासाठी नैतिकतेची भिंत उभी करावी लागेल. समाजात गैरमार्गाने मिळालेल्या यशापेक्षा प्रामाणिक अपयश अधिक सन्मानकारक असल्याची भावना दृढ होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने परीक्षा सुधारणा यशस्वी होतील. ■

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेश : राष्ट्रपतींवर राजीनाम्यासाठी दबाव

**प्रा. जयसिंग यादव**

जुलै २०२४ मधील अभूतपूर्व विद्यार्थी आंदोलनाने केवळ शेख हसीना यांचे सरकार उलथवले नाही, तर बांगलादेशच्या सत्तेची संपूर्ण रचनाच बदलली. दशकानुदशके अवामी लीगच्या प्रभावाखाली असलेली प्रशासकीय यंत्रणा, पोलिस, नोकरशाही आणि घटनात्मक संस्थांवर नव्या राजकीय व्यवस्थेची छाप उमटू लागली. अशा परिस्थितीत मोहम्मद शहाबुद्दीन यांच्यासारखे अवामी लीगच्या काळात निवडले गेलेले राष्ट्रपती सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करणारे ठरत आहेत. लंडनमध्ये असताना शहाबुद्दीन यांनी भारतात निर्वासित असलेल्या हसीना यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधल्याची चर्चा समोर आली. त्यामुळे त्यांचा राजीनामा मागितला जात आहे, पण एखाद्या राष्ट्रप्रमुखाचा राजीनामा केवळ एका फोन कॉलमुळे मागितला जात असेल, तर लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. प्रत्यक्षात हा विषय विश्वासाचा आहे. राष्ट्रपती आपल्या राजकीय भूमिकेशी पूर्णपणे सुसंगत असावेत, अशी बांगलादेशमधील नव्या सत्ताधाऱ्यांची अपेक्षा आहे. मूळ प्रश्न असा आहे, की सत्तांतरानंतर जुन्या व्यवस्थेतील कोणालाही घटनात्मक पदावर ठेवायचे की नाही?

हे केवळ बांगलादेशपुरते मर्यादित नाही. पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ आणि अनेक विकसनशील लोकशाहींमध्ये सत्तांतरानंतर अशा प्रकारचे संस्थात्मक बदल पाहायला मिळाले आहेत; मात्र त्यातून संस्थांची स्वायत्तता अनेकदा कमकुवत झाली आहे. हसीना आज देशाबाहेर असल्या, तरी त्यांची राजकीय छाया अजूनही सरलेली नाही. सलग अनेक वर्षे सत्तेत राहिल्यामुळे त्यांनी मजबूत संघटनात्मक जाळे उभे केले. प्रशासनातील अनेक अधिकारी, स्थानिक नेतृत्व आणि अवामी लीगचे कार्यकर्ते अजूनही सक्रिय आहेत. त्यामुळेच हसीना डिसेंबरमध्ये परत येण्याची शक्यता व्यक्त होताच सरकारने सावध भूमिका घेतली आहे. राष्ट्रपतींसारख्या सर्वोच्च घटनात्मक पदावर अवामी लीगच्या काळातील व्यक्ती राहणे सरकारला धोकादायक वाटत असल्याचे दिसते. बांगलादेशमध्ये राष्ट्रपतींकडे भारताप्रमाणे मर्यादित अधिकार आहेत, तरीही संकटाच्या काळात घटनात्मक प्रक्रियेचे रक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. सरकारच्या इच्छेनुसार राष्ट्रपती बदलले गेल्यास भविष्यात कोणत्याही घटनात्मक संस्थेची स्वायत्तता टिकेल का, असा प्रश्न उपस्थित होतो. बांगलादेशमधील सत्तारूढ 'बीएनपी' पक्षासमोर आज दोन मोठी आव्हाने आहेत. पहिले म्हणजे अवामी लीगचे पुनरुज्जीवन रोखणे आणि दुसरे म्हणजे स्वतःची राजकीय वैधता मजबूत करणे. यासाठी सरकार कठोर संदेश देत आहे. अवामी लीग, विद्यार्थी संघटना आणि संबंधित संस्थांवर कारवाई वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रपतींचा संभाव्य राजीनामाही या व्यापक रणनीतीचाच भाग असल्याचे अनेक विश्लेषक मानतात. सरकारला दाखवायचे आहे, की २०२४ पूर्वीची राजकीय व्यवस्था पूर्णपणे संपली असून नव्या बांगलादेशमध्ये जुन्या सत्ताकेंद्रांना स्थान नाही. दीर्घकाळ एकाच पक्षाच्या प्रभावाखाली राहिलेल्या संस्थांचे पुनर्गठन आवश्यक आहे. अन्यथा, नव्या सरकारला निष्पक्ष प्रशासन मिळणार नाही. भारतासाठी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बांगलादेशमध्ये घटनात्मक स्थैर्य टिकून राहणे.

शहाबुद्दीन यांनी राजीनामा दिला, तर सरकारच्या भूमिकेशी सुसंगत नवा राष्ट्रपती निवडला जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर घटनात्मक संस्थांवरील नव्या सत्तेचा प्रभाव अधिक मजबूत होईल, मात्र यामुळे विरोधी पक्षांचे राजकारण अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. हसीना परत आल्यास किंवा 'अवामी लीग' पक्षाने नव्याने संघटन उभे केल्यास बांगलादेशमध्ये पुन्हा मोठा राजकीय संघर्ष उभा राहू शकतो. राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांच्या संभाव्य राजीनाम्याचा अर्थ केवळ एका घटनात्मक पदाधिकाऱ्याची बदली असा नाही. लोकशाहीचा खरा कस सत्ताबदलात लागत नाही, तर सत्ताबदलानंतर विरोधकांशी आणि घटनात्मक संस्थांशी कसे वागले जाते, यात लागतो. प्रत्येक नवीन सरकारने जुनी व्यवस्था पूर्णपणे पुसून टाकण्याचा प्रयत्न केल्यास देशात स्थिर लोकशाही नव्हे, तर सततचा 'राजकीय सूडाचा चक्रव्यूह' निर्माण होईल. बांगलादेशसमोर आज नेमका हाच प्रश्न उभा आहे, नव्या युगाची सुरुवात संस्थांच्या बळकटीकरणाने होणार की संस्थांच्या राजकीय पुनर्बांधणीने? याचे उत्तरच त्या देशाच्या लोकशाहीचे भवितव्य निश्चित करेल. बांगलादेशचे राष्ट्रपती शहाबुद्दीन यांच्या राजीनाम्याची चर्चा वरकरणी केवळ घटनात्मक बदल वाटत असला, तरी त्यामागे देशातील सत्तासंघर्ष, हसीना यांचे राजकीय अस्तित्व, अवामी लीगचे पुनरुज्जीवन आणि नव्या सत्ताधाऱ्यांची असुरक्षितता अशी अनेक स्तरांची गुंतागुंत दडली आहे. त्यामुळे हा संभाव्य राजीनामा केवळ एका व्यक्तीच्या पदत्यागाचा प्रश्न नसून बांगलादेशच्या भविष्यातील राजकीय दिशेचा संकेत मानला जात आहे. मे महिन्यात उपचारासाठी लंडनला गेलेल्या शहाबुद्दीन यांनी भारतात निर्वासित जीवन जगत असलेल्या हसीना यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधला होता. नंतर ही माहिती बांगलादेशच्या गुप्तचर यंत्रणांना मिळाल्यानंतर राष्ट्रपतींनी पद सोडावे, असा अप्रत्यक्ष संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचल्याचे सांगितले जात आहे. हसीना यांनी या वर्षी डिसेंबरमध्ये बांगलादेशमध्ये परत येऊन न्यायालयासमोर शरणागती पत्करण्याचा इरादा व्यक्त केल्यानंतर देशातील राजकीय समीकरणे आणखी संवेदनशील बनली आहेत. हसीना परतण्याची शक्यता नव्या सरकारसाठी मोठे आव्हान ठरू शकते. सुरक्षा यंत्रणांच्या माहितीनुसार, अवामी लीगचे काही नेते पक्षाचे पुन्हा संघटन करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे सरकार कोणतीही संभाव्य राजकीय चळवळ सुरुवातीलाच रोखण्याच्या भूमिकेत दिसत आहे.

बांगलादेशमध्ये राष्ट्रपती हे कार्यकारी अधिकारांच्या दृष्टीने मर्यादित भूमिका बजावतात, तरीही हे पद देशाच्या घटनात्मक सातत्याचे प्रतीक आहे. शहाबुद्दीन हे जुलै २०२४ पूर्वीच्या राजकीय व्यवस्थेतील एकमेव प्रमुख घटनात्मक पदाधिकारी आहेत. म्हणूनच नव्या सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने त्यांची उपस्थिती केवळ औपचारिक नसून प्रतीकात्मक आहे. जुनी व्यवस्था पूर्णपणे संपल्याचा संदेश देण्यासाठी राष्ट्रपती बदलणे आवश्यक असल्याचे सरकारमधील काही घटकांना वाटत आहे. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारने अवामी लीगविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. पक्षाशी संबंधित विविध संघटनांविरोधातील कारवाया अधिक तीव्र करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पृष्ठभूमीवर राष्ट्रपतींचा संभाव्य राजीनामा हा सरकारचा कठोर राजकीय संदेश म्हणूनही पाहिला जात आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# शक्तिवर्धक पेय; तरुणाईला धोका

आजचा तरुण वेगवान जीवनशैलीचा प्रतिनिधी आहे. स्पर्धा, करीअर, शिक्षण, पोलिस व सैन्य भरतीची तयारी, जिममधील शरीरसौष्ठव, रात्रभर अभ्यास, ऑनलाईन गेमिंग, सोशल मीडिया आणि सतत कार्यक्षम राहण्याची मानसिकता या सगळ्यांच्या छायेत एक नवीन संस्कृती झपाट्याने वाढत आहे. ती म्हणजे शक्तिवर्धक पेय संस्कृती. पूर्वी थकवा आला की दूध, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी, उसाचा रस किंवा घरगुती पेये घेतली जात. आजही काही घरांमध्ये लहान मुलांपासून तरुणांपर्यंत हीच पेये दिली जातात. परंतु स्पर्धेत टिकण्यासाठी त्यांची जागा रंगीबेरंगी बॉटलमधील पेयांनी घेतली आहे आणि त्याची विक्री मोठ्या धडाक्यात होत आहे. महाविद्यालयीन तसेच स्पर्धा परीक्षा देणारा विद्यार्थी असो, व्यायामशाळेत जाणारा युवक, रात्री काम करणारा कर्मचारी, पोलिस भरतीची तयारी करणारा उमेदवार असो, अनेकांना वाटते की हे पेय म्हणजे यशाचे गुपित आहे. पण या क्षणिक ऊर्जेची किंमत शरीराला किती मोजावी लागते हा प्रश्न फारसा विचारात घेतला जात नाही. शक्तिवर्धक पेये ही केवळ पेये नाहीत ती अब्जावधी रुपयांची जागतिक उद्योगव्यवस्था आहे.

अनेकांना वाटते की शीतपेय आणि शक्तिवर्धक पेय सारखेच असतात. प्रत्यक्षात दोघांमध्ये महत्त्वाचा फरक आहे. शीतपेय मुख्यतः तहान भागवण्यासाठी किंवा चवीसाठी घेतले जाते तर शक्तिवर्धक पेयाचा उद्देश ऊर्जा वाढवणे किंवा सतर्कता यासाठी असतो. ही ऊर्जा प्रत्यक्ष अन्नातून मिळणारी ऊर्जा नसून केंद्रीय मज्जासंस्थेवर उत्तेजक परिणाम करणाऱ्या घटकांमुळे जाणवणारी तात्पुरती सतर्कता असते. अशा पेयांचा अतिरेक हा जोखीम वाढवणारा घटक ठरू शकतो. यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने या विषयाकडे गांभीर्याने



पाहण्याची गरज आहे. ऊर्जा विकत मिळत नाही. ती संतुलित आहार, पुरेशी झोप, नियमित व्यायाम आणि शिस्तबद्ध जीवनशैलीतून मिळते. क्षणिक उत्साह हा कायमस्वरूपी आरोग्याची हमी देत नाही. उलट योग्य माहितीअभावी त्याचा अतिरेक तरुणाईला धोक्याच्या दिशेने नेऊ शकतो. पोटात गेल्यानंतर त्यातील कॅफिन काही वेळात रक्तात शोषले जाते. त्यानंतर ते मेंदूपर्यंत पोहोचून, थकवा किंवा झोपेची भावना निर्माण करणाऱ्या रसायनाच्या कार्यात अडथळा आणते. यामुळे व्यक्तीला झोप येत नाही. उत्साह वाढल्यासारखा वाटतो. थकवा कमी झाल्याची भावना निर्माण होते. लक्ष केंद्रित झाल्यासारखे वाटते. मात्र याचा अर्थ शरीराला नवीन ऊर्जा मिळाली असा होत नाही. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट निगडित असलेल्या एका महत्त्वाच्या मुद्यावर राज्य सरकारने विधानसभेत ठोस भूमिका घेताना, शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास हानिकारक ठरणारे अन्नपदार्थ तसेच कॅफिनयुक्त पेये विकणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल अशी महत्त्वपूर्ण माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. शक्तिवर्धक पेयांवर शाळांच्या ५०० मीटर परिसरात विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान दोन बॉटल थेट सभागृहात आणून हा अत्यंत गंभीर मुद्दा उपस्थित केला. शाळा परिसरामध्ये ज्याप्रमाणे अमली पदार्थांच्या विक्रीवर कायदेशीर निर्बंध लादले जातात त्याच धर्तीवर या पेयांच्या विक्रीवरही कडक बंदी घालण्यात येईल आणि त्याचे आवश्यक आदेश प्रशासनातर्फे तातडीने जारी केले जातील असे आश्वासन देखील मंत्र्यांनी यावेळी सभागृहात दिले.

अहिल्यानगर जिल्ह्यात शक्तिवर्धक पेयांच्या अतिसेवनामुळे हृदयाचे ठोके अचानक वाढून लहान मुलांचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटना समोर आल्या. या पेयाच्या बॉटलवर लहान मुलांसाठी आणि गर्भवती महिलांसाठी हे पेय योग्य नाही असा स्पष्ट इशारा लिहिलेला असतो. तरीही शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात याची विक्री होत असल्याचे आढळले आहे. पुण्यातील दौंड येथे पोलिस भरतीसाठी एका तरुणाने शक्तिवर्धक पेये प्राशन केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जवानांच्या प्रसंगावधानाने त्याचे प्राण वाचले. भारताचे सर्व क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडविणाऱ्या तरुणांच्या या व्यसनाला कायमस्वरूपी बंदी घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने व शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक झाले आहे. ■

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# 'कामगार संघटना कायदा, १९२६'ची शतकपूर्ती

**दत्तात्रेय आंबुलकर**

ब्रिटिश राजवटीतील व तत्कालीन संदर्भातील प्रामुख्याने नमूद करण्यासारखे काही प्रमुख मुद्दे म्हणजे, त्यावेळच्या प्रचलित राष्ट्रीय-स्वातंत्र्य चळवळीचाच एक भाग म्हणून कामगार चळवळीची राष्ट्रीय संदर्भात पूरक अशी वाटचाल सुरू होती. स्वातंत्र्य चळवळी अंतर्गत स्वदेशीच्या राष्ट्रीय भावनेतूनच मुंबईच्या कापड गिरणीत हुतात्मा बाबू गेनूने बलिदान दिले होते. स्व. नारायण लोखंडे, ना. म. जोशी यांच्यासारखे प्रमुख कामगारनेते त्यावेळच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पण अग्रणी होऊन लढा देत असत. याची नोंद अर्थातच ब्रिटिश सरकारपाशी होती.

याचेच प्रतिबिंब लंडनच्या गोलमेज परिषदेदरम्यान महात्मा गांधी यांच्या ब्रिटिश पत्रकारांशी झालेल्या चर्चेतून पण दिसून आले. अहमदाबादच्या गिरणी कामगारांचा यशस्वी लढा लढून महात्मा गांधी लंडनच्या गोलमेज परिषदेसाठी गेले होते. गोलमेज परिषदेदरम्यान गांधीजींना ब्रिटिश पत्रकारांनी शासन-प्रशासन व व्यवस्थापन यंत्रणेत कामगार संघटनांचे महत्त्व काय? असा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाच्या उत्तरात म. गांधींनी दिलेले उत्तर म्हणजे, ''शासन-व्यवस्थापन या व्यवस्थेत कामगार संघटनेचे महत्त्व हे भोजनातील मिठासारखेच आहे. जेवताना जसे आपल्या अन्नात मीठ आवश्यक असते, तसेच महत्त्व व्यवस्थापन यंत्रणेत कामगार संघटनांचे आहे.'' महात्माजींच्या या उत्तराने त्यांचे स्वातंत्र्य आंदोलनाच्या दरम्यान पण कामगार आणि कामगार संघटना यांचे महत्त्व स्पष्ट तर आहेच. शिवाय, थेट लंडनहून ब्रिटिश सत्तेला नेमका संदेशपण मिळाला, हे विशेष!

याचीच परिणती १९२६च्या कामगार संघटना कायद्यामध्ये होऊन, ब्रिटिशांनी भारतीय कामगार आणि कामगार संघटनांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण दिशादर्शक कामगार कायद्याची निर्मिती करण्याचा राष्ट्रीय इतिहास घडून आला.

अशाप्रकारे १९२६ मध्ये करण्यात आलेला 'कामगार संघटना कायदा' हा देशांतर्गत औद्योगिक व कामगार क्षेत्रातील अग्रणी व पथदर्शी कायदा ठरला. याअंतर्गत व तत्कालीन स्वातंत्र्य चळवळीच्या पृष्ठभूमीवर कामगारांना औपचारिक संघटना स्वातंत्र्य प्रथमच प्रदान करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून कामगार संघटना नोंदणी प्रक्रिया व त्याचे नियम निश्चित केले गेले व त्याचे दूरगामी परिणाम नंतरच्या काळात दिसून आले. याचाच पुढचा टप्पा म्हणून भारताच्या संविधानांतर्गत स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून देशातील कामगारांना संघटना स्वातंत्र्य मूलभूत अधिकार स्वरूपात प्राप्त झाले, हे लक्षणीय आहे.

१९२६च्या कामगार संघटना कायद्याच्या मूलभूत महत्त्वाच्या तरतुदींनुसार, कामगार संघटना म्हणजे कामगार आणि व्यवस्थापन यांच्या दरम्यान परस्परसंबंध प्रस्थापित करण्यासाठी कामगारांचा एकत्र आलेला समूह आहे. यामध्ये अशाच उद्देशाने कर्मचारी ते कर्मचारी व व्यवस्थापन ते व्यवस्थापन यांच्या दरम्यानच्या परस्परसंबंधांचा पण समावेश करण्यात आला आहे.

कामगार संघटनांची नोंदणी करण्यावर या कायद्यांमध्ये मुख्य भर असल्याने कामगार संघटनेची विशिष्ट उद्योग वा आस्थापनेत कामगार संघटना म्हणून नोंदणी करण्यासाठी कमीत कमी सहा कामगारांची सदस्यसंख्या आवश्यक असते. अशी नोंदणी करण्याचे काम व अधिकार कामगार संघटना निबंधक यांना असतात. संबंधित कामगार संघटनेच्या सदस्यांनी आवश्यक सदस्यता शुल्क भरून सुरुवातीची नोंदणी करून त्याचे नवीकरण करणे आवश्यक असते. अशाप्रकारे पंजीकृत कामगार संघटनांना विशिष्ट आस्थापनेच्या संदर्भात पंजीकृतपत्र संबंधित राज्याच्या कामगार संघटना निबंधकांतर्फे प्रदान केले जाते.

अशाप्रकारे 'कामगार संघटना कायदा १९२६' अंतर्गत अंतर्गत पंजीकृत कामगार संघटनेला कायदेशीररीत्या संस्था म्हणून कामगार संघटनेचे नाव वापरता येते. संघटनेच्या वतीने पत्रव्यवहार करता येतो व कामगारांचे प्रश्न व समस्या मांडता येतात, सदस्यांकडून सदस्यता व नवीकरण शुल्क घेता येते व कामगार संघटनेच्या वतीने आवश्यक ते आर्थिक व बँकिंगविषयक व्यवहार केले जातात. पंजीकृत कामगार संघटनेचे पदाधिकारी स्वरूपात केलेल्या कारवाई वा कृत्यांच्या संदर्भात कुठल्याही दिवाणी वा फौजदारी न्यायालयात कारवाई करता येत नाही.

कामगार संघटना नोंदणी कायद्यांतर्गतच्या नियमांनुसार, कामगार संघटना निबंधकांचे पद, जबाबदारी आणि अधिकार फार महत्त्वाचे ठरतात. कामगार संघटना निबंधकांच्या अधिकार क्षेत्रात प्रामुख्याने कामगार संघटनांचे पदाधिकारीपद, प्रसंगी उद्भवणारे अंतर्गत विवाद, गरजेनुसार सदस्यत्वाची तपासणी व पडताळणी, संबंधित आस्थापना- व्यवस्थापनाचे म्हणणे व मुद्दे, आवश्यकतेनुसार चौकशी, कायद्याच्या अंमलबजावणीची खातरजमा व त्यानुरूप कामगार संघटनेची नोंदणी वा पंजीकरण, त्याचे नवीकरण व विशिष्ट परिस्थितीत पंजीकृत कामगार संघटनेचे पंजीकरण रद्द करणे इ. जबाबदारीच्या कामांचा प्रामुख्याने समावेश असतो. कामगार संघटना निबंधकांच्या निर्णयाला तथ्य व परिस्थितीनुरूप कामगार वा औद्योगिक न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. अशाप्रकारचे न्यायालयीन निर्णय सर्व संबंधितांना बंधनकारक असतात.

१९२६च्या कामगार संघटना कायद्यानंतर स्वातंत्र्य आंदोलनाच्या जोडीलाच कामगार चळवळीने पण विविध स्वरूपात आंदोलनात्मक टप्पे पाहिले. मात्र, प्रत्यक्षात उद्योग व कामगार क्षेत्रात व विशेषतः औद्योगिक संबंध क्षेत्रातील नवे कामगार कायदे व नियम स्वातंत्र्योत्तर काळातच करण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

यासंदर्भात 'मुंबई औद्योगिक संबंध कायदा', केंद्रीय स्तरावरील औद्योगिक संबंध कायदा व त्याअंतर्गतचे व्यापक नियम, राज्य स्तरावरील 'महाराष्ट्र कामगार संघटना मान्यता व अनुचित प्रथा निर्मूलन कायदा' या प्रमुख कायद्यांचा समावेश करता येतो. या आणि अशाप्रकारच्या कामगार संघटनांच्या माध्यमातून उद्योग आणि औद्योगिक संबंध क्षेत्राला दिशानिर्देश देण्याचे काम वेळोवेळी केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात करण्यात आलेल्या या नव्या कामगार कायदे व नियमांची पडताळणी आणि अंमलबजावणी यामुळे व्यवसाय क्षेत्र-उद्योग व्यवस्थापन एवढेच नव्हे, तर औद्योगिक संबंध क्षेत्राला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम झाले. या कायद्यांतर्गतच्या न्यायालयीन निवाड्यांमुळे कायद्यांतर्गत व्यवस्था पण निर्माण झालेली आहे. एवढेच नव्हे, तर कामगार संघटना कायदा व त्यातील तरतुदींमुळे स्वातंत्र्यपूर्व काळापासून व गेल्या शतकामध्ये देशांतर्गत स्थानिक, राज्य व प्रसंगी राष्ट्रीय स्तरावरील कामगारांचे, कामगारांमधून आलेले व कामगारांसाठी सातत्याने काम करणारे नेतृत्व निर्माण केले, हे या कायद्याचे योगदान अनेकार्थांनी महत्त्वपूर्ण व म्हणूनच कायमस्वरूपी प्रासंगिक ठरते. ■

(लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### गुरूचे महत्त्व

गुरुपौर्णिमा हा आषाढ शुद्ध पौर्णिमेला साजरा होणारा एक महत्वाचा सण आहे. ज्यामध्ये महर्षी वेद व्यास यांच्या जन्मोत्सवानिमित्त व आपल्या आयुष्यातील सर्व गुरूंप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. आपल्या जीवनात गुरूचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. गुरू आपल्याला योग्य आणि अयोग्य यातील फरक शिकवतात. संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य आणि आत्मिक शांतता मिळवण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक असते. गुरुपौर्णिमेला 'गुरुपूजन' करण्याची पद्धत आहे. चारही वेदांवर पहिल्यांदा भाष्य करणाऱ्या व्यास ऋषींची या दिवशी पूजा केली जाते. व्यासांनीच लोकांना वेदाचे ज्ञान दिले. ते आपले आद्यगुरू आहेत. हिंदू संस्कृतीने गुरूंना ईश्वरापेक्षाही उच्च स्थान दिले आहे, कारण गुरू साधकाला ईश्वरप्राप्तीसाठी आध्यात्मिक साधना शिकवतात, ती त्याच्याकडून करून घेतात आणि त्याला ईश्वरप्राप्तीसाठी मदत करतात. गुरू अनेक जन्मांमध्ये शिष्यांना विविध प्रकारे मार्गदर्शन करतात.

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

### गुरू अनेक, पण गुरुतत्त्व एकच



अध्यात्मात ईश्वरप्राप्ती करायची असेल तर गुरूंशिवाय पर्याय नाही. आपण कोणाला गुरू करण्यापेक्षा गुरूंनी आपल्याला शिष्य म्हणून स्वीकारावे एवढी पात्रता आपल्या अंगी असावी लागते. ईश्वर आणि गुरू एकच आहेत. गुरू म्हणजे ईश्वराचे सगुण रूप आणि ईश्वर म्हणजे गुरूंचे निर्गुण रूप. समाजातील बरेच लोक गुरुपौर्णिमा साजरी करतात. सर्वच आपापल्या गुरूंविषयी कृतज्ञता भावाने त्यांना शरण जाऊन त्यांची पूजा अर्चना करतात. परंतु हे करीत असताना गुरुतत्त्वाचे मूळ रूप लक्षात न घेता सगळ्या कृती घडत असतात. काही लोक स्वामी समर्थ महाराजांना, तर काही साईबाबांना, कोणी गोंदवलेकर महाराजांना, तर कोणी प्रल्हाद महाराजांना गुरु मानतात, तर काही भक्तराज महाराजांची भक्ती करतात. म्हणजे प्रत्येकच जण आमचे हे गुरू आहेत असे सांगत असतात. परंतु या सगळ्या संतांनी गुरुतत्त्व एकच आहे हीच शिकवण दिली.

एकदा एक भक्त गजानन महाराजांना विचारतो, ''माझा खरा गुरू कोण?''

त्यावर महाराज म्हणाले - ''गुरू शोधायचा नाही, तो जाणायचा असतो. तो तुझ्या अंतःकरणात आहे. ज्याच्या शब्दांत ब्रह्मज्ञान आहे, तोच खरा गुरू!''

एका भक्ताने अक्कलकोट स्वामी समर्थांना विचारले - ''स्वामी, मी अनेक गुरू शोधले, कुणावर श्रद्धा ठेवावी हेच कळेना.''

त्यावर स्वामी समर्थ म्हणाले - ''ज्याच्याजवळ श्रद्धा ठेवलीस, त्याच्यात मीच होतो.''

श्रीरामकृष्ण परमहंस यांनी स्वामी विवेकानंद यांच्याकडे पाहून स्पष्टपणे म्हटलं - ''हे माझे काम पुढे नेणारे व्यक्तिमत्त्व आहे. माझं तत्त्व याच्यामध्ये कार्य करेल.'' यातून स्पष्ट होते की, देह बदलतात, पण त्यांचे तत्त्व म्हणजे ईश्वरी कार्य करणारी ऊर्जा तीच असते. गुरू तत्त्व देहाच्या पलीकडचे आहे आणि ते कालातीत व सर्वव्यापक तत्त्व आहे. जसे पाण्याच्या टाकीला लहान मोठ्या बऱ्याच तोट्या असल्या, तरी प्रत्येक तोटीतून टाकीतीलच पाणी येते. त्याचप्रमाणे कोणत्याही देहधारी किंवा परब्रह्म गुरूंची उपासना केली, तरी त्यांच्यातील गुरुतत्त्व म्हणजे ईश्वरी तत्त्व एकच असते. हे लक्षात घेऊन सगळ्यांकडे सम भावाने बघून साधना केल्यास आध्यात्मिक प्रगती लवकर होते.

**माधवी पत्की**/नागपूर

## वाचक पत्रे

### क्रांतिवीर चापेकर पुलाची दुरवस्था

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या बिजलीनगरातील क्रांतिवीर चापेकर पुलाची कचऱ्याच्या साचण्याने दुरवस्था झाली आहे. बिजलीनगर चिंचवड या पुलावरील फूटपाथवर कचऱ्याचे ढीग पडलेले असून पूर्ण फूटपाथ कचऱ्यानेच वेढून गेला आहे. परिणामी पायी



चालणाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करीत जावे लागत आहे. कचरा टाकणाऱ्यांनी आता फूटपाथही सोडले नसल्याचे हे उत्तम उदाहरण आहे. पायी चालणाऱ्यांनी चालायचे तरी कसे असा प्रश्न परिसरातील नागरिक विचारत आहेत. संबंधित प्रशासनाने याची तातडीने दखल घेणे गरजेचे असून कचरा टाकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची करण्याची येथील ज्येष्ठ नागरिकांद्वारे करण्यात आली आहे. ■

**देविदास पाठक**/चिंचवड, पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कांचन गोडाळे यांच्या 'चित्रांकन' चित्रकला प्रदर्शनाचे आज उद्घाटन

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

'चित्रांकन' या आपल्या भव्य चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन उद्या (मंगळवारी) सायंकाळी ६.३० वाजता डफरीन चौकातील पू. ना. गाडगीळ अँड सन्सच्या झपूर्झा गॅलरीत होणार असूनहे प्रदर्शन २ ऑगस्टपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार असल्याची माहिती युवा चित्रकार कांचन गोडाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध हास्यसम्राट व चित्रकार प्रा . दीपक देशपांडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन गायकवाड असतील. यावेळी ज्येष्ठ चित्रकार डॉ. पद्मा देशपांडे, पू. ना. गाडगीळ अँड सन्सचे हेड सेल्स जितेंद्र जोशी तसेच डॉ. लता गोडाळे यांची प्रम ुख उपस्थिती लाभणार आहे.या प्रदर्शनात मंडला आर्टसह विविध आध्यात्मिक, पारंपरिक आणि आकर्षक कलाकृती रसिकांसाठी मांडण्यात आल्या आहेत. प्रदर्शन दररोज सकाळी ११ ते रात्री ८.३० या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे. कला रसिक, विद्यार्थी, नागरिक तसेच चित्रकला प्रेमींनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन कलाकृतींचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन चित्रकार गोडाळे यांनी केले आहे.या पत्रकार परिषदेस वर्षा निरंजन उपस्थित होत्या.

# शाहिरी कला जपली पाहिजे : चंद्रकांत फाटे

## तीन दिवसीय शाहिरी महोत्सवाला 'हुतात्मा'मध्ये जल्लोषात सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून चालत आलेली शाहिरी परंपरा सध्याच्या काळाच्या ओघात लोप पावत चाललेली आहे. वीरांचे स्फुरणगाणं म्हणजे शाहिरी कला आहे. ही कला सध्याच्या आधुनिक युगामध्ये जपणं ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे मत मोहोळचे शाहीर कै.भाई विश्वासराव फाटे यांचे चिरंजीव चंद्रकांत फाटे यांनी व्यक्त केले.



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने महाराष्ट्राच्या समृद्ध शाहिरी परंपरेचा गौरव करणाऱ्या 'शाहिरी म होत्सवा'चे आयोजन सोमवारी हुतात्मा स्मृती मंदिर येथे करण्यात आले होते. या शाहिरी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी फाटे हे बोलत होते.

यावेळी अनंत जोशी, नगरसेवक सात्विक बडवे, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व संचालनालय विभागाचे सदाशिव खैरे, प्रशांत बडवे, ज्येष्ठ साहित्यिका नसिमा पठाण आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जळगाव येथील शाहीर वेदराज कपाटे, अशोक पाटील, उमेश पाटील, जितेंद्र भांडारकर, उमेश भांडारकर, शिवाजीराव धर्मा पाटील ,योगेंद्र राऊळ , भूषण शरद पवार, बाळकृष्ण पाटील यांनी आपली शाहीरी कला सादर केली.

कार्यक्रमाचे समन्वयक अमोल धाबळे यांनी प्रास्ताविक केले. शाहिरांच्या वारसदारांकडून याची सुरुवात करण्यात आली. बुधवारपर्यंत दररोज सायंकाळी ७.०० वाजता हा महोत्सव सादर होईल. सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. शाहीर सूरज किरणसिंग राऊळ व सहकारी, शाहिरा मंगल दळवी व सहकारी तसेच शाहीर कल्याण काळे व सहकारी यांनी सादरीकरण केले. हुतात्मा स्मृती मंदिर परिसरात रांगोळी काढून शाहिरी महोत्सवाला आकर्षक करण्याचा प्रयत्न संयोजकाकडून करण्यात आला.




## श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमधील विद्यार्थ्यांची आषाढी दिंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर, श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा, श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची आषाढी एकादशी निमित्त दिंडी काढण्यात आली.

प्रशासन अधिकारी मल्हारी माने, केंद्रप्रमुख मनपा मुली कॅम्प शाळा नदाफ, विस्तार अधिकारी जमादार, कुमठे केंद्र प्रमुख सिद्राम वाघमोडे, पतसंस्थेचे चेअरमन कलप्पा फुलारी, माजी मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे, प्र.मुख्याध्यापक मा.श्री रमेश दिंडोरे, उपक्रम प्रमुख धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे , संजय पवार यांच्या हस्ते श्रींच्या पालखीचे पूजन करण्यात आले. यावेळी प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी आपल्या मार्गदर्शनात आषाढी एकादशीचे महत्त्व सांगून विठुरायांचा भक्तिभाव सांगितला.

यावेळी प्रमुख उपस्थिती प्रा. मुख्याध्यापक सचिन जाधव, संगीता हुमनाबादकर, सुधाकर कामशेट्टी, रितेश हत्तुरे, अनिलकुमार गावडे, बसवराज कोरे, भारत राऊत, सुकेशनी गंगोडा, अनिता हौदे, दत्तात्रय अगरखेड, आनंद काकडे, गुरुसिध्दप्पा पाटील, अमरनाथ कदारे, रमेश आगवणे, संतोष स्वामी, परमेश्वर चांदोडे, आकाश खराडे, गणेश कोरे, महेश चिवरे, प्रिया पसारे, प्रतीक्षा बिडवे, प्रा. लक्ष्मीकांत पनशेट्टी तसेच प्रशालेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक ,शिक्षकेतर- कर्मचारी वारकरी वेशभूषेत उपस्थित होते.



## आस्था संस्थेतर्फे गरजूंना शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

शिक्षण देऊया, भविष्य घडवूया आणि अन्नदान हेच श्रेष्ठदान या सामाजिक भावनेतून आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने शिंदे चौक येथील शिवस्मारक सभागृहात वंचित, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी कादर शेख, सभागृह नेते नरेंद्र काळे, प्राचार्य तानाजी माने, नागेश खरात, आनंद तालिकोटी, देविदास चेळेकर, योगेश कुंदूर, वसुधरा पवार, संपदा जोशी आणि रेणुका जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनानंतर १०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, कंपास, पेन, पॅड आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. कादर शेख यांनी विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत शिक्षण सोडू नये, मोठी स्वप्ने पाहून जिद्द व मेहनतीच्या बळावर ती पूर्ण करावीत, असा संदेश दिला.

प्राचार्य तानाजी माने यांनी जिद्द आणि चिकाटीचे महत्त्व सांगितले, तर नरेंद्र काळे यांनी विद्यार्थ्यांनी सुशिक्षित होऊन समाजसेवेची भावना जोपासावी, असे आवाहन केले. सूत्रसंचालन सुहास छंचुरे यांनी, तर आभार प्रा. प्रतिभा कंगळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेदांत तालिकोटी, सुरज छंचुरे, प्रशांत छंचुरे वेदांत तमशेट्टी, अथर्व कोळुरे, अथर्व शिंदे, यांनी परिश्रम घेतले.

## लायन्स क्लब ऑफ ट्विन सिटी सोलापूरचा पदग्रहण सोहळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ ट्विन सिटी सोलापूरचा पदग्रहण सोहळा झाला. मावळते अध्यक्ष लायन डॉ. कृष्णा राहुल चंडक यांच्या हस्ते घंटानाद व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. द्वितीय उपप्रांतपाल लायन मंगेश दोशी यांच्या हस्ते नऊ नवीन सदस्यांचा शपथविधी झाला. पदग्रहण अधिकारी लायन अरविंद कोणसिरसगी यांनी अध्यक्ष लायन सातलिंग शटगार, सचिव सोमशेखर भोगडे व नव्या कार्यकारिणीला पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी माजी प्रांतपाल, प्रांतीय पदाधिकारी व मान्यवरांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन लायन ममता बुगडे व डॉ. राहुल चंडक यांनी केले, तर आभार सचिव लायन सोमशेखर भोगडे यांनी मानले.


### जाहीर प्रसिद्धीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार, खालील ''क'' वर्गातील सहकारी संस्थेच्या सन २०२६-२७ ते सन २०३१-३२ साठी संचालक मंडळाच्या निवडणूक करीता तात्पुरती मतदार यादी कार्यक्रमाचे जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सहकारी संस्थेचे नांव |
|---|---|
| १ | शिवशक्ती महिला अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. सांगोला |
| २ | शोभाराणी महिला अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. सांगोला |
| ३ | श्री गणेश ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. वाकी शिवणे |
| ४ | सांगोला तालुका कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.सांगोला |
| ५ | अहिल्यादेवी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या.सांगोला |
| ६ | इंदिरा गांधी नागरी/ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. एखतपुर |

-: क वर्ग संस्था प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी कार्यक्रम :-

| अ. क्र. | तपशिल | तारीख |
|---|---|---|
| १ | निवडणूक नियम ६ (३) नूसार तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख | दि.२७/०७/२०२६ |
| २ | निवडणूक नियम ८ (१) नूसार तात्पुरत्या मतदार यादीवर आक्षेप अगर दावे तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांच्याकडे सादर करावयाची तारीख | दि.२७/०७/२०२६ ते दि.०३/०८/२०२६ |
| ३ | प्रारूप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नूसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाची तारीख | दि.०४/०८/२०२६ |
| ४ | निवडणूक नियम ८ (३) नूसार आक्षेप अगर दावे यावर तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांनी द्यावयाचा निर्णयाची तारीख | दि.१०/०८/२०२६ |
| ५ | प्रारूप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नूसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाची तारीख | दि.१०/०८/२०२६ |

उपरोक्त कार्यक्रम तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला यांचा पत्ता :-क्षत्रिय माळी वि.का.से. इमारत १ ला मजला, कचेरी रोड, सांगोला. ता. सांगोला जि .सोलापूर येथे व संबंधित संस्थेच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ.वैशाली साळवे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला**

### नावात बदल

माझे जुने नाव ज्योती नंदकुमार कासार असे होते ते आता बदलून आरती संतोष खोबरे असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. ६९३१/२०२६ दिनांक - २७/०७/२०२६

### श्री भिमाशंकर ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर.

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**फक्त सभासदांसाठी**

श्री भिमाशंकर ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर या संस्थेची ''वार्षिक सर्वसाधारण सभा'' रविवार दिनांक ०९.०८.२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता संस्थेच्या कार्यालयाजवळ कुंभारी, ता. द. सोलापूर येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्याकरिता बोलाविण्यात आली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१. मागील दिनांक १७.०८.२०२५ रोजीचा वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचुन कायम करणे.
२. सन २०२५-२६ वर्षाच्या संस्थेच्या कामकाजाबद्दलचा अहवाल, लेखापरीक्षीत ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजुर करणे.
३. सन २०२५-२०२६ सालाचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व दोषदुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.
४. कायदा नियम यास अनुसरून सन २०२५-२०२६ सालाच्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
५. सन २०२६-२०२७ सालाकरीता मा. संचालक मंडळाने तयार केलेले अंदाज पत्रक मंजूर करणे व सन २०२५-२०२६ च्या अंदाज पत्रकापेक्षा जास्त केलेल्या खर्चास मंजुरी देणे.
६. सन २०२६-२०२७ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व मानधन ठरविणे.
७. सन २०२६-२०२७ सालाकरीता अंतर्गत लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व मानधन ठरविणे.
८. संचालक व त्यांचे नातेवाईक त्यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. संस्थेच्या जागेवर कार्यालयीन इमारत बांधकामाकरिता निबंधकांची परवानगी घेण्याबाबत विचार विनिमय करणे.
१०. उपविधी क ०३ नुसार संस्थेचे कार्यक्षेत्र वाढीबाबत विचार विनिमय करणे.
११. सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांच्या रजेच्या अर्जास मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या ऐन वेळच्या विषयावर चर्चा करणे.

**स्थळ :- कुंभारी, ता. द. सोलापूर.**
**दिनांक :- २६.०७.२०२६**

**सही/-**
**संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**वसंत शंकर मणुरे**
**व्यवस्थापक**

**सभासदांना नम्र सुचना :-**
१. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. मात्र त्यावेळेस कोरमची आवश्यकता भासणार नाही.
२. सभासदांना संस्थेच्या कामकाजासंबंधी जे प्रश्न विचारावयाचे असतील ते प्रश्न संस्थेकडे दिनांक ०७.०८.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत लेखी पाठविण्याची विनंती आहे. तदनंतर येणारे प्रश्न विचारात घेतले जाणार नाहीत. संस्थेची आर्थिक पत्रके कार्यालयात पाहण्यासाठी ठेवलेली आहेत तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

### सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर

**द्वारा भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**
**ताबा नोटीस - नमूना ''Z'' नोटीस**
**म.स.सं.नियम १९६० मधील नियम १०७ (११) ड-१**
**स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा (Symbolic) घेतल्या बाबतची नोटीस**

मी खाली सही करणार मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर द्वारा भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर ज्याअर्थी मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या कलम १०१ च्या दाखल्यानुसार खालील नमूद कर्जदार / जामीनदारास नियमानुसार मागणी व जप्ती नोटीस पाठवून त्यांच्या राहत्या घरी जाऊन जंगम मालमत्तेचा निरंक पंचनामा केलेला आहे. त्यानंतर त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचा १०७ (१०) नुसार जप्ती आदेश दिलेला आहे. संस्थेकडे गहाणखत / जप्त असणारी / जप्त केलेली स्थावर मालमत्ता नियम १०७ चे (नियम ११ ड १) नुसार नमूना ''Z'' नोटीस देऊन सदरील मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसिद्वारे सावध करण्यात येते कि, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी, विक्री, गहाण-दान, टीच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नये. या उपर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांचे खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज व वसुली खर्चास कायदेशीररीत्या अधीन राहावे लागेल याची नोंद घ्यावी. त्याची खालील नमूद स्थावर मालमत्ता तिचे वर्णन खालील प्रमाणे.

| अ. क्र. | थकबाकीदाराचे/ जाबदाराचे नाव व गाव | वसुली दाखला क्र. व दिनांक | स्थावर मालमत्तेचे वर्णन | भूमापन क्र. व उपविभाग | येणेबाकी रक्कम रु. ३०/०६/२०२६ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. नारायण नरसिंग महिंद्रकर | १०१/२१७५/२०२५ | मौजे-कुंभारी ता. द. सोलापूर जि. सोलापूर | ५४४/५४५/प्लॉटअ/७५ | ११,९२,६१६/- |
| २ | श्री. बापूराव शंकर ढगे यांचे हिस्सा पुरते | १०१/४९१/२०२५ | मौजे - कसबे सोलापूर ता. सोलापूर जि. सोलापूर | १६७/१ | ४,८२,६३२/- |
| ३ | सौ. रचना सूर्यकांत वाले यांचे हिस्सा पुरते | १०१/६५९/२०२५ | मौजे - कोंडी ता. उ. सोलापूर जि. सोलापूर | ३०५/२/२/१/दक्षिणेची | ४,४५,०७०/- |
| ४ | श्री. सोहन सुनील खमीतकर हिस्सा पुरते | १०१/६६०/२०२५ | मौजे - गुरुवार पेठ ता. न.भू.का. :न.भू.अ. जि. सोलापूर | ४६५३/२/अ | १,७६,८६३/- |

ही उद्घोषणानिर्गमित झालेपासून ३० दिवसांचे आत आपली थकबाकी, त्यावरील पुढील होणारे व्याज व इतर खर्चासह थकबाकी रक्कम पतसंस्थेकडे भरणा करून त्याची रितसर पावती घेऊन तसेच कर्ज खाते बेबाक प्रमाणपत्र घ्यावे अन्यथा कायद्यातील तरतुदी प्रमाणे कारवाई केली जाईल, म्हणजेच आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा / कब्जा प्रत्यक्ष घेण्यासाठी मा. जिल्हाधिकारी साहेब तथा मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे रितसर प्रकरण दाखल करून व पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.ताबा / कब्जा घेतल्याची नमुना ''Z'' नोटीस प्रसिद्ध केली.

हि नोटीस दिली दिनांक : २८/०७/२०२६.

**सही/-**
**एन. ए. एकबोटे**
**वसुली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी**
**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर**
**द्वारा - भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

### SHRI MAHAVIR URBAN CO. OP BANK LTD., SOLAPUR

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002
PH: (0217) 2622933/44

**DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002**

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable properties. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13(2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/Mortgagors as mentioned below on their last known address to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but some notices have been returned unserved due to certain reasons, thus this public notice is being issued as follows:

| Sr. No. | Particular | Description |
|---|---|---|
| 1 | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | 1) Navkar Traders Prop: Sonali Sanjay Baldota (Borrower) R/o: 108, Balaji Colony, Solapur Road, Barshi 413401 2) Rushabh Sanjay Baldota (Guarantor) R/o: 108, Balaji Colony, Solapur Road, Barshi 413401 |
| | Loan Account No./ Type | 0060032070000006 / Cash Credit Loan |
| | Loan Amount | Rs. 38,00,000/- |
| | Details of the Security to be enforced | Non Agricultural Plot situated at Dist. Solapur, Sub-dist. and Taluka Barshi, within limits of Barshi City, having Gat No. 1410/6/A/14010/7/1364/3/2/93, (Plot No. 93) and its admeasuring area 207.05 Sq. Mt. and aakar Ru. 137.00 Paise having boundaries as follows: East - Plot No. 92, West - 9 Mtr. Road., South - Plot No. 94, North - 9 Mtr. Road. |
| | Date of NPA | 30/06/2022 |
| | Demand Notice date | 20/07/2026 |
| | Amount Due in Rs. as on 30/06/2026 | Rs. 76,63,916.39 (Rupees Seventy Six Lakh Sixty Three Thousand Nine Hundred Sixteen and Thirty Nine Paise) Plus future interest @ 14% p.a. and other expenses thereon. |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned above, calling upon them to make payment of the aggregate amount mentioned above against all the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown above. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon properties described above. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/ Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date:** 27/07/2026
**Place:** Solapur

SEAL

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# राजा मुथुपंडी रौप्यपदकाचा मानकरी

**ग्लासगो, २७ जुलै**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटातील भारोत्तोलन स्पर्धेत भारताच्या राजा मुथुपंडीने दमदार कामगिरी करत रौप्यपदक जिंकले. या यशासह त्याने देशाला तिसरे पदक मिळवून दिले आणि भारोत्तोलनातील भारताची प्रभावी कामगिरी कायम राखली.

२६ वर्षीय मुथुपंडीने 'स्नॅच' प्रकारात १२६ किलो आणि 'क्लीन अँड जर्क' प्रकारात १६० किलो असे एकूण २८६ किलो वजन उचलून दुसरे स्थान पटकावले. मलेशियाच्या अझनील बिन बिदिन मोहम्मदने एकूण २९९ किलो वजन उचलून राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा विक्रम प्रस्थापित केला आणि सुवर्ण पदक जिंकले. गोल्ड कोस्ट २०१८ आणि बर्मिंगहॅम २०२२ मधील विजयानंतरचे हे त्याचे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सलग तिसरे विजेतेपद ठरले.



भारतीय भारोत्तोलन क्षेत्रासाठी अभिमानास्पद क्षण! पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटातील वेटलिफ्टिंगमध्ये रौप्य पदक जिंकल्याबद्दल राजा मुथुपंडीचे खूप खूप अभिनंदन, असे केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये लिहिले. राजा मुथुपंडीने दमदार सुरुवात केली. त्याने 'स्नॅच' प्रकारात दुसऱ्या प्रयत्नांत १२६ किलो वजन यशस्वीरित्या उचलले. त्यानंतर 'क्लीन अँड जर्क' प्रकारातही दुसऱ्या प्रयत्नात १६० किलो वजन उचलत एकूण २८६ किलोची नोंद केली आणि रौप्यपदक निश्चित केले. २०१९ मध्ये कोपराच्या लिगामेंटला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे मुथुपंडीचे कारकीर्द धोक्यात आली होती; त्यातून सावरून त्याने केलेले पुनरागमन आणि हे पदक जिंकणे ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे.

**मुष्टियुद्ध स्पर्धेतून आदित्य प्रताप यादव बाहेर**

दुसरीकडे, पुरुषांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेतून आदित्य प्रताप यादव बाहेर पडल्यामुळे भारताच्या मुष्टियुद्ध मोहिमेला या स्पर्धेतील पहिला धक्का बसला. या भारतीय बॉक्सरला उप-उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत युगांडाच्या नूहू बाट्टेविरुद्ध ३-२ अशा निसटत्या फरकाने पराभव स्वीकारावा लागला. ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेतील मुष्टियुद्धामधील भारताचा हा पहिलाच पराभव ठरला. ◀ (वृत्तसंस्था)

# जादुमणी सिंगने जिंकली मने

## पाकिस्तानवरील विजय कारगिल युद्धातील वीरांना समर्पित



पाकिस्तानच्या खेळाडूला ठोसा मारताना जादुमणी सिंग मंडेन्गबाम

**ग्लासगो, २७ जुलै**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केल्यानंतर, भारतीय मुष्टियोद्धा जादुमणी सिंग मंडेन्गबामने पाकिस्तानच्या सुमामा रहमानवर मिळवलेला विजय कारगिल युद्धातील वीरांना समर्पित केला.

२२ वर्षीय जादुमणीने 'अंतिम-१६' च्या फेरीतील लढतीत ५-० अशा एकमताने रहमानचा पराभव करीत वर्चस्व गाजवले आणि या वजनी गटात भारताच्या पदकाच्या आशा जिवंत ठेवल्या. सामन्यानंतर जादुमणीने कारगिलमधील भारतीय वीरांना श्रद्धांजली वाहिली आणि ग्लासगोमध्ये अंतिम टप्प्यापर्यंत मजल मारण्याचा संकल्प केला. योगायोगाने, पाकिस्तानी खेळाडूवरील जादुमणीचा हा विजय २६ जुलै रोजी झाला, जो दिवस भारतात 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील अत्यंत चुरशीच्या लढतीबाबत असलेल्या अपेक्षा पूर्ण झाल्या; मात्र संपूर्ण सामन्यावर जादूमाणीचे पूर्ण वर्चस्व राहिले आणि पाचही पंचांनी एकमताने त्याला विजयी घोषित केले.

पाकिस्तानी खेळाडूला पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली होती, तर जादूमाणीने 'अंतिम-३२'च्या फेरीत स्कॉटलंडच्या ॲरॉन कलनवर ५-० अशा एकमताने विजय मिळवून आपली छाप पाडली होती.

या विजयामुळे मणिपूरच्या या बॉक्सरने स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली असून, आता मंगळवारी तो उपांत्य फेरीत स्थान मिळविण्यासाठी लढणार आहे. उपांत्यपूर्व फेरीतील विजयामुळे त्याचे किमान कांस्यपदक निश्चित होईल, कारण राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील मुष्टियुद्धामध्ये उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या दोन्ही खेळाडूंना कांस्यपदक दिले जाते. रविवारी ग्लासगो येथे विविध क्रीडा प्रकारांमध्ये भारताची यशस्वी घोडदौड सुरूच राहिली. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या मीराबाई चानूने महिलांच्या ४८ किलो वजनी गटातील भारोत्तोलन स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे सुवर्णपदक जिंकले, तर ऋषिकांत सिंगने पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले. तसेच, राजा मुथुपंडीने पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटातील भारोत्तोलन स्पर्धेत रौप्यपदक जिंकून भारताच्या पदकांच्या संख्येत भर घातली. जादूमाणीने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केल्यामुळे, या स्पर्धेत आणखी पदके जिंकण्याच्या शर्यतीत भारताचे मुष्टियुद्ध पथक अजूनही भक्कमपणे टिकून आहे. ◀ (वृत्तसंस्था)

# ज्ञानेश्वरी यादवने जिंकले रौप्यपदक

## भारताच्या पदकांची संख्या पाचवर

**ग्लासगो, २७ जुलै**

महिलांच्या ५३ किलो वजनी गटातील भारोत्तोलनाच्या अंतिम फेरीत ज्ञानेश्वरी यादवने दुसरे स्थान



ज्ञानेश्वरीच्या या कामगिरीमुळे भारताच्या एकूण पदकांची संख्या पाचवर पोहोचली आहे; यात एक सुवर्ण, तीन रौप्य आणि एका कांस्यपदकाचा समावेश आहे. भारताला आतापर्यंत मिळालेली सर्व पदके भारोत्तोलन व पॅरा-पॉवरलिफ्टिंग या क्रीडा प्रकारांमधून मिळाली आहेत. आता बिंद्याराणी देवी महिलांच्या ५८ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत सहभागी होऊन या यादीत आपले नाव जोडण्याचा प्रयत्न करेल.

# साजन प्रकाश २०० मीटर बटरफ्लायच्या अंतिम फेरीत

**ग्लासगो, २७ जुलै**

येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सोमवारी जलतरणात दोन वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या साजन प्रकाशने पुरुषांच्या २०० मीटर बटरफ्लाय प्रकाराच्या अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली.

प्राथमिक फेरीत एकूण सहाव्या क्रमांकाचा वेगवान जलतरणपटू ठरत त्याने हे स्थान निश्चित केले. त्याने १:५८.५९ सेकंदांची वेळ नोंदविली आणि 'हीट २' मध्ये स्कॉटलंडच्या डंकन स्कॉट (१:५८.२९) नंतर दुसरे स्थान मिळविले; या कामगिरीमुळे त्याला सोमवारीच होणाऱ्या आठ जणांच्या अंतिम फेरीत प्रवेश मिळाला.



ऑस्ट्रेलियाच्या हॅरिसन टर्नरने १:५६.४७ सेकंदांच्या वेळेसह पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावले, त्यानंतर न्यूझीलंडचा लुईस क्लेअरबर्ट (१:५७.३५) आणि इंग्लंडचा एडवर्ड मिल्ड्रेड (१:५७.९९) यांचा क्रमांक लागला. साजनने कॅनडाचा बेंजामिन लोवेन (१:५८.८७) आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू टेम्पल (१:५९.०६) यांच्या आधी शर्यत पूर्ण केली; हे दोघेही अंतिम फेरीतील स्पर्धकांच्या यादीत समाविष्ट आहेत. ◀ (वृत्तसंस्था)

# शालेय सुब्रतो फुटबॉल स्पर्धेत पानगल प्रशालेस विजेतेपद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**

सुब्रतो मुखर्जी शालेय फुटबॉल स्पर्धेत एम.ए.पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले.

सोलापूर महानगरपालिका व सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालया च्या वतीने वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या सामन्यात उपांत्य फेरीत त्यांनी यशोधरा प्रशालेस १-0 ने हरवून अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामन्यात पानगलने सेंट जोसेफ स्कूलला १- 0 असे नमविले. संघांचे प्राचार्य डॉ.हारुन रशीद बागबान,फर्जना नदाफ,फौजिया खरेदी, रियाज सय्यद, ईदरीस पेरमपल्ली, जाकीर शहापुरे आदींनी अभिनंदन केले. संघास क्रीडा शिक्षक नावेद मुन्शी, इकबाल दलाल, अल्ताफ सिद्दिकी व कोच नेहाल दिवान, सैफुल्ला शेख आदींचे मार्गदर्शन लाभले. **विजयी संघ :** मुजम्मिल पटेल,अब्दुल्ला पटेल, फरहान पटेल, मुजफ्फर पटेल,असद कुरेशी, आबरार कुरेशी,उमेर शेख, सुफियान बागवान,माज मुन्शी, अरहान म नियार,अरशीन मणियार, रेहान खलिफा मुस्तफा बागवान, अजमत काझी,बासित कोतकुंडे, हुमेर शेख.

# धावपटूंच्या डायटसाठी आई उतरल्या मैदानात

## एकाच दिवशी मॅरेथॉन व पाककला स्पर्धेत वैशाली गुंटूक यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**



येथील उदयोन्मुख धावपटू साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांच्या कमी पडत असलेल्या डायटसाठी त्यांच्या मातोश्री वैशाली केशव गुंटूक या स्पर्धेत उतरल्या. विशेष म्हणजे एकाच दिवशी त्या राज्य मॅरेथॉन व पाककला स्पर्धेत यशस्वी ठरल्या.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट व सोलापूर रनर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अक्कलकोट येथे झालेल्या भक्ती रन स्पर्धेत वैशाली यांनी ५ किमी धावण्याच्या शर्यतीत सहभाग नोंदवून ४१ ते ५0 वयोगटात तिसरा क्रमांक संपादिला. त्याचदिवशी दुपारच्या सत्रात आमदार दिलीपराव माने यांच्या नेतृत्वाखाली आयोजित सोलापूर किचन क्वीन या पाककलेच्या स्पर्धेतही त्यांनी उत्तेजणार्थ पारितोषिक संपादिले. एखाद्या स्त्रीला घरदार सांभाळत स्वतःच्या निरोगी स्वास्थ्यासाठीही वेळ काढता येते हे वैशाली यांनी सिद्ध केले आणि आपल्या मुलांच्या डायटसाठी स्पर्धेत भाग घेऊन रोख पारितोषिक मिळविले. एकाच दिवशी धावण्यात आणि पाककलेमध्ये पारितोषिक पटकावून स्त्री शक्तीचे उत्तम उदाहरण दाखवून दिल्याबद्दल वैशाली यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# विश्वजीत रोलर क्लबच्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २७ जुलै-**

रोलर रिले स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या विठ्ठल चषक राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेम ध्ये बार्शीच्या ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लब बार्शी (संचलित) विश्वजीत रोलर स्केटिंग क्लब १४ खेळाडूंची राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली.

पुढील महिन्यात गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत भाग घेतील. यशस्वी खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, उपाध्यक्ष व प्रशिक्षक गणेश रोडे, सचिव सविता जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

त्यांचे संस्थेच्या वतीने स्नेहल रोडे, संचिती जाधव, विश्वजीत जाधव, आदित्य माळी, यश नान्नजकर, यशराज रोडे, पृथ्वीराज जाधव या सर्व सहप्रशिक्षकांनी कौतुक केले.

**राज्य कामगिरी :** सुवर्ण : श्लोक उकरंडे, यथार्थ सारूक, आदित्य बागूल, अर्णव फल्ले, श्रीराज काळे. रौप्य : अथर्व भूजबळ, स्नेहजीत पाटील, संजीत पाटील, धैर्य घोलप, शौर्य नागशेट्टी. कांस्य : श्लोक जाधवर, आर्यन चौधरी, आरुष जाधव, आरिज बागवान.

# २ व ३ ऑगस्टला सोलापूर जिल्हा ज्युनिअर मैदानी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने रविवार, दि. २ ऑगस्ट व सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी एस.आर.पी.एफ. मैदान, विजापूर रोड, सोलापूर येथे सोलापूर जिल्हा ज्युनिअर मैदानी स्पर्धांचे आयोजन केले आहे.

या स्पर्धांमध्ये १४, १६, १८ व २0 वर्षांखालील मुला व मुलींना सहभाग घेता येणार असून शैक्षणिक संस्था, क्रीडा मंडळे, स्पोर्ट्स क्लब तसेच वैयक्तिक खेळाडूही सहभागी होऊ शकतात. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी वयाचा पुरावा म्हणून ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा महानगरपालिकेचा जन्म दाखला अथवा इयत्ता दहावीचे बोर्ड प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका रविवारी सकाळी ८:00 वाजल्यापासून स्पर्धा स्थळी स्वीकारण्यात येणार आहेत. या जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड आगामी महाराष्ट्र राज्य ज्युनिअर मैदानी ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी (दि. २७ ते ३0 ऑगस्ट, श्री विठ्ठलरावजी चॅरिटेबल ट्रस्ट, डेरवण, जि. रत्नागिरी) केली जाणार आहे. आधिक माहितीसाठी जिल्हा संघटनेचे सचिव राजू प्याटी (मो. ९३२६0५५९४0) यांच्याशी संपर्क साधावा.

# 'लिटल चॅम्प' क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस समारंभ उत्साहात

## सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचा उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने यंदापासून सुरू करण्यात आलेल्या १२ वर्षांखालील मुलांच्या 'लिटल चॅम्प' क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ इंदिरा गांधी पार्क स्टेडियम येथे अत्यंत उत्साहात पार पडला.

पारितोषिके सेवानिवृत्त एसीपी दीपक आर्वे, डॉ. अतुल कुलकर्णी, डॉ. सुमित मोरे व मनोज भागवत यांच्या हस्ते देण्यात आली. सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन रणजीतसिंह मोहिते-पाटील, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे व सचिव खासदार धैर्यशील भैया मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित केली होती.

**दिवंगत खेळाडूंना आदरांजली व १४ विशेष संघ**

या स्पर्धेत एकूण २00 खेळाडूंनी सहभाग नोंदवला. त्यांचे प्रत्येकी १४ संघ तयार करून, सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनसाठी भरीव



कामगिरी केलेल्या दिवंगत खेळाडूंची नावे देऊन त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यात उमेश दास्ताने, खुद्दूस खान, सलिम खान, श्रीनिवास शिवाल, चंदू खांडिलकर, वासू मुदलियार, चंदू पवार, सातोस्कर बंधू , फैज कादरी, रामभाऊ देगांवकर, कादर विजापूरे, अंबादास पवार, हेमंत हबीब आणि डॉ. देशपांडे या दिवंगत खेळाडूंच्या नावांवरून संघांचे नामकरण करण्यात आले होते.

ही स्पर्धा जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानात पार पडली असून, स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निवड समितीचे चेअरमन अनिल सामानी, योगेश कौंपल, राजेश येमुल, मुस्ताक खैरटकर, आनंद शेलार, सुनील शिंदे, निलेश गायकवाड, सचिव श्री. चंद्रकांत रेम्बर्सू आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सुनील मालप यांनी केले.स्पर्धेचा आढावा राजेंद्र गोटे यांनी घेतला तर संतोष बडवे यांनी आभार मानले.

**खेळाडूंना मार्गदर्शन**

*श्री. दीपक आर्वे यांनी विद्यार्थ्यांना खेळाडू वृत्ती कशी जोपासावी याविषयी मार्गदर्शन केले.

*डॉ. अतुल कुलकर्णी यांनी मुलांना क्रिकेटचा आनंद लुटत उत्तम खेळ खेळण्याचे आवाहन केले.

* डॉ. सुमित मोरे यांनी लहान वयात मिळालेल्या या संधीचा फायदा घेऊन खेळात प्राविण्य मिळवण्याचा सल्ला दिला.



# अजिंक्यतारा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने सोलापुरात हँडबॉल दिन साजरा

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

सोलापुरातील सोलापूर शहर व जिल्हा हँडबॉल असोसिएशन व अजिंक्यतारा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमानाने संघटनेच्या मैदानावर हँडबॉल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेच्या सर्व माजी खेळाडूंना मान देण्यात आला. त्याचबरोबर या कार्यक्रमास हँडबॉल संघटनेच्या मैदानावरील सर्व आजी-माजी खेळाडू उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. डॉ. शरण वांगी, समीर शेख, सिद्धेश्वर कोंणदे,गिरीश कुलकर्णी, अंबादास गड्डम, आप्पा बंगाळे,आकाश अमदिपूर, संगमेश हिरेमठ, श्रेयश मालप, व इतर सर्व खेळाडू उपस्थित होते. तर संघटनेचे सचिव श्री सुदेश मालप वरिष्ठ मार्गदर्शक डॉ. आनंद चव्हाण यांनी खेळाडूंना हँडबॉल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## महत्वाचे...

### ॲड. पांडुरंग घोलप यांची युवासेना ग्रामीण जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती

**बार्शी, दि. २७ जुलै -**



शिवसेना (उबाठा) चे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, युवासेना सचिव वरुण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. पांडुरंग घोलप यांची युवासेना सोलापूर ग्रामीण (मोहोळ-बार्शी) जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती केली आहे. ॲड. पांडुरंग घोलप हे अनेक वर्षांपासून जिल्ह्यात युवासेना व विद्यार्थी सेनेच्या माध्यमातून संघटनात्मक काम करत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडविणे, शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर पाठपुरावा अशा अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये योगदान राहिले आहे. ते दडशिंगे गावचे सर्वात कमी वयात निवडून आलेले माजी उपसरपंच आहेत. यापुढे पक्षाची विचारधारा तळागाळातील युवकांपर्यंत पोहोचविणे, पक्ष अधिक बळकट करणे आदी कामांवर भर देणार असल्याचे त्यांनी निवडीनंतर सांगितले.



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ५१ जणांचे रक्तदान

**मोडनिंब, दि. २७ जुलै -**

मोडनिंब (ता.माढा) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्या वंदनाताई कांबळे,भाजप तालुका अध्यक्ष योगेश पाटील, मोडनिंब शहर अध्यक्ष राहुल गांधी, शहर अध्यक्षा मनिषा गिड्डे, कैलास तोडकरी, विकास यादव, सत्यनारायण गिड्डे, चांगदेव वरवडे, संतोष पाटील, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ माळी, राहुल पाटील, उपसरपंच अमित कोळी, धनाजी लादे, गणेश सुर्वे, सचिन सुर्वे, धनाजी सुर्वे, नवनाथ मोहिते, किरण खडके, सदाशिव पाटोळे, अनिल अप्पा शिंदे, गणेश महाडिक, माधव सुर्वे, डॉ प्रशांत कोल्हे, महेश पवार, तेजस जाधव, धनराज रणसिंग, अमोल काटकर, विशाल पाटील, रोहिणी मोहिते, भक्ती पवार, नागनाथ पवार, चंद्रकांत ओहोळ, लखन पाटील, श्रेयस सुर्वे, माणिक कणसे, सोमनाथ गायकवाड, अमोल घारपुरे, प्रणय सुर्वे, प्रथमेश शिंदे, बालाजी वाघमारे, गणेश कोळी, रोहन शिंदे, अजय चोपडे, शुभम गायकवाड, चंद्रकांत सुर्वे, पत्रकार प्रथमेश पवार, तसेच सर्व मान्यवर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



### ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे मोफत मार्गदर्शन

**श्री शिवाजी महाविद्यालयाचा उपक्रम**

**बार्शी, दि.२७ जुलै -**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार आणि निःशुल्क मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, या उद्देशाने श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी संचलित कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.अब्दुल शेख यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सातत्य, शिस्त, वेळेचे प्रभावी नियोजन आणि आत्मविश्वास यांच्या आधारावर करण्याचे आवाहन केले. स्पर्धेच्या वाढत्या युगात गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन, नियमित सराव आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर यश संपादन करता येते, असे सांगितले. कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत यूपीएससी, एमपीएससी, एसएससी, बँकिंग, पोलीस भरती आदी स्पर्धा परीक्षांसाठी निःशुल्क मार्गदर्शन देत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर मार्गदर्शनपर विविध उपक्रम नियमितपणे राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्रामार्फत विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, गेस्ट लेक्चर्स, सुसज्ज वाचन कक्ष, नियमित सराव परीक्षा, मुलाखत मार्गदर्शन तसेच शंका-निरसन सत्रांचे आयोजन करत असल्याची माहितीही दिली. मार्गदर्शन केंद्रामार्फत आतापर्यंत डॉ. राहुल पालके, डॉ. एस. बी. शिंदे, प्रा. किशोर गरड, डॉ. उमेश बरचे, डॉ. आर. आर. पाटील, प्रा. सुरज कावरे, प्रा. प्रताप पाटील यांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन केले आहे.

## निधन वृत्त...

### महादेव गाजरे

**अकलूज, दि. २७ जुलै-**



संजयनगर माळेवाडी येथील शेतकरी महादेव तुकाराम गाजरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुली, एक मुलगा, सुन, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.अकलूजमधील प्रसिध्द फोटोग्राफर गणेश गाजरे यांचे ते वडील होते.

### सतिश लावंड

**अकलूज, दि. २७ जुलै-**



खंडाळी (ता. माळशिरस) येथील सतिश मथुरदास लावंड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुली,दोन मुले,सुन, जावाई,नातवंडे असा परिवार आहे.

# अखेर झिंजेवस्तीच्या वादग्रस्त आशासेविकेची निवड रद्द

## ग्रामस्थांच्या तक्रारीची प्रशासनाकडून दखल, दैनिक तरुण भारतच्या वृत्ताचा दणका

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ जुलै -**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील आशासेविकेची रिक्त जागा भरण्यासाठी शासनाकडून रितसर प्रक्रिया राबवली होती. सदर पदासाठी गावातील १४ महिलांनी अर्ज केले होते. मात्र त्या सर्वांना डावलून गारवाडच्या नसीमा आतार यांची निवड झाली होती. स्थानिकांनी निवडीवर आक्षेप घेत आक्रमक भुमिका घेतली होती. अखेर माळशिरस तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांची निवड रद्द केली आहे.

बाहेरगावच्या महिलेची नियुक्ती केल्यामुळे झिंजेवस्ती ग्रामस्थ प्रचंड आक्रमक झाले. नियुक्ती विरोधात पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सभापती माळशिरस पंचायत समिती यांच्याकडे ग्रामस्थांनी तक्रारी दाखल केल्या. ग्राम सभेतही पिलीवच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जाब विचारला. अखेर माळशिरस तालुक्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जानकर यांनी नियुक्त केलेल्या नसीमा आतार यांना नोटिसीद्वारे झिंजेवस्ती येथील रहिवासी असल्याचे भक्कम पुरावे सादर करण्याचे आदेश दिले. मात्र दिलेल्या मुदतीत त्यांनी कोणतेही पुरावे मतदार यादीतील नाव, रेशनकार्डमधील नाव, ग्राम पंचायत रहिवासी दाखला यापैकी कोणताच पुरावा सादर केला नाही. परिणामी त्यांची झिंजेवस्ती येथे आशा स्वयंसेविका म्हणून केलेली निवड रद्द करत असल्याचे पत्र ६ जुलै रोजी माळशिरस पंचायत समितीचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. जानकर यांनी त्यांना दिले आहे. याबाबत जिल्हा वैद्यकीय अधिकारी, गटविकास अधिकारी माळशिरस पंचायत समिती व वैद्यकीय अधिकारी पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्र यांनाही कळवले आहे.

तरुण भारत Impact

### तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांची भुमिका संशयास्पद; संपर्क टाळला

माळशिरस तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. जानकर यांची या निवडीबाबतची भुमिका संशयास्पद राहिली. कारण निवडीबाबत त्यांना विचारले असता त्यांनी उमेदवाराचे सर्व पुरावे हे झिंजेवस्ती येथीलच आहेत. ही निवड शासनाच्या नियमानुसार पारदर्शकपणे केली असल्याचे सांगितले होते. मात्र हे निवड प्रकरण अंगलट येण्याचे दिसताच त्यांनीच ६ जुलै रोजी निवड रद्द केली. एकंदरीत याबाबत त्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा वारंवार प्रयत्न केला असता त्यांनी मोबाईल उचललाच नाही.


झिंजे वस्ती येथील आरोग्य उपकेंद्रात बाहेरगावच्या आशा सेविकेची चुकीच्या पद्धतीने नियुक्ती

### मोठ्या राजकीय पुढाऱ्याचा हात : मदने

या नियुक्तीबाबत झिंजेवस्तीचे माजी ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल मदने तसेच अशोक मदने यांनी वरिष्ठांकडे तक्रार केली होती. तसेच प्रशासनास निवड रद्द करण्यास भाग पाडले. झिंजेवस्ती येथे बाहेरगावच्या आशा स्वयंसेविकेची निवड ही मोठ्या राजकीय पुढाऱ्याच्या वरदहस्तामुळे झाली असल्याचा आरोप विठ्ठल मदने यांनी केला आहे.

### कोळेगाव दारूबंदीसाठी महिलांच्या स्वाक्षऱ्यांची ३० जुलै पडताळणी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि २७ जुलै-**

कोळेगांव (ता.माळशिरस) येथे दारूबंदीसाठी गावातील ८७० महिलांनी जिल्हाधिकारी आणि अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांच्याकडे निवेदन दिले होते. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

निबंधक व प्रशासकीय प्रक्रियेचा भाग म्हणून, दारूबंदीच्या अर्जावर महिलांच्या स्वाक्षऱ्यांची अधिप्रमाणता व पडताळणी करण्यासाठी ३० जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत विशेष सभा होत ग्रामपंचायत कार्यालय, कोळेगाव येथे होणार आहे. निवेदनावर स्वाक्षरी केलेल्या सर्व महिलांनी पडताळणी प्रक्रियेसाठी स्वतःच्या मतदार ओळखपत्रासह वेळेत उपस्थित राहावे, असे निर्देश दिले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क माळशिरस विभागाचे निरीक्षक एस. जी. भवड यांनी यासंदर्भात अधिकृत पत्र जारी केले आहे.

## सुट्टी दिवशीही माजी सैनिकांना जिल्हा सैनिक कार्यालयाकडून सेवा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २७ जुलै -**

माजी सैनिक, वीर पत्नी, वीर माता तसेच त्यांच्या कुटूंबियांना सेवा देण्याचे काम जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय करत असते. शनिवारी आषाढीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असतानाही माजी सैनिकांच्या पाल्याच्या ॲडमिशनसाठी आवश्यक प्रमाणपत्र देण्यात आले. अन्यथा काही विद्यार्थ्यांना सैनिक कोट्यातील प्रवेशापासून मुकावे लागले असते.

सीईटी परीक्षेचा निकाल नुकताच लागला. अभियांत्रिकी ॲडमिशनसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. सैनिकांच्या पाल्यांना त्यांच्या कोट्यातून प्रवेशासाठी आवश्यक परफॉर्म बी या फॉर्ममध्ये अचानक बदल केल्याने कांही विद्यार्थ्यांना सैनिक कोट्यातील प्रवेशापासून वंचित राहावे लागले असते. आषाढी वारीसाठी जिल्हा सैनिक कल्याण केंद्रातील सर्व कर्मचारी पंढरपूरात सेवेत होते. त्यातच शनिवार व रविवार सुट्टीचा दिवस होता. शुक्रवारी २४ जुलै रोजी सायंकाळी विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीसाठी भरलेल्या फॉर्ममधील त्रुटीची दुरुस्ती जाहीर केली. त्यांना नवीन परफॉर्म सी दुरुस्तीची सूचना दिली. त्यामुळे ते प्रमाणपत्र जिल्हा सैनिक कार्यालयाकडून घेवून अपलोड केल्यावरच माजी सैनिक कोट्याचा लाभ मिळणार होता. त्यांचा चांगल्या कॉलेजमध्ये नंबर लागला नसता. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याचे गांभीर्य ओळखून जिल्हा सैनिक केंद्राचे अधिकारी मिलिंद तुंगार यांनी सैनिक हॉस्टेलच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेतले. सैनिक कल्याण कार्यालयातील पूजा, बनसोडे, मारुती शेंबडे यांच्याशी समन्वय साधून प्रमाणपत्र देण्याचे काम वेळेत पूर्ण केले.

### तुंगार विठ्ठलासारखे मदतीला

अधिकारी मिलिंद तुंगार यांनी मला ऑफीसमध्ये बोलवून माझ्या मुलीच्या इंजिनिअरिंग प्रवेश अर्जासाठी आवश्यक परफॉर्मा बी फॉर्मवर सही दिली. आमच्यासाठी त्यांनी लगेच कारवाई केली. त्यामुळे एका अर्थाने आषाढी एकादशीला आमच्यासाठी तुंगार विठ्ठल म्हणून धावून आले.

**- मेजर जगन्नाथ आदमाने, माजी सैनिक.**

### अडचण असल्यास तत्काळ सहकार्य

आषाढी वारीनिमित्त सैनिक कार्यालयातील सर्व स्टाफ पंढरपूरला ड्युटीवर कार्यरत आहेत. काही सैनिक पाल्यांच्या इंजिनिअरिंगसाठीच्या प्रवेशाच्या अडचणीचे गांभीर्य लक्षात घेऊन सुट्टीच्या दिवशीही तत्परतेने त्यांना आवश्यक ते प्रमाणपत्र दिले. अशा स्वरुपाच्या अडचणी आल्यास त्यांना तत्काळ सहकार्य केले जाईल.

**- मिलिंद तुंगार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी**



### 'राष्ट्ररत्न फाउंडेशन', 'सिंधू विहार मंदिरा'तर्फे आषाढी एकादशी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशन, सोलापूर आणि सिंधू विहार गणपती-विठ्ठल मंदिराच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीचा उत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रांजली मोहीकर, उपाध्यक्ष प्रा. प्रेमचंद मेने, विश्वस्त ज्योती मेने, शैलेश मोहीकर, वेदांत मोहीकर तसेच सिंधू विहार परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत पालखी दिंडीचे आयोजन करण्यात आले. या भक्तिमय सोहळ्यात शैलेश मोहीकर, राहुल वर्मा, डॉ. अंजली शिरशी, महिंद्रकर आणि ज्योती पदकी यांनी विठ्ठलाची सुमधुर भक्तिगीते सादर करून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्रकाश शिंपी, सुहास भोसले, महेश वाघमारे, अनुराधा निकम, संगीता महिंद्रकर, तसेच संस्थेचे सदस्य बोराडे, रेळेकर, भारती ढोबळे, वैशाली गायकवाड यांनी परिश्रम घेतले. यावेळी सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.




### माहेश्वरी आर्ट गॅलरीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २७ जुलै -**

मंगळवेढ्यातील माहेश्वरी आर्ट गॅलरीचे उद्घाटन आषाढी वारीच्या शुभ मुहूर्तावर पंढरपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यांनी माहेश्वरी आर्ट गॅलरीमधील कलाकृतींचे कौतुक केले आहे.

मंगळवेढा येथे शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. प्रियदर्शनी महाडिक यांच्या मार्गदर्शनातून माहेश्वरी आर्ट गॅलरी साकारली आहे. उद्घाटन प्रसंगी मंत्री गिरीष महाजन, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.समाधान आवताडे, आ.अभिजीत पाटील, आ.राजेंद्र राऊत, माजी आ.प्रशांत परिचारक, युवक नेते पवन महाडिक तसेच अन्य पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उद्घाटनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रियदर्शनी महाडिक यांच्या पुढील कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

## बार्शीत संशयित गोमांस साठ्यावर छापा

### ३० हजारांचा मुद्देमाल जप्त, एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ जुलै -**

बार्शी शहर पोलिसांनी मंगळवार पेठ परिसरात धडक कारवाई करत संशयित गोमांसाचा साठा जप्त केला. कारवाईत एकावर गुन्हा दाखल केला आहे.

रविवार दि. २६ जुलै रोजी सकाळी ७.१५ वाजता बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मंगळवार पेठेतील रियाज गुलाम मुस्ताफा सौदागर (वय ५८) याच्या घरावर छापा टाकला. कारवाईत सहाय्यक पोलीस फौजदार अजित वरपे, गोपनीय मदतनीस पो.कॉ. कादर तांबोळी यांच्यासह साठे, सुरवसे व नितनात यांनी सहभाग घेतला.

छाप्यात पत्र्याच्या शेडमध्ये जनावराच्या शरीराचे तुकडे आढळून आले. प्राथमिक चौकशीत संबंधित व्यक्तीने ते गोमांस असल्याचे सांगितल्याची नोंद फिर्यादीत आहे. मात्र, संबंधित जनावराचे कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र त्याच्याकडे आढळले नाही. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर व दुसरा दिवस द्वादशी असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी संशयित मांस तातडीने जप्त करुन पोलीस ठाण्यात आणले.




पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा केला. कारवाईत अंदाजे १५० किलो संशयित गोवंशीय मांस, जनावराचे अवयव तसेच तीन लोखंडी सत्तुर असा एकूण ३०,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस कॉ. कादर तांबोळी यांनी फिर्याद दिली. रियाज गुलाम मुस्ताफा सौदागर याच्याविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# उच्च दर्जाची न्याय व्यवस्था निर्माण व्हावी

## न्यायमुर्ती जमादार; अक्कलकोटमध्ये न्यायालयाच्या नव्या इमारतीचा कोनशिला सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ जुलै -**

अक्कलकोट ही माझी जन्मभूमी असल्याचा मला अभिमान आहे. आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची सुरुवात होत आहे. केवळ भव्य इमारत उभारणे हा उद्देश नसून, येथे उच्च दर्जाची न्यायव्यवस्था निर्माण होणे महत्त्वाचे आहे, असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती एन. जे. जमादार यांनी व्यक्त केले.

अक्कलकोट येथे उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक व सर्वसुविधांनी सुसज्ज नवीन न्यायालयीन इमारतीचा कोनशिला सभारंभ शनिवारी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन.जे. जमादार यांच्या हस्ते झाला, यावेळी ते बोलत होते. यावेळी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती फिरदोस पुनीवाला आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश



मनोज शर्मा (सोलापूर), न्यायमूर्ती एम.एम. कल्याणकर, बार असोसिएशनचे सदस्य मिलिंद थोबडे, अध्यक्ष विश्वनाथ पाटील यांच्यासह न्यायमूर्ती आर. ए. कटारे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

न्यायमूर्ती फिरदोस पुनीवाला यांनी नव्या इमारतीमुळे आधुनिक सुविधा उपलब्ध होऊन न्यायदान प्रक्रिया अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला. ॲड. मिलिंद थोबडे यांनी सोलापूर व बार्शी येथील न्यायालयीन इमारतीची कामेही वेळेत पूर्ण करण्याची अपेक्षा केली.

याप्रसंगी न्यायमूर्ती एन.एल. शेख, माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, ॲड. अनिल मगरुळे, ॲड. विजय हर्डिकर, ॲड. शरद फुटाणे, ॲड. उमाकांत पायमल्ले, पी. आर. शहा, ॲड. अश्विनी बाग, ॲड. एखंडे, तहसीलदार विनायक मगर, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, कार्यकारी अभियंता दिनेशसिंह परदेशी, उपअभियंता श्रीनिवास बासुतकर, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक पवार, सपोनि प्रशांत बदे, सादिक आत्तार, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे आदी उपस्थित होते.

प्रारंभी स्वागत गीत सादर करण्यात आले. प्रास्ताविक व्ही. एन. पाटील यांनी केले. अक्कलकोट बार असोसिएशनच्या वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार न्यायमूर्ती एम.एम. कल्याणकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### न्यायदान प्रक्रिया सक्षम होईल : पुनीवाला

न्यायमूर्ती फिरदोस पुनीवाला यांनी नव्या इमारतीमुळे आधुनिक सुविधा उपलब्ध होऊन न्यायदान प्रक्रिया अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला. महाराष्ट्र-गोवा बार असोसिएशनचे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे यांनी सोलापूर व बार्शी येथील न्यायालयीन इमारतीची कामेही वेळेत पूर्ण करण्याची अपेक्षा केली. न्यायसंस्थेवरील जनतेचा विश्वास दृढ करण्यासाठी वेळेत न्यायनिवाडा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# राष्ट्रीय गुणवत्ता मानांकनात सोलापूर झेडपीची ऐतिहासिक झेप

## जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच तीन आयुष्मान आरोग्य मंदिरांना 'एनक्यूएएस' मानांकन; ग्रामीण आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर राष्ट्रीय शिक्कामोर्तब





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने ग्रामीण आरोग्य सेवेच्या गुणवत्तेत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (एनक्यूएएस) सुरू झाल्यापासून प्रथमच जिल्हा परिषदेच्या तीन आयुष्मान आरोग्य मंदिरांना राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन मिळाले आहे. या यशामुळे सोलापूरच्या ग्रामीण आरोग्य सेवेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, जिल्हा परिषदेच्या आरोग्य व्यवस्थेचा नवा आदर्श निर्माण झाला आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य संस्थांमधील रुग्णसेवा, स्वच्छता, रुग्ण सुरक्षा, औषध व उपकरण व्यवस्थापन, सेवा वितरण, नोंदवही व्यवस्थापन तसेच रुग्णकेंद्रित सुविधांचे कठोर मूल्यांकन केले जाते. या सर्व निकषांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन प्रदान करण्यात येते.

यंदाच्या मूल्यांकनात दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथील आयुष्मान आरोग्य मंदिराला ८४.३१ टक्के, मोहोळ तालुक्यातील येवती येथील आयुष्मान आरोग्य मंदिराला ८३.७३ टक्के, तर औंधी येथील आयुष्मान आरोग्य मंदिराला ८२.०० टक्के गुण मिळाले. या तिन्ही आरोग्य मंदिरांनी राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्राप्त करून जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घातली आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय आणि महानगरपालिका आरोग्य विभागातील विविध संस्थांपैकी केवळ जिल्हा परिषद आरोग्य विभागालाच हे मानांकन मिळाले आहे.

या मानांकनामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच अधिक सुरक्षित, दर्जेदार, विश्वासार्ह आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मानांकन प्राप्त संस्थांना गुणवत्ता प्रोत्साहन निधी मिळणार असून, त्यातून आरोग्य केंद्रांमध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणे, पायाभूत सुविधा आणि रुग्ण सुविधांचा अधिक विकास करता येणार आहे.



या ऐतिहासिक कामगिरीमुळे सोलापूर जिल्हा परिषदेने ग्रामीण आरोग्य सेवेच्या गुणवत्तेचा नवा मापदंड निर्माण केला असून, राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही आदर्श उभा केला आहे.

**- कुशल जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर जिल्हा परिषद**

या यशामागे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे प्रभावी नेतृत्व, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहायक संचालक डॉ. मोहन शेगर, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ), आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश साकार झाले.

# महापालिकेच्या बंद अवस्थेतील समाजमंदिरांचा होणार कायापालट

### मुदत संपलेल्या जागांचे होणार ऑडिट, ताबाही घेणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै -**

सोलापूर : शहरातील महानगरपालिकेच्या मालकीची अनेक समाजमंदिरे बंद अवस्थेत असून काही डागडुजीअभावी जीर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने अशा समाजमंदिरांची यादी तयार करून त्यांचे टप्प्याटप्प्याने नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. समाजमंदिरे हायटेक सुविधांनी सुसज्ज करून नागरिकांच्या वापरासाठी उपलब्ध करण्याची तयारी सुरु आहे.

महानगरपालिकेच्या समाजमंदिरांपैकी अनेक इमारतींची योग्य देखभाल होत नसल्याने त्यांची दुरवस्था झाली आहे. काही बंद समाजमंदिरांमध्ये मद्यप्राशन व इतर गैरवापर प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी असून त्यामुळे परिसरातील सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. काही समाजमंदिरे खाजगी तत्त्वावर भाड्याने देण्यात आली आहेत, तर काही ठिकाणी कराराची मुदत संपूनही संबंधित व्यक्तींचा ताबा कायम असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्व समाजमंदिरे व सभागृहांचे प्रशासकीय आणि भौतिक ऑडिट करण्यात यावी. ज्या संस्था अथवा व्यक्तींच्या कराराची मुदत संपली आहे, त्यांच्याकडून जागांचा ताबा घेऊन महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आणाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

### शहरात ७४ समाजमंदिरे, ३४ अभ्यासिका

शहरात महानगरपालिकेची एकूण ७४ समाजमंदिरे आणि ३४ अभ्यासिका आहेत. यापैकी निम्म्याहून अधिक समाजमंदिरे बंद अवस्थेत आहेत. मात्र अभ्यासिका सुस्थितीत असून त्यांनाही आधुनिक व हायटेक सुविधांनी सुसज्ज करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.



# भावसार व्हिजनतर्फे आयोजित मेगा प्रोजेक्ट शिष्यवृत्ती वितरण समारंभ, मासिक सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै :**

भावसार व्हिजन इंडिया, सोलापूरच्या वतीने आयोजित मेगा प्रोजेक्ट शिष्यवृत्ती वितरण समारंभ व मासिक सभा दमानी ब्लड बँकेवरील सभागृह, डफरीन चौक येथे उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाली. या उपक्रमांतर्गत २५ गरजू व होतकरू भावसार विद्यार्थ्यांना प्रत्येकी ६,००० प्रमाणे एकूण १,५०,००० ची शिष्यवृत्ती मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमास राष्ट्रीय अध्यक्ष श्री. मनीष सूत्रावे, उद्योगपती श्री. धीरज जवळकर, २०२७ चे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शिवाजी उपरे तसेच २०२७ चे राष्ट्रीय सचिव श्री. गिरीश पुकाळे,एरिया गव्हर्नर श्री श्रीराज निकते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, जिद्द, परिश्रम आणि समाजाप्रती कर्तव्य याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात क्लब अध्यक्ष श्री. आशिष जवळकर यांनी संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती देत, समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी होत असल्याचे सांगितले. सचिव श्री. हर्षल माळवदकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्री. निशिकांत पुकाळे व श्री. सुहास राशिनकर यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिष्यवृत्ती देणारे सर्व दानशूर, उपस्थित संचालक, सदस्य, पालक, विद्यार्थी, समाजबांधव, स्वयंसेवक व सर्व सहकाऱ्यांचे अध्यक्ष श्री. आशिष जवळकर यांनी मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा व प्रेरणा मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली

# पालकमंत्री गोरे यांचे मार्गदर्शन अन् जिल्हा प्रशासनाच्या टीममुळे 'आषाढी वारी यशस्वी'

### जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचा निर्वाळा

### दर मिनिटाला 30-3२ वारकरी घ्यायचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

आषाढी वारीसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे योग्य मार्गदर्शन मिळाले आणि जिल्हा प्रशासनातील माझ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून चांगलाच ताळमेळ जमल्याने आषाढी वारी यशस्वी झाली, निर्विघ्नपणे पार पडली. या वारीकाळात वारकरी बांधवांना अनेक सोईसुविधा मिळाल्या आणि दर्शनव्यवस्थाही सुलभ झाल्याचा निर्वाळा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज माध्यमांशी बोलताना दिला. दरम्यान, या वारीकाळात दर्शन रांगेतून दर १ मिनिटाला ३० ते ३२ भाविकांनी दर्शन घेतल्याने रांगेतील वारकऱ्यांना श्रींचे थेट पददर्शन लवकर-लवकर मिळाल्याचाही खुलासा त्यांनी यावेळी केला.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची पहिलीच वारी असल्याने त्यांनी वारीत घेतलेले काही अनुभव यावेळी मांडताना म्हणाले, गेल्या १५ दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यात येणाऱ्या दिंड्यांमुळे जय जय रामकृष्ण हरी, माऊली ऽऽ माऊली, ज्ञानोबाऽऽ तुकाराम असा जयघोष, गजर दाही दिशांतून घुमत होता. टाळ, मृदंग, विणा, चिपळ्या आदी वाद्यांचे सुमधूर स्वर सर्वांना ऐकायला मिळाले. यामुळे अगदी प्रसन्न वाटायचे. या वारीमध्ये आपल्याकडून कोणत्याही वारकऱ्यांना काही कमी पडू नये यासाठी प्रत्येक गोष्टींचा मी आणि माझ्या जिल्ह्यातील सर्व सहकाऱ्यांनी मायक्रोप्लॅनिंग केला होता. वारकऱ्यांसाठी सोयी देण्यासाठी आमची तब्बल २५ हजार ५०० जणांची टीम अहोरात्र झटत होती. या वारीत जवळपास ३२ लाख वारकऱ्यांची आम्हाला सेवा करण्याची संधी मिळाली.



मानाच्या १० दिंड्या आणि इतर शेकडो दिंड्यातून लाखो वारकरी पायी पंढरीला येतात. या वारकऱ्यांची सेवा घडावी म्हणून गावोगाव अनेक सेवेकरी, गावकरी आपापल्या परीने त्यांची सेवा करताना दिसून आले. वारकऱ्यांना पायी येताना कसलाही त्रास होवू नये म्हणून खुद्द पालकमंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले मी स्वत: आणि जिल्हा प्रशासनातील माझे सर्व अधिकारी-कर्मचारी या वारीत अहोरात्र परिश्रम घेत होतो. वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री गोरे यांच्या आदेशाने ग्रामविकास विभागाकडून मागणी केल्याप्रमाणे सर्व निधी मिळाला. त्या निधीतून वारकऱ्यांना निवारा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, जर्मन हँगर, प्रचार व प्रसिध्दी, सेवा व सुविधा, पाणी टँकर पुरवठा, औषधे खरेदी, महिला स्नानगृहे, फिरते शौचालय, सफाई सेवा, मोबाईल चार्जिंग व्हॅन, मेडिसिन ऑन व्हील, ग्रामपंचायतींना अनुदान आदी सेवा देता आल्या. आमच्या टीमच्या सुयोग्य नियोजनाचा आदर्श ठरला असल्याची कौतुकाची थाप खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

यंदाच्या वारीत १४ जिल्ह्यांतील ५ लाखाहून अधिक वारकऱ्यांना थेट चरणसेवेचा लाभ मिळाला. ७ लाख २३ हजार ८२ हून वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली. एअर ॲम्बुलन्स, ३५३ रुग्णवाहिका, १५६ 'आपला दवाखाना' आणि ६९ आयसीयूंच्या माध्यमातून आरोग्य विभागाची प्रभावी सेवा दिली. वारीकाळात नदीपात्रात बुडणाऱ्या जवळपास ३५ जणांचे प्राण वाचविण्यात आपत्ती व्यवस्थापन पथकाला यश आले.

वारीत होणाऱ्या विविध रिंगणसोहळ्यांतही कसलाच भाविकांना त्रास झाला नाही. नवीन 'बीबीपीपीडीआर' टेक्नॉलॉजिचा यंदा पंढरीत पहिल्यांदाच वापर झाला. अवघ्या राज्यात या नवीन यंत्रणेचा आजतागायत कुठेही वापर झाला नाही. गर्दीवर योग्य पध्दतीने नियंत्रण ठेवता आले, गर्दी कुठे जास्त होत आहे, दर्शन रांगेतील घुसखोरी, चोरटे-टवाळखोरांवर नियंत्रण ठेवण्याकामी याचा वापर झाला. वारीनंतरही पंढरी नगरीच्या स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचाही निर्वाळाही त्यांनी दिला.

### दिव्यांग, वयोवृध्दांची स्वतंत्र दर्शनरांग व्हावी

भविष्यात पंढरी नगरीमध्ये कॉरिडॉर उभारणी झाल्यानंतर भाविकांची दर्शनासाठीची अजून चांगली सोय होणार आहे. आषाढी वारीकाळात येणाऱ्या दिव्यांग, वयोवृध्दांना लवकर दर्शन घेता यावे यासाठी त्यांची स्वतंत्र दर्शनरांग व्हावी, यासाठी मी माझे वरिष्ठ अधिकारी, मुख्यमंत्री व मंदिर समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहे. कारण वारी काळात दर्शन रांगेतून येताना त्यांचे फार हाल होतात. यामुळे भविष्यात त्यांचे हाल होवू नये, यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचा मानसही यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी व्यक्त केला.

# 'संभवामि युगे युगे'च्या कार्यक्रमात प्रेक्षक मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन, गुरुपौर्णिमा उत्सवनिमित्त संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या धर्मसंकीर्तन सोहळ्यात सोमवार, दि.२७ जुलै २०२६ रोजी भक्ती व भावगीतांवर आधारित संस्कृती बालगुडे आणि सहकलाकारांनी सादर केलेल्या 'संभवामि युगे युगे' या कार्यक्रमात प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी माजी मुख्याध्यापिका आरती काळे, स्थापत्य अभियंता अशोक महिंद्रकर, पोस्टल असिस्टंट शंकर सुर्यवंशी, उत्तर पोलिस स्टेशन पोलिस कॉन्स्टेबल रणजित भोसले, लेफ्टनंट करण मोरे, संगमेश्वर महाविद्यालयचे प्रा.प्रशांत शिंपी या गुणीजनांसह इयत्ता १० वी, १२ वी परिक्षेत उत्तम गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला

प्रारंभी श्री व सौ.संजय बालगुडे, मिथिलेशकुमार पांडे, आरती लिंगायत, शहाजी खुने-पाटील, तानाजीराव माने-देशमुख, महानंदा गावडे, शिवलिंग स्वामी, सत्यशील खताळ, चंद्रकांत रेंबर्सु, सुनिल मालप, किशोर बोरामणी, राजेंद्र गोटे, उदय डोके, संतोष बडवे, आदित्यकुमार सिंग, अभिषेक गुंड, अभिनंदन गांधी, महादेव पाटील, प्रशांत आरबाळे, ऋषी लोणारी, अविनाश साकोरे, सागर कुसाळकर, प्रणव जोशी, ॲड.प्रणिती जाधव, डॉ.यशवंत डावकर, श्री व सौ.विकास निकम, गौरव अंबारे, शिवानी अंबारे, ॲड.केदार सोमण, निखिल निगडे, विद्या धीडे, रिचा बापट, तितली घोटोक, स्पृहा कुलकर्णी, नक्षत्रा कुलकर्णी, निखिल मारणे, विवेक वनारसे, आशा पायगुडे, शोभा फडतरे, संस्कृती बालगुडे, सौरभ खंडागळे, योगेश तवार, विराज अवचिटे, अक्षय माटकर, नुपूर माटकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले. शामराव मोरे यांनी आभार मानले.

यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ विश्वस्त, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था अध्यक्षा अलकाताई जनमेजयराजे भोसले, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ विश्वस्त, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था सचिव अर्पिताराजे अमोलराजे भोसले, अनुया फुगे, सरोजिनी मोरे, अनिता खोबरे, स्वाती निकम, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, दिव्या मोरे, स्मिता कदम, पल्लवी कदम, संगीता भोसले, रुपा पवार, स्वप्ना माने, प्रिया निकम, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, अनिता गडदे, धनश्री पाटील, कविता भोसले, छाया पवार, कल्पना मोरे, अक्षता मोरे, तृप्ती बाबर, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, रुपाली भोसले, अभय खोबरे, संदीप फुगे, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, राजाभाऊ निकम, मनोज निकम, बाळासाहेब कुलकर्णी-बबलादकर, अश्पाक काझी, अशोकराव उटगे, ओंकारेश्वर उटगे, रोहित खोबरे, प्रवीण देशमुख, अरविंद शिंदे, अप्पा हंचाटे, सौरभ मोरे, गणेश सोनटक्के, विजय इंगळे, बाबुराव कुलकर्णी, बालाजी पाटील, निखील पाटील, आकाश शिंदे, रोहन शिर्के, सागर गोंडाळ, डॉ. किरण पाटील, शिवराज स्वामी, रुद्रय्या स्वामी, प्रा. सायबण्णा जाधव, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, किरण जाधव, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, शुभम सावंत, आकाश गडकरी, कुमार सलबत्ते, लक्ष्मण विभूते, अक्षय मोरे, गणेश पाटील, शहाजी यादव, कुमार पाटील, प्रशांत साठे, सतीश महिंद्रकर, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, स्वामिनाथ बाबर, दत्ता मोरे, आकाश शिंदे, यश विभूते, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, , राजू पवार, तानाजी पाटील, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, प्रा. प्रकाश सुरवसे, प्रा.प्रशांत शिंपी, संजय गोंडाळ, सुशील किलजे, प्रीतीश किलजे, विद्याधर गुरव, सिद्धेश्वर मसुती, बाबुराव मसुती, प्रसाद मोरे, वैभव मोरे, फहीम पिरजादे, केदार तोडकर, योगेश पवार, आकाश सूर्यवंशी, महेश कुलकर्णी, चंद्रकांत कुंभार, अभिषेक चव्हाण, लक्ष्मण शिंदे, अमित कोळी, निखील शिंदे, विनायक भोसले, भरत राजेगावकर, प्रा.शरणप्पा आचलेर, ज्ञानेश्वर भोसले, किरण साठे, असद फुलारी, रमेश हळसंगी, मुन्ना वाकडे, पप्पू कोल्हे, संतोष माने, श्रीशैल कुंभार आदी उपस्थित होते.



### 'अन्नदान'बरोबर लोकोपयोगी उपक्रमांचे कौतुक

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामार्फत अन्नदानबरोबर सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक असे लोकोपयोगी उपक्रम नियमितपणे राबविण्यात येतात; हे कौतुकास्पद म्हणावा लागेल. समाजाप्रती असलेले दायित्व जाणून आपण आपल्या संस्थेच्या माध्यमातून यापुढेही अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम अविरतपणे राबवत राहाल, असा मला विश्वास आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांच्या ३९ व्या वर्धापनदिन आणि श्री गुरुपौर्णिमा उत्सवासासाठी आपणांस, मंडळातील सर्व पदाधिकारी, विश्वस्त आणि सर्व स्वामीभक्तांना हार्दिक शुभेच्छा, अशा आशयाचे शुभेच्छापर संदेश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी पाठवून दिले.

### आज सूर भक्तीचे उमटले

मंगळवार, दि.२८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.३० ते रात्रौ ९.३० यावेळेत श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, निपाणी प्रस्तूत 'सूर भक्तीचे उमटले' हा भक्ती संगीतपर कार्यक्रम सादर होणार आहे, असे संयोजकांकडून सांगण्यात आले.

# निरोगी शरीर, सकारात्मक विचार हेच सुखी जीवनाचे रहस्य : रोडगीकर



### समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने शेळगीत विशेष कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि २६ जुलै -**

निरोगी शरीर, आनंदी मन आणि सकारात्मक विचार हेच ज्येष्ठांच्या सुखी जीवनाचे खरे रहस्य आहे म्हणून ज्येष्ठ नागरिकांनी आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि वेळोवेळी वैद्यकीय तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे असे प्रतिपादन रेवणसिद्ध रोडगीकर यांनी केले.

शेळगी येथील समर्थ ज्येष्ठ नागरिक संघावतीने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी रेवणसिद्ध रोडगीकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी महेश प्रभुलिंग ठेसे, प्रकाश चडचणकर, संघाचे अध्यक्ष शिवलिंगप्पा शहाबादे, उपाध्यक्ष चंद्रकांत रमणशेट्टी, सचिव सुनील पुजारी, सहसचिव अंबादास बिराजदार, कोषाध्यक्ष शरणप्पा यारगले, संचालक अशोक खानापुरे, मल्लिनाथ कट्टे, मल्लिनाथ बताले, संचालिका कस्तुरी अक्कलकोटे, महानंदा बावी यांच्यासह शेळगी परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला उपस्थित होते. चंद्रकांत रमणशेट्टी यांनी संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महेश ठेसे म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांच्या कार्यक्रमांमुळे माणसा माणसांतील जिव्हाळा आणि आपुलकी वाढीस लागते. ज्येष्ठ नागरिकांनी यापुढेही अशीच एकत्र येऊन जीवनात आनंद निर्माण करावा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील पुजारी यांनी केले तर विश्वनाथ कल्याणशेट्टी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व देणगीदार ,संचालक, संचालिका व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT




# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधातील विराट मोर्चाने वेधले लक्ष

## आनंदराज आंबेडकर, राजकुमार बडोले, बबनराव घोलप यांसारख्या दिग्गजांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

अनुसूचित जातींमधील आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात सरसेनानी आनंदराज आंबेडकर, माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप, चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, जालन्यातील रुक्मिणी लोंढे यांसारख्या दिग्गजांच्या सहभागाने सोलापुरात काढण्यात आलेल्या विराट मोर्चाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या या मोर्चात सहभागी लोकांनी हाता निळे झेंडे घेऊन 'आरक्षण वाचवा, संविधान वाचवा... जय भीम, जय भीम... उपवर्गीकरण रद्द करा...' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडण्यात आले होते. या मोर्चास डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून प्रारंभ तर जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील पुनम गेट येथे समारोप करण्यात आला.

पुनम गेट येथे झालेल्या सभेत बोलताना आनंदराज आंबेडकर म्हणाले, अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण लागू करण्याचा प्रयत्न असंवैधानिक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अभिप्रायाचा राजकीय गैरवापर होत आहे. बदर समितीचा अहवाल तात्काळ जाहीर करावा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जातींना एकसंध ठेवण्यासाठी दिलेल्या विचारांना धक्का पोहोचविणारे अ,ब,क, ड वर्गीकरण स्वीकारले जाणार नाही.

### या आहेत प्रमुख मागण्या

- न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल व सांख्यिकीय डेटा जाहीर करावा.
- उपवर्गीकरण रद्द करा. असंवैधानिक उपवर्गीकरणाचे धोरण मागे घ्यावे.
- एससी/एसटी उपयोजनेचा निधी सुरक्षित ठेवण्यासाठी कायदा करा.
- शासन जमा झालेल्या एससी-एसटी शेतकऱ्यांच्या जमिनी मूळ वारसांच्या नावे २० दिवसांत परत करुन तेथे रस्ता, वीज व सिंचनाची सोय करावी.
- कर्मवीर दादासाहेब गायकवाड योजनेतील अनुदान प्रति एकर किमान २५ ते ३० लाख रुपये करून अटी शिथिल कराव्यात.

### आंबेडकर यांनी चारचाकी वाहनात उभे राहून केले अभिवादन

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी या विराट मोर्चाच्या मध्यभागी चारचाकी वाहनात उभे राहून आंदोलकांना अभिवादन करत होते. त्यांच्या उपस्थितीमुळे भीमसैनिकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला.



यावेळी सुभानजी बनसोडे, जनार्दन शिंदे, अशोक जानराव, ॲड. संजीव सदाफुले, देवा उघडे, बबलू गायकवाड, राजा सोनकांबळे, अमित कांबळे, अतिश बनसोडे, श्याम क्षीरसागर, विनोद इंगळे, प्रवीण कांबळे, कुमार चन्ना, सुहास सावंत यांच्यासह अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो समाजबांधव उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ वर्धापन दिन, गुरुपौर्णिमा उत्सव बनला लोकोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ जुलै-**





श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळ वर्धापन व गुरुपोर्णिमा उत्सवनिमित्त आयोजित धर्मसंकीर्तन समस्त देशवासीयांच्या दृष्टीने जणू लोकोत्सव बनल्याचे सांगण्यात येते.

या महोत्सवांतर्गत ख्यातनाम वक्त्यांची व्याख्याने, राष्ट्रीय समाज प्रबोधनकार यांचे कीर्तन, दिग्गज कलावंतांचा कलाविष्कार कार्यक्रम यांसह मराठी, कन्नड, हिंदी भाषेतील भक्ती व भावगीतांचे सादरीकरण करण्यात येते. गुरुपौर्णिमेच्या दिवशी भव्यदिव्य पालखी सोहळा असतो. पालखी रथ मिरवणुकीत लेझीम, झांज, ढोल, बॅन्ड, हलगी पथकांचे आकर्षण असते.

या धर्मसंकीर्तन सोहळ्यातंर्गत प्रख्यात गायिका उषा मंगेशकर, कन्नड गायक राजेश कृष्णन्, प्रसिध्द व्याख्याते नितीन बानगुडे, राष्ट्रीय कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर, आर्या आंबेकर, आदेश बांदेकर, संस्कृती बालगुडे, भरत जाधव यांसारख्या दिग्गजांचे कार्यक्रमांच्या माध्यमातून रसिक प्रेक्षकांची मने जिंकण्यात आलल्याचेही सांगण्यात आले.



## मोफत तेलुगू भाषा वर्ग २ ऑगस्टपासून नवीन बॅच सुरू

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि हृदय स्पर्श बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मराठीतून तेलुगू लिहायला-वाचायला शिका या मोफत अभ्यासक्रमाची नवीन बॅच रविवार, २ ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणार असल्याची माहिती पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांनी दिली. याचे वर्ग पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय, १५१/५, रविवार पेठ, कन्ना चौक, विणकर बाग जवळ, सोलापूर येथे दर रविवारी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत होतील. अभ्यासक्रमाचा कालावधी १० आठवडे असून, आवश्यकतेनुसार तो वाढविण्यात येईल. अधिक माहितीसाठी किंवा प्रवेश नोंदणीसाठ ी काशिनाथ गंजी (९९७०९१९२४२), श्रीरंग रेगोटी (९९२१३२४८२३) अथवा पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय (८०१०९१३५६६) येथे संपर्क साधावा. असे आवाहन पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाचे कार्यवाह अरविंद चिन्नी तसेच हृदय स्पर्श बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे सचिव काशिनाथ गंजी आणि मार्गदर्शक श्रीरंग रेगोटी यांनी केले आहे.

### ▶▶ महत्वाचे...

#### ३ ऑगस्टला जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर, दि.२७ जुलै-**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार, दि. ०३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता सात रस्ता परिसरातील जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजन करण्यात आल्याची माहिती उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी दिली. मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल, माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

---

#### गुरव समाजातील गुणवंतांचा रविवारी सन्मान

**सोलापूर, दि.२७ जुलै-**

राष्ट्रीय गुरव समाज महासंघ, सोलापूर जिल्ह्याच्या वतीने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावी, बारावी तसेच इतर विविध परीक्षांमध्ये विशेष गुण मिळवून यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रविवार, दि.२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता सन्मान करण्यात येणार आहे. विजापूर रस्त्यावरील सदिच्छा नगर येथील समृध्दी गार्डन येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे अध्यक्ष विजयराज शिंदे हे राहणार आहे. यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी दि.२८ जुलै २०२६ पर्यंत आपले अर्ज ऑनलाईन स्वरुपात पाठवून द्यावेत, असे आवाहन राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे जिल्हाध्यक्ष नींगराज विंचूरे यांनी केले.

---

#### प्रा.सोलापुरे यांना पीएच.डी

**सोलापूर, दि. २७ जुलै-**



संगमेश्वर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक युवराज रेवणसिद्ध सोलापुरे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. ए स्टडी ऑफ इकॉनॉमिक अॅन्ड सोशल इम्पॅक्ट ऑफ नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (एनटीपीसी) प्रोजेक्ट विथ स्पेशल रेफरन्स टू सोलापूर सुपर थर्मल पॉवर प्रोजेक्ट या विषयावर त्यांनी संशोधन केले आहे. याकामी त्यांना प्रा.डॉ. राजाराम पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर, प्र-कुलगुरु प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



# सोलापूर जिल्हा परिषदेने केलेल्या आषाढी वारी व्यवस्थापनाचा राज्यभरात ठसा

- ▶▶ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले विशेष कौतुक
- ▶▶ जिल्हा परिषदेच्या काम-काजाला मिळाली शाबासकी
- ▶▶ अधिक सक्षम सेवा देण्याचा करण्यात आला निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसूत्र सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेने केलेल्या नियोजनाची दखल थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. वारी व्यवस्थापनातील उत्कृष्ट नियोजन, समन्वय आणि सेवा याबद्दल जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे व अधिकाऱ्यांचे त्यांनी विशेष कौतुक करत पुढील काळातही अशाच लोकाभिमुख कामाची अपेक्षा व्यक्त केली.

श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील शासकीय महापूजेनिमित्त मुख्यमंत्री पंढरपूर दौऱ्यावर असताना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी आषाढी वारीदरम्यान भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, स्वच्छता, तात्पुरते निवारा केंद्र, आरोग्य सेवा आणि समन्वय यंत्रणेची माहिती देण्यात आली.


या नियोजनाची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी जिल्हा परिषदेच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. वारीसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यात प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांनी केलेला समन्वय इतरांसाठीही आदर्श असल्याचे त्यांनी नमूद केले.

### संघभावनेने केले काम

आषाढी वारीत भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद, प्रशासन आणि सर्व कर्मचाऱ्यांनी संघभावनेने काम केले. मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांकडून मिळालेली ही शाबासकी भविष्यात आणखी चांगले काम करण्यासाठी प्रेरणादायी आहे, असे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी सांगितले.

# श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात आजपासून गुरुपौर्णिमा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**



येथील श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात मंगळवार, दि.२९ ते बुधवार, दि.२९ जुलै २०२६ या कालावधीत गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू व ट्रस्टी उदय वैद्य यांनी दिली.

मंगळवार, दि.२८ जुलै रोजी रात्री ८ वाजता मंदिर परिसरात पालखी प्रदक्षिणा संपन्न होणार आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशी म्हणजे बुधवार, दि.२९ जुलै रोजी सकाळी ८ ते रात्री ११ पर्यंत नामसाधना दीक्षा दिले जाणार आहे. यादिवशी मीना जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या श्रीगुरुगीता सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे.

दुपारी १२ वाजता महाआरती, दुपारी १२.३० ते सायंकाळी ४ यावेळेत श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाचे प्रदर्शन आणि त्यातीदल कलावंतांचा सन्मान, सायंकाळी ४.३० वाजता श्रीगुरु पादुकांचा अभिषेक, श्रीगुरुपूजन, भजनादि कार्यक्रम, रात्री ८ वाजता महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



## सांगोला महाविद्यालयास विद्यापीठकडून अ दर्जाचे मानांकन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ जुलै -**

सांगोला महाविद्यालयाचे सन २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन वर्षाचे मूल्यांकन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या नियुक्त केलेल्या समितीमार्फत करण्यात येऊन सांगोला महाविद्यालयास अ दर्जाचे मानांकन देण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी दिली.

प्रा.डॉ.विधीन कांबळे यांनी मूल्यांकन समितीचे प्रमुख म्हणून काम पाहिले. सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय मूल्यांकनासाठी परिश्रम घेतले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, प्रा.पी.सी.झपके, संस्था सचिव ॲड.उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, खजिनदार नागेश गुळिमरे यांनी सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

# आता नेहरू वसतीगृहात वर्षभर मिळणार प्रवेश

- शिक्षण समितीचा निर्णय; विद्यार्थ्यांना दिलासा
- जि.प.च्या जागांवरील अतिक्रमणावर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

उच्च शिक्षणासाठी सोलापूर शहर व जिल्ह्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना आता प्रवेशासाठी ठराविक कालावधीची वाट पाहावी लागणार नाही. जिल्हा परिषदेच्या नेहरू वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया बारमाही (वर्षभर) सुरू ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिक्षण समितीने घेतला आहे. त्यामुळे रिक्त जागा उपलब्ध असतील तेव्हा विद्यार्थ्यांना वर्षातील कोणत्याही काळात अर्ज करून प्रवेश मिळू शकणार आहे, अशी माहिती शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

नेहरू वसतीगृहात केवळ सहा हजार रुपये वार्षिक शुल्कात विद्यार्थ्यांना निवासाची सुविधा उपलब्ध होत असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय मोठा दिलासा ठरणार आहे. आतापर्यंत प्रवेशासाठी निश्चित कालावधी असल्याने अनेक विद्यार्थ्यांना संधी गमवावी लागत होती. नवीन निर्णयामुळे शिक्षणासाठी स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक सोयीस्कर पद्धतीने प्रवेश मिळणार आहे.

याच बैठकीत जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवालही चर्चेला आला. ऑडिटमध्ये जीर्ण व धोकादायक ठरलेल्या शाळांची दुरुस्ती किंवा नव्या इमारती उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही सावंत यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागांवरील अतिक्रमणाबाबतही प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. शासकीय जागांवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत अतिक्रमण आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### ग्रामपंचायतींना विशेष निधीचा प्रस्ताव

कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या हजारो दिंड्यांना मार्गातील गावांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सांगोला, मंगळवेढा आणि माळिशरस तालुक्यातील संबंधित ग्रामपंचायतींना विशेष निधी देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. यासंदर्भात प्राथमिक स्तरावर चर्चा झाली असून, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



### जीर्ण शाळांच्या नव्या इमारती उभारणार

नेहरु वसतीगृहाची बारमाही प्रवेश प्रक्रिया सुरू केल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कोणत्याही वेळी प्रवेश घेणे शक्य होईल. जिल्हा परिषदेच्या जीर्ण शाळांच्या नव्या इमारती आणि जिल्हा परिषद मालमत्तेचे संरक्षण यालाही समान प्राधान्य दिले जात आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१५१५

**तुका म्हणे जाय ।**
**नरका अभक्ताची माय ।।**

आई ही जगाची सुरुवात आहे. आईच्या उदरातूनच प्रत्येक जण जन्माला येत असतो. आई नसती तर आपल्या अस्तित्वाचा प्रश्नच उद्भवला नसता. म्हणून आईला प्रत्येकाचे सर्वस्व मानले जाते. अशा सर्वस्व असणाऱ्या आईच्या ऋणाची गोळा बेरीज कोणालाही करता येणे शक्य नाही. त्यामुळे आईच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आईचे ऋण फेडता येणे शक्य नसले तरी त्या ऋणाची आठवण ठेवून जगण्यात जो आनंद आहे तो मी ऋणाची परतफेड केली म्हणण्यात निश्चितच नाही. आईचे ऋण फेडावे अशी अपेक्षा आईकडून केली जात नसली तरीही आपल्या मुलाने असे कोणतेही कृत्य करू नये की ज्याम ुळे लोक आपल्याकडे बोट दाखवतील, अशी अपेक्षा पोटच्या मुलांकडून आईने करणे चुकीचे नाही. पण काही म हाभाग असे असतात की त्यांना आईच्या ऋणाचा विसर पडलेला असतो. स्वकर्तव्याची व आईच्या उपकाराची आठवण विसरुन नको ती दुष्कृत्य करण्यात आनंद मानला जातो. असा दुष्कृत्याचा आनंद त्या व्यक्तिबरोबर आईच्या बदनाम ीला कारणीभूत होतो. आईवर श्रध्दा, भक्ती, न ठेवता असे दुष्कृत्य करणाऱ्या व्यक्तिबद्दल बोलताना तुकाराम महाराज म्हणतात,



**तुका म्हणे जाय ।**
**नरका अभक्ताची माय ।।**

वाईट वागणाऱ्याला लोक नाव ठेवतात, त्याहीपेक्षा त्याच्या जन्मदात्रीस जास्त नाव ठेवतात. छोट्या-मोठ्या भांडण-तंट्यातही लोक एकमेकांना आईच्या नांवानेच शिव्या घालतात. चुकतो आपण आणि शिव्या खाते ती आपली आई. हे अत्यंत चुकीचे आहे. अर्थात, दुष्कृत्य आपण करतो आणि बदनाम होते ती आपली आई. आईने नऊ महिने पोटात वागवावे, रक्त आटवून दूध करून पाजवावे, आपली घाण साफ करावी, आपले लालन-पालन करावे आणि आपल्याकडून बदनाम व्हावे. जगाची ही रीत फारच आश्चर्यकारक आहे. या रीतीपासून आपणही अलिप्त नाही. आपणही कोणालातरी आईच्या नांवाने शिव्या दिल्या असतील, तिला बदनाम केले असेल किंवा कोणाकडून तरी आपणही आपल्या आईबद्दल अपशब्द ऐकले असतील. आपणाला आईचे नाव मोठे करता नाही आले तरी चालेल, पण तिला बदनाम करण्यासारखे दुष्कृत्य तरी आपल्या हातून घडता कामा नये. आई हा शब्दच मुळात इतका पवित्र आहे की या शब्दामुळे पवित्र शब्दाची महती वाढते. म्हणून या पावित्र्याला कलंकित करण्याचा अधिकार कोणालाही नाही, हे याप्रसंगी आपण लक्षात ठेवावे. तुकाराम महाराजांच्या अभंगांचे अर्थ आम्ही आमच्या अल्पबुध्दीने काढीत आहोत. त्यामुळे आपणास कोठे उणीव जाणवली किंवा चुकीचे वाटले तर कृपया आपण आम्हास कळवावे ही विनंती. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. २९ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ शु.त्रयोदशी**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- मूळ (१०.२७)**
**योग - वैधृति (२२.५४)**
**करण - गरज (२९.१८)**
**राहू काल : मंगळवार**
**स. ०३.०० ते ०४.३०**

**दिनविशेष :**
**जागतिक हेपॅटायटीस दिन: यकृताच्या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी हा दिवस पाळला जातो**
**जागतिक निसर्ग संवर्धन दिन: नैसर्गिक संसाधनांचे रक्षण आणि पर्यावरण संतुलनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी साजरा होतो.**
**पेरू स्वातंत्र्य दिन: १८२१ मध्ये पेरू देशाला स्पेनपासून स्वातंत्र्य मिळाले.**

# एसबी प्लाझा परिसरातील पाण्याचे तिन्ही नमुने पिण्यास योग्य

### महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांचे स्पष्टीकरण

### खासगी बोअर बंद करण्याच्या सूचना, नवीन ड्रेनेज लाइनला मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

आसरा चौक परिसरातील एसबी प्लाझा येथे दूषित पाण्यामुळे एका महिलेचा मृत्यू झाल्याची तक्रार आल्यानंतर महापालिकेने घेतलेल्या पिण्याच्या पाण्याच्या तिन्ही नमुन्यांचा अहवाल समाधानकारक आला आहे. तिन्ही नमुने पिण्यास योग्य असल्याचे स्पष्टीकरण महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिले आहे. महापालिकेकडून होणारा पाणीपुरवठा सुरक्षित असून एसबी प्लाझामधील खासगी बोअर बंद करण्याच्या सूचना रहिवाशांना देण्यात आल्या आहेत, असे चौबे यांनी सांगितले.



नागरिकांच्या तक्रारीनंतर एसबी प्लाझा परिसरातील ड्रेनेज लाइनची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून सुमारे ३३० मीटर लांबीची नवीन ड्रेनेज लाइन टाकण्याची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. या कामास महापालिका आयुक्तांनी मंजुरी दिली असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. ड्रेनेज लाइनमधील सांडपाणी रिव्हर्स होऊन ते पिण्याच्या पाण्याच्या टाकीत मि सळल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर एसबी प्लाझा येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तपासणी अहवालानुसार टाकीतील पाणी पिण्यास योग्य असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या संचालकपदी पाचजण बिनविरोध



प्रा.डॉ. येळेगावकर | प्रा.डॉ. काकडे | प्रा. नवगीरे | प्रा. पिशवीकर | मोहन सोहनी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

येथील श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या व्दैवार्षिक निवडणुकीत पाचजणांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली. वाचनालयाच्या या निवडणुकीत पाच जागांसाठी एकूण आठजणांनी आपले उमेदवारी अर्ज भरले होते. परंतु, वाचनालयाचे ज्येष्ठ संचालक ॲड. धनंजय माने यांच्या मध्यस्थीने त्यातील दत्ता भोसले, रजनीश जोशी आणि प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख या तिघांनीही माघार घेतली. त्यामुळे १९ जुलै रोजी झालेल्या वाचनालयाच्या वार्षिक सभेत पाचजणांची संचालक म्हणून निवड जाहीर करण्यात आली.

निवड झालेल्यांमध्ये प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर, मोहन सोहनी, प्रा. सुलभा पिशवीकर, प्रा. डॉ. नभा काकडे आणि प्रा .नागनाथ नवगिरे यांची पुढील सहा वर्षांसाठी संचालक म्हणून निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून माजी प्राचार्य के. एम. जम ादार यांनी काम पाहिले. या सर्व नूतन संचालकांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जुळे सोलापुरातील बँक कॉलनीत पिण्याच्या पाईपलाईन कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या जुळे सोलापुरातील प्रभाग क्रम ांक २६ मधील बँक कॉलनी येथे पिण्याच्या पाईपलाईन कामाचा शुभारंभ करण्यात आला. नागरिकांची मागणी असलेला ४० वर्षांपासूनचा प्रश्न सोडवल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी नगरसेवक जयकुमार माने यांचे आभार मानले.

बँक कॉलनी येथे ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी आणि नागरिकांच्या हस्ते नारळ फोडून पिण्याच्या पाईपलाईनच्या काम ाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी प्रभागाचे नगरसेवक जयकुमार माने, ब्रह्मदेव दादा माने बँकेचे संचालक सचिन चौधरी, राहुल लोभे, ईरेश खुणे, श्रीपाद आरोळे, रुद्रया हिरेमठ, मोहन पाटील, प्रदीप कोळी, उमेश चांडोले, समर्थ जाधव, अमोल आमोणे, वीरभद्रेश्वर दंडे, विनय वाळवेकर आदी उपस्थित होते.



# आंतरराष्ट्रीय न्याय दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

आंतरराष्ट्रीय न्याय दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर व पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर यांच्या सहकार्याने 'फौजदारी न्यायप्रणालीतील पोलिसांची भूमिका' या विषयावर कायदेविषयक जनजागृती मार्गदर्शन कार्यक्रम पोलिस आयुक्तालय येथे संपन्न झाला.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून न्यायमूर्ती अमोलकुमार देशपांडे, सचिव - जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांनी न्यायप्रक्रीया सर्वांसाठी सुलभ करण्यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांना कायदेशीर सहाय्याचा लाभ दयावा असे आवाहन केले. तसेच वक्ते म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर चे प्रमुख जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांनी फौजदारी न्यायप्रणालीमध्ये पोलिसांची भूमि का, गुन्ह्यांच्या तपासाची प्रक्रिया, पुरावे संकलन, न्यायालयीन कार्यवाहीतील पोलिसांचे कर्तव्य तसेच नागरिकांनी कायद्याचे पालन करून न्यायव्यवस्थेला सहकार्य करण्याचे महत्त्व याविषयी म ार्गदर्शन केले.


कार्यक्रमाचे आयोजन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे म ार्गदर्शनात पार पडला. कार्यक्रमात पोलीस उपायुक्त (गुन्हे/विशा) डॉ. अश्विनी पाटील,पोलीस उपायुक्त (परिमंडळ) प्रितम यावलकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) दिलीप पवार, सहायक पोलीस आयुक्त (विभाग-२) विजयालक्ष्मी कुर्री उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर व पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर यांनी संयुक्तरीत्या परिश्रम घेतले. कार्यक्रमाची प्रस्तावाना पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील यांनी केली. शेवटी सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) दिलीप पवार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सपोनी राजेश डाकेवाड यांनी केले व नियोजन दोषसिध्दी कक्ष सोलापूर यांनी पाहिले.

# राज्यातील शिक्षकांसाठी 'एआय साथी' अभ्यासक्रम बंधनकारक

### 31 ऑगस्टपर्यंत प्रवेश, 30 सप्टेंबरपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (सीपीडी) बळकट करण्यासाठी राज्यातील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या सर्व शिक्षकांना 'एआय साथी' हा ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा अभ्यासक्रम ५० तासांच्या वार्षिक सीपीडी प्रशिक्षणाचा भाग असून तो पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना चार तासांचे प्रशिक्षण श्रेय मिळणार आहे. अभ्यासक्रमासाठी शिक्षकांनी प्रथम दीक्षा ॲपवर नोंदणी करून प्रोफाइल पूर्ण करावे. त्यानंतर दीक्षा कोर्सेस ॲप किंवा दीक्षा संकेतस्थळावर जाऊन 'शिक्षकांसाठी एआय साथी' हा अभ्यासक्रम शोधून प्रवेश घ्यावा. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर मि ळणारे प्रमाणपत्र डाउनलोड करून जतन करणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमासाठी ३१ ऑगस्ट २०२६ ही प्रवेशाची अंतिम तारीख असून ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक आहे. राज्यातील सर्व शिक्षकांनी निर्धारित मुदतीत प्रशिक्षण पूर्ण करून सीपीडीची अट पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.



# सोलापूर-भुसावळ रेल्वे विभागातून पहिल्यांदाच ऑटोमोबाईलची वाहतूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

भिगवण गुड्स शेड आणि भुसावळ विभागातील भुसावळ गुड्स शेड येथून ऑटोमोबाईलच्या वाहतुकीची (लोडिंगची) यशस्वी सुरुवात करून मध्य रेल्वेने आपल्या मालवाहतूक व्यवसायात दोन महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. या कामगिरीमुळे मालवाहतुकीचा एक नवीन स्रोत उपलब्ध झाला असून, ग्राहक-केंद्रित लॉजिस्टिक्स सेवा आणि मालवाहतुकीतील वैविध्य वाढवण्याबाबतची मध्य रेल्वेची कटिबद्धता अधिक दृढ झाली आहे.



दौंड आणि मनमाड विभाग पुणे विभागाकडे हस्तांतरित झाल्यानंतर, सोलापूर विभागाने १९ जुलै २०२६ रोजी भिगवण गुड्स शेडमधून पहिली ऑटोमोबाईल लोडिंग पूर्ण केली असून, मालव-ाहतूक व्यवसायातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. १०० वाहने वाहून नेणाऱ्या २५ एनएमजी वॅगन्सची पहिली एनएम जी रॅक भिगवण गुड्स शेडमधून आसाममधील कामरूप जिल्ह्यातील नॉर्थ-ईस्ट फ्रंटियर रेल्वेच्या रंगिया विभागातील बी.आर. ट्रान्सकॉन लिमिटेड गुड्स कार्गो टर्मिनलकडे यशस्वीरीत्या रवाना करण्यात आली. या पहिल्यावहिल्या वाहतुकीतून २१ लाख रुपयांचे मालवाहतूक उत्पन्न मिळाले.

२४ जुलै २०२६ रोजी, भुसा-वळ गुड्स शेडमधून दक्षिण पश्चिम रेल्वेच्या बेंगळुरू विभागातील निडवंडा येथे पाठवण्यासाठी २५ एनएमजी वॅगन्स आणि १०० ऑटोमोबाईल्स असलेली पहिली एनएमजी रॅक यशस्वीप-णे लोड करण्यात आली. या पहिल्यावहिल्या लोडिंगमधून १४.८२ लाख रुपयांचे माल-वाहतूक उत्पन्न मिळाले. म ालवाहतुकीच्या व्यवसायाच्या नवीन संधी विकसित करण्याबाबत विभागाच्या बिझनेस डेव्हलपमेंट युनिटने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच हे शक्य झाले.

# मागील भांडणावरून चाकू व फायटरने हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

मागील भांडणाच्या कारणावरून चाकू, रॉड व फायटरने मारहाण करून तिघा बाप मुलांना जखमी करण्यात आल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंत्रोळी गावात आज रविवारी सकाळी साडेदहा वाजता घडली. रामचंद्र रघुनाथ कोळी (वय ५४ वर्ष ), रोहित रामचंद्र कोळी (वय २७ वर्ष) आणि ऋषिकेश रामचंद्र कोळी (वय २६ वर्ष,तिघे रा. अंत्रोळी) अशी जखमींची नावे आहेत. ते तिघे आज सकाळी घराजवळ असताना मागील भांडणाचा राग मनात धरून त्यांना सुखदेव कोळी, संतोष कोळी व इतर सहा जणांनी मिळून मारहाण केली. यात तिघेजण मार लागून जखमी झाल्याने या तिघांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात नातेवाईक राजश्री कोळी यांनी दुपारी दाखल केले.

# उजनीचे पाणी इंगळगी-शिरवळ धुबधुबी तलावात सोडावे



### आमदार सुभाष देशमुख यांना शेतकऱ्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी-शिरवळ धुबधुबी तलाव प्रकल्पात उजनी धरणाचे पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी इंगळगी परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

सध्या उजनी धरण जलद गतीने भरत असून, परिसरातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी धुबधुबी तलावात तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी केली.यासंदर्भातील निवेदन आमदार सुभाष देशमुख यांना देण्यात आले. यावेळी इंगळगीचे माजी सरपंच इनोदगी कोटे, संभाजी माने, चंद्रकांत गुरव, बाबूलाल शेरीकर, शिवानंद हत्तुरे, राहुल वंजारे, सागर धुळवे, रेवण सनके उपस्थित होते.

### कायमस्वरूपी पाणी सोडण्यासाठी प्रयत्न सुरू

निवेदन स्वीकारल्यानंतर आमदार सुभाष देशमुख म्हणाले की, इंगळगी-शिरवळ धुबधुबी तलाव प्रकल्पात उजनीचे पाणी कायमस्वरूपी सोडण्याची व्यवस्था करण्यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे वेळोवेळी निवेदने देण्यात आली असून, त्यांच्यासमवेत बैठका घेण्यात आल्या आहेत. तसेच उजनी प्रकल्पाच्या अभियंत्यांशीही पत्रव्यवहार करून चर्चा करण्यात आली आहे. यंदाही धुबधुबी तलाव भरून देण्याबाबत संबंधित यंत्रणेला सूचना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# दहिटणे, रे नगर येथे २ हजार रोपांचे महावृक्षारोपण

### डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा हरित सोलापूरचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत हरित सोलापूर घडविण्याच्या उद्देशाने डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा (ता. अलिबाग, जि. रायगड) यांच्या वतीने रविवारी सोलापुरात भव्य महावृक्षारोपण अभियान राबविण्यात घेण्यात आले.

या अभियानाअंतर्गत शहरातील दहिटणे येथील राष्ट्रतेज घरकुल परिसर आणि रे नगर येथील आरएमसी प्लांट परिसरात एकूण १ हजार ८०९ वृक्षांची लागवड करण्यात आली असून, पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने हे अभियान महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. प्रतिष्ठान गेल्या अनेक वर्षांपासून राज्यभरात वृक्षलागवड, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. 'एक माणूस - एक झाड' या संकल्पनेतून लाखो वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याची परंपरा प्रतिष्ठानने निर्माण केली आहे. त्याच उपक्रमाचा भाग म्हणून यंदा सोलापुरातही मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.



### रे नगरचा परिसर वृक्षराजींनी भरलेला

गेल्या दोन वर्षापासून रे नगर परिसरात एकूण ३००० पेक्षा जास्त झाडांची लागवड करून त्यांची व्यवस्थित देखभाल व संगोपन प्रतिष्ठान तर्फे केले जात आहे त्यामुळे रे नगरचा परिसर वृक्षराजींनी भरलेला दिसून येत आहे.

दहिटणे येथील राष्ट्रतेज घरकुल परिसरात दोन गटांमध्ये वृक्षलागवड केली गेली. गट क्रम ांक १२/२ मध्ये २६९, तर गट क्रमांक ८३/३ मध्ये ३७८ वृक्ष लावण्यात आले, या ठिकाणी एकूण ६४७ वृक्षांची लागवड करण्यात आली. रे नगर येथील आरएमसी प्लांट परिसरात पाच वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपणाचे नियोजन करण्यात आले . गट क्रमांक ७५५ मध्ये १५५, गट क्रमांक ८४५ मध्ये २३२, गट क्रमांक ७६४ च्या डाव्या बाजूस २४०, उजव्या बाजूस ३४०, तर पाणी टाकी परिसरात १९५ वृक्ष लावण्यात आले. या परिसरात एकूण १ हजार १६२ वृक्षांची लागवड झाली आहे. शहरातील वाढते तापमान, कमी होत चाललेले हरित क्षेत्र आणि वाढते प्रदूषण यांचा विचार करून हे अभियान आयोजित करण्यात आले आहे. केवळ वृक्षलागवड करून थांबण्याऐवजी लावलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संगोपनाची जबाबदारीही प्रतिष्ठानचे स्वयंसेवक स्वीकारणार असल्याने या वृक्षांचे जगण्याचे प्रमाण वाढण्यास मोठी मदत होणार आहे.



# अभिनव सामाजिक संस्थेने काढली महापुरुषांच्या विचारांची दिंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

अभिनव सामाजिक संस्था अध्यक्ष मीनल दास यांच्या नेतृत्वात हद्दवाड भागामध्ये आज थोर महापुरुषांच्या विचाराच्या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी हातात थोर महापुरुषांचे फोटो, तुळशी वृंदावन, गळ्यात टाळ व विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती घेतली होती.या दिंडीमध्ये मोठ्या संख्येने महिला मुली सहभागी झाल्या होत्या.

यावेळी दास म्हणाल्या, आज आपण या थोर म हापुरुषांच्या विचारांची दिंडी आयोजित केली आहे. कारण संतांचे आणि थोर महापुरुषांचे पुरोगामी विचार आजच्या युवा पिढीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. पायी पंढरपूरला जाण्यासोबतच त्यांचे विचार जर आपण आत्मसात केले तर खरी विचारांची वारी होईल. याच विचारांची पताका घेऊन आज सर्वजण आम्ही एकत्र आले आहोत. या दिंडीसाठी शहरातील विविध भागातून महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या होत्या.

## महत्वाचे...



### जिजामाता प्रशालेत आषाढी दिंडी

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

जिजामाता प्रशाला कोंडी येथे आषाढी दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सोनाली ठोकळ, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले व ह.भ.प. वाघमारे बंधुंच्या उपस्थितीत झाला. मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या पालखीचे पूजन झाले. यावेळी अध्यक्ष सचिन ठोकळ यांनी विश्वास दृढ करण्याचे माध्यम म्हणजे दिंडी सोहळा असे सांगितले. कोंडी गावातून सर्व बाल वारकऱ्यांनी विठ्ठल नामाचा गजर दिंडी काढली. दिंडी सोहळ्यासाठी मुख्याध्यापक उदय जाधव, मुकुंद मोरे, आकांक्षा जाधव व संतोष कासे यांनी परिश्रम घेतले.



### निर्मलाताई ठोकळ प्रशालेत आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा

**सोलापूर, दि. २७ जुलै-**

आषाढी एकादशी निमित्त श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात आषाढी दिंडी सोहळा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून संस्थेच्या संचालिका शिल्पा ठोकळ होत्या. दिंडी सोहळ्याचे उदघाटन उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून शोभा मिसाळ-शिंदे, सहायक पोलिस उपनिरीक्षक अलका शहापुरे, पोलिस हवालदार सुशीला नागरगोजे, पूनम बनसोडे तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, प्राचार्य डी.डी. गाजरे यांची उपस्थिती होती. पालक पाटील दांपत्याच्या वतीने सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना खाऊ वाटप केले. सूत्रसंचालन पूनम चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन पवार व्ही. आर यांनी केले. आयोजनाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा निर्मला ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, शिल्पा ठोकळ व सचिव भिकाजी गाजरे यांनी कौतुक केले.



### सांगोला महाविद्यालयात लोकमान्य टिळक, पवार यांची जयंती साजरी

**सांगोला, दि.२७ जुलै -**

सांगोला महाविद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी लोकमान्य टिळक यांच्या शैक्षणिक व सामाजिक तसेच अजित पवार यांच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय कार्याची माहिती दिली. कार्यक्रमासाठी प्र.कार्यालयीन अधीक्षक विलास माने यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती, पुण्यतिथी उपक्रम आयोजन समितीचे प्रमुख डॉ.जमीर तांबोळी, प्रशासकीय कर्मचारी बाबासो इंगोले, अवधूत कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# श्रावणारंभाला स्वयंभू नीलकंठेश्वर मंदिर सज्ज

### यंदा १३ ऑगस्टपासून श्रावण महिन्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २७ जुलै -**

रिमझिम पाऊस, डोंगररांगांवर हिरवीगार शाल आणि शिवनामाचा गजर... हे विलोभनीय दृश्य सध्या बार्शी तालुक्यातील पांगरी परिसरात पाहायला मिळत आहे. पवित्र श्रावण महिन्याच्या स्वागतासाठी गावातील स्वयंभू नीलकंठेश्वर मंदिर सज्ज झाले आहे.

श्रावण महिन्याची सुरुवात यंदा १३ ऑगस्टपासून होत आहे. पुणे-लातूर राज्यमार्गावर बालाघाटाच्या कुशीत वसलेले स्वयंभू श्री नीलकंठेश्वर मंदिर पर्यटकांचे आणि शिवभक्तांचे मुख्य





आकर्षण केंद्र बनले आहे. परिसरातील निसर्गरम्य वातावरण आणि मंदिराच्या जागृत इतिहासामुळे यंदा श्रावणात येथे भाविकांचा महापूर येण्याची शक्यता आहे. पौराणिक दाखल्यांनुसार माता सीतेचा शोध घेत असताना प्रभू श्रीराम चंद्र या भागात आले होते. येथील अद्भुत निसर्गसौंदर्याने मोहित होऊन त्यांनी शिवआराधना करण्याची इच्छा प्रकट केली. त्याच क्षणी पृथ्वीच्या पोटातून हे शिवलिंग प्रकट झाले, अशी आख्यायिका आहे. म्हणूनच या स्थानाला स्वयंभू नीलकंठेश्वर असे म्हटले जाते.

श्रावण महिन्यात बार्शी आणि परिसरातील नागरिक जेव्हा रामलिंग किंवा येडशीच्या दिशेने निसर्गाचा आनंद घेण्यासाठी निघतात, तेव्हा महामार्गालगतच असलेल्या या जागृत मंदिराला पहिली पसंती देतात. मंदिराच्या समोरूनच वाहणारी नीलकंठा नदी आणि सभोवतालची दाट झाडी मनाला शांतता देऊन जाते. यामुळेच कौटुंबिक सहली आणि शालेय सहलींसाठी हे हक्काचे ठिकाण बनले आहे.

१३ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या संपूर्ण श्रावण महिन्यात दर सोमवारी येथे विशेष महाआरती, अभिषेक, कीर्तन आणि हरिजागर आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. याशिवाय महाशिवरात्री, दसरा, गुढीपाडवा आणि प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला येथे मोठी यात्रा भरते.

### मंदिराची वैशिष्टे

**दरवर्षी सरकणारा नंदी:** मंदिराच्या उत्तरेला असलेल्या उंच डोंगरावर नंदीची मूर्ती विराजमान आहे. हा नंदी दरवर्षी एका गहूभर अंतराने शिवलिंगाच्या दिशेने पुढे सरकतो, अशी भाविकांची गाढ श्रद्धा आहे.

**पिंडीवर नैसर्गिक पाण्याचा पाझर:** हे मंदिर प्राचीन हेमाडपंथी स्थापत्यशैलीचे आहे. ३४ वर्षांपूर्वी राजस्थानी कारागिरांनी यावर देखणी कलाकुसर केली आहे. मंदिराच्या मुख्य शिवलिंगाला एक छोटे छिद्र असून, त्यातून चोवीस तास पिंडीवर पाण्याचा नैसर्गिक पाझर सुरू असतो, जो चमत्कार मानला जातो.

# फुले विद्यालयाच्या ६७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

### स्वरा जाधव व वेदिका ढवळे विद्यालयात प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २७ जुलै -**





प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत टेंभुर्णी येथील महात्मा फुले उच्च प्राथमिक विद्यालयातील तब्बल ६७ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. विद्यालयाने पुन्हा आपली दैदीप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे.

इयत्ता सातवीच्या ५६ पैकी ४२ विद्यार्थ्यांनी, तर इयत्ता चौथीच्या २५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली. विद्यालयाचे एकूण ६७ विद्यार्थी पात्र ठरल्याने संपूर्ण माढा तालुक्यात शाळेच्या या यशाचे कौतुक होत आहे. इयत्ता सातवी (उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांमध्ये ढवळे वेदिका २५८ (शाळेत प्रथम), बागवान जोया २०६, भांगे श्रेयश २०६, पानबुडे रिया २०४, मुकने अनघा २००, खडके अभ्युदय १९०, देशमुख स्नेहा १८६, महाडिक दिव्या १८४, खोटे अनन्या १८०, कुटे पल्लवी १८०, मगर प्रतीक्षा १७८, भानवसे ओंकार १७६, पवार संस्कृती १७६, दळवी उत्कर्षा १७६, कापरे अभिजीत १७२, मस्के प्रणाली १७२, नाळे समर्थ १७२, महाडिक सेजल १७०, गोरे ईश्वरी १६८, सुरवसे एकता १६६, शेळके ओंकार १६४, ढवळे सार्थक १६४, दळवी श्रेया १६४, सटाले स्वरूप १६४, आर राकेश के रमेश १६२, सोनवणे संस्कृती १६२, शिंदे वैष्णव १६२, हावळे संस्कृती १६०, खुळे अक्षरा १५८, गुजरे अर्णव १५८, येवले प्रणाली १५८, जाधव संग्राम १५६, देवकर शिवम १५४, कदम सानिका १४६, डरंगे स्वरा १४६, शिंदे वीर १४४, भानवसे सिद्धी १४२, गोंदील शिवतेज १४०, महाडिक सोहम १३६, घाडगे अद्विता, लोकरे नंदिनी १२६, ढोबळे साई १२४ असे गुण प्राप्त झाले आहेत.

इयत्ता चौथी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांमध्ये स्वरा जाधव २५८ (शाळेत प्रथम), अन्वित क्षीरसागर २४२, समृद्धी ननवरे २४२, श्रद्धा काळे २३८, वंश ढवळे २३६, शर्वरी तोडकर २१८, विराज सावंत २००, आनम पठाण १९६, स्वरांजली बंडगर १८८, संकेत कोकाटे १८४, अनुराधा पाटील १८२, संस्कृती ढगे १८०, ज्ञानेश घुले १७४, राजवीर खराडे १७०, विश्वनाथ काशेट्टी १६४, श्रेयश लोभे १६२, यशराज कदम १६२, ईश्वरी जगताप १५६, शिवतेज काळे १५६, मयुरी केचे १५४, राजवीर बरबडे १५४, करण इरळकर १४२, आदित्य शिंदे १४०, राजवीर कोळपे १४०,ऋषिकेश नाळे १२८ असे गुण प्राप्त झाले आहेत.

विद्यार्थ्यांना सचिन जाधव, प्रतीक कुटे, रेखा डोके, मीनल कुटे, काजल सावंत, सुगंधा भांगे, सुषमा कोरे आणि सोनाली भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. आमदार अभिजीत पाटील, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीत शिंदे, ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, विद्यालयाचे प्राचार्य विजय यादव, मुख्याध्यापक शोएब बागवान, शिक्षक-पालक संघ, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.



# करमाळ्यातील बॅकवॉटर भागात ८ तास वीज द्या

### माजी आमदार संजय शिंदे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २७ जुलै -**

करमाळा तालुक्यातील उजनी बॅकवॉटर परिसरातील शेतकऱ्यांना सलग ८ तास वीजपुरवठा उपलब्ध करून द्या. बहुप्रतिक्षित कुकडी उजनी उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण तात्काळ सुरू करावे, आदी मागण्या माजी आमदार संजय शिंदे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली.

मंत्र्यांची नुकतीच भेट घेतल्यावर संजय शिंदे यांनी करमाळा तालुक्यातील शेती, सिंचन आणि पाणीटंचाईच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. उजनी बॅकवॉटर परिसरातील शेतकऱ्यांना वीजपुरवठ्याच्या अपुऱ्या वेळेमुळे शेतीला पाणी देताना मोठ्या अडचणींना सामोरे जात असल्याचे मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या परिसरात सलग ८ तास वीजपुरवठाबाबत आवश्यक कार्यवाहीची मागणी केली.

कुकडी उजनी उपसा सिंचन योजना मार्गी लागल्यास तालुक्यातील २४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल, असेही त्यांनी सांगितले. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या मागण्यांची सकारात्मक दखल घेत वीज पुरवठा नियमित केला जाईल तसे आदेश संबंधित विभागाला दिल्याचे सांगितले. कुकडी उजनी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणासाठीही तात्काळ सुरुवात होईल असेही आश्वासन दिल्याचे माजी आमदार संजय शिंदे म्हणाले.

# सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत नेहरू विद्यालयाचे दोन विद्यार्थी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २७ जुलै -**

पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालय, रावगावेने शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा राखली आहे. राज्य पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती इयत्ता सातवी परीक्षेत शाळेचे अभिजीत बरडे व संतोष जाधव हे दोन विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण करून दर्जेदार मार्गदर्शन देण्याचा शाळेचा सातत्यपूर्ण प्रयत्न या यशामागे आहे. विद्यार्थ्यांचा नियमित सराव, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळे हे यश संपादन करता आले. यापूर्वीही शाळेने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. राष्ट्रीय आर्थिक





दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत ११ पैकी ९ विद्यार्थी पात्र, इयत्ता दहावीचा १०० टक्के निकाल, इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत एका विद्यार्थ्याची पात्रता, तसेच डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश यामुळे शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधिक अधोरेखित झाली आहे.

स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्यपूर्ण यशामुळे पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे विश्वासार्ह केंद्र ठरली आहे. यशस्वी विद्यार्थी अभिजीत पप्पू बरडे व शिवश्री संतोष जाधव यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे तसेच पालकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. आगामी काळात शिष्यवृत्ती आणि इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यापेक्षाही अधिक उज्ज्वल यश संपादन करण्याचा शाळेचा निर्धार असल्याचे मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष एकनाथ काकडे, सचिव भैय्यासाहेब काकडे, तसेच मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समिती, रावगावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.

# मोडनिंब शाळेसमोरील चिखलयुक्त खड्ड्याची दुरुस्ती

### गैरसोय दूर; मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांची मदत

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २७ जुलै -**

मोडनिंब (ता.माढा) येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रवेशद्वारासमोर पावसात मोठ्या प्रमाणात चिखलयुक्त डबके साचले होते. परिणामी विद्यार्थी, पालक व शिक्षकांची मोठी गैरसोय होत होती. मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांनी स्वखर्चातून हा खड्डा भरुन घेत सर्वांची समस्या सोडवली.

खडी-मुरूम टाकल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी सुलभ रस्ता उपलब्ध झाला. याबद्दल पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत गिड्डे यांचे कौतुक केले. यावेळी प्रशांत गिड्डे म्हणाले, '' माझी शाळा, गावची शाळा या भावनेतून प्रत्येकाने जिल्हा परिषद शाळांकडे लक्ष द्यावे. राजकारण बाजूला ठेवून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण व उत्तम वातावरण मिळावे, यासाठी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत.''

#### सामाजिक कामांसाठी पुढेही तत्पर

जिल्हा परिषद शाळा या गावाच्या विकासाचा पाया आहेत. विद्यार्थ्यांना चांगले शैक्षणिक वातावरण मिळावे, ही जबाबदारी आहे. गावातील अशा सामाजिक कामांसाठी पुढेही कायम तत्पर राहीन.

**- प्रशांत गिड्डे, मनसे जिल्हाध्यक्ष.**

#### गिड्डे यांच्या सहकार्याबद्दल आभार

पाऊस पडला की शाळेच्या प्रवेशद्वारासमोर चिखल साचत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना मोठी अडचण निर्माण होत होती.. गिड्डे यांनी स्वखर्चातून खडी-मुरूम टाकल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी मार्ग तयार झाला. त्यांच्या सामाजिक उपक्रमाबद्दल यांचे आभार.

**- महेश पुरवत, पालक.**

# श्रीकांत वाडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस तसेच माजी पंचायत समिती सदस्य श्रीकांत वाडकर यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त लोकरत्न कै. श्रीकांत (बप्पा) वाडकर प्रतिष्ठानतर्फे समाजोपयोगी उपक्रम केले.

कार्यक्रमाची सुरुवात कासेगाव-उळे मार्गावर ५०० वृक्षांच्या वृक्षारोपणाने झाली. वृक्षारोपणाचा प्रारंभ आमदार सचिन कल्याणशेट्टी व संभाजी जाधव यांच्या हस्ते झाला. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मुख्य कार्यक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष, सरपंच यशपाल वाडकर यांनी श्रीकांत वाडकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. गावाच्या सर्वांगीण विकासासंदर्भात आमदार कल्याणशेट्टी यांना निवेदन दिले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्रीकांत वाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन केले.



यावेळी कासेगाव जिल्हा परिषद शाळेतील प्रज्ञाशोध परीक्षेत यश संपादन केलेल्या ११ गुणवंत विद्यार्थी , विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तरुणांचा सन्मान झाला. यामध्ये लक्ष्मण भोजने (रुग्णसेवा), प्रांजल चौगुले (शैक्षणिक), प्रज्वल जोशी (शैक्षणिक), मेघराज सरसंबे (क्रीडा) आणि सिद्धार्थ कुलकर्णी (शैक्षणिक) यांचा समावेश होता. मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा सुमारे १०० ग्रामस्थांनी लाभ घेतला. तसेच आयुष्मान भारत कार्ड नोंदणी व वितरण, एस.टी. सवलत कार्ड नोंदणी शिबिरालाही प्रतिसाद मिळाला. कुलश्रेष्ठ महिला बचत गटातर्फे महिलांना ११०० रोपांचे वाटप केले.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच मतदारसंघातील ८० टक्के रस्त्यांची कामे पूर्णत्वास आल्याचे सांगितले. भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी गंगेवाडीचे सरपंच प्रशांत जाधव, उळेच्या सरपंच अंबिका कोळी, संभाजी जाधव, मधुकर चिवरे, मुळेगावचे उपसरपंच शिवराज जाधव, मल्लिनाथ येणगुरे, विलास वाडकर, उपसरपंच शहाजहन शेख, ज्ञानेश्वर रोकडे, जालिंदर गायकवाड, सत्यपाल वाडकर, प्रकाश हेडे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप क्षीरसागर यांनी तर ज्ञानेश्वर कदम यांनी आभार मानले.

# मळोली येथे मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त १०१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ जुलै -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मळोलीत जि.प. सदस्य चंद्रकांत जाधव यांच्या वतीने रक्तदान शिबिर घेतले. शिबिरात १०१ जणांनी रक्तदान केले.

शिबीराचे उद्घाटन माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते झाले. पिलीव गटातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. माळशिरस तालुका भाजप मंडल अध्यक्ष नितीन मोहिते, पिलीव गणाचे सदस्य शिवराज पुकळे, पिलीव शहराध्यक्ष प्रमोद भैस, माळशिरस तालुका उपाध्यक्ष डॉ निलेश कांबळे, फळवणीचे माजी सरपंच सचिन पाटील उपस्थित होते.



रक्त संकलन सोलापूरच्या सिद्धेश्वर रक्तपेढीने केले. याच दिवशी मुख्यमंत्री फडवणीस यांनी मळोली गावास भेट दिली. यावेळी त्यांचा सन्मान चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रकांत जाधव यांनी आयोजित केलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. विकास कामांसाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# पावसाने दिली ओढ; बेंदुर सणावर दुष्काळाचे सावट

### बळीराजा चिंतेत, कॅनॉलखालील पिके अडचणीत

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. २७ जुलै-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात यंदा पावसाने चांगलीच ओढ दिल्यामुळे बळीराजा चांगलाच चिंतेत आहे. पिके संकटात असून यंदाच्या बेंदुर सणावरही दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे.

जुन महिन्यात झालेल्या थोड्याफार पावसावर अजुन पुढे चांगला पाऊस होईल या अपेक्षेने बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी या गावातील शेतकऱ्यांनी बाजरी, मका ,कडवळ ह्या पिकांची पेरणी केली. पण या भागात अद्यापपर्यंत समाधानकारक पाऊस पडलाच नाही. सध्या तर पावसाने चांगलीच ओढ दिल्यामुळे ही पेरलेली पिके जळून जाण्याची धास्ती लागली आहे. सध्या पावसाने या भागात चांगलीच ओढ दिली आहे.तर सध्या धरण क्षेत्रात चांगला पाऊस पडल्यामुळे निरा-उजवा कॅनॉलला पाणी आले आहे. पण अद्यापपर्यंत या भागातील फाटयांना पाणी सोडलेच नाही. यामुळे या भागातील कॅनॉलखालील भागातील पिके सुद्धा अडचणीत आहेत.

यंदा म्हणावा तसा पाऊस न झाल्यामुळे ऊस लागवडीचे क्षेत्र कमालीचे घटले आहे. पावसाळा सुरू होऊन दोन महिने झाले तरीही अद्याप म्हणावा तसा पाऊसच पडला नाही. यामुळे हा भागाची सध्या दुष्काळाकडे वाटचाल सुरु आहे.

#### बाजारपेठेतही मंदीचे वातावरण

सोमवारी बेंदुर सण साजरा करण्यात येणार आहे. पण यंदा या सणावर दुष्काळाचे सावट दिसत आहे. जनावरांना सजवण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य घेण्यासाठी पिलीव बाजारपेठेत अद्यापही गर्दी पाहावयास मिळत नाही. दुष्काळामुळे निरुत्साह दिसत आहे.



CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## समीर बागवान यांचा आदर्श वाहक पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ जुलै -**

अक्कलकोट बस आगारातील वाहक समीर बागवान यांचा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे आदर्श वाहक म्हणून सन्मान झाला. अन्नछत्र मंडळाचा वर्धापन दिन व गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणीजनांचा सत्कार




झाला. यावेळी बागवान यांचा सन्मान झाला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले, नगरसेवक महेश इंगळे, गायिका आर्या आंबेकर, नगरसेवक महेश हिंदोळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, पंचायत समितीचे सदस्य विनोद मोरे, आप्पासाहेब किवडे, सद्दाम शेरीकर, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे आदी यावेळी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...

### युवासेनेच्या उपजिल्हा युवा अधिकारीपदी गणेश लंगोटे

**बार्शी, दि. २७ जुलै-**



शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात सोलापूर जिल्ह्यातील युवासेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर झाल्या आहेत. युवासेना उपजिल्हा युवा अधिकारीपदी गणेश लंगोटे यांची निवड झाली आहे. युवासेना मध्यवर्ती कार्यालयाने ही माहिती दिली. नियुक्तीनंतर गणेश लंगोटे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पक्षाच्या विचारधारेचा प्रसार करत ग्रामीण भागातील युवकांना संघटित करण्यासाठी तसेच जनतेच्या प्रश्नांवर काम करणार असल्याचे सांगितले.

### बार्शी तालुका युवा अधिकारीपदी स्वराज्य क्षीरसागर

**वैराग, दि. २७ जुलै-**



शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने आणि युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने जिल्ह्यातील युवासेनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर झाल्या. बार्शी तालुक्यातील मुंगशी (आर)चे स्वराज्य क्षीरसागर यांची बार्शी तालुका युवा अधिकारी पदी निवड केली आहे. नियुक्ती पत्रकानुसार, केवळ तालुकाप्रमुखच नव्हे, तर बार्शी तालुक्यातील इतरही अनेक निष्ठावंत आणि सक्रिय तरुण कार्यकर्त्यांना युवासेनेमध्ये विविध महत्त्वाच्या पदांची जबाबदारी देऊन पक्षाने त्यांचा गौरव केला आहे.



### सातत्यपूर्ण सामाजिक उपक्रमांबद्दल भोसले पिता-पुत्रांचा दोन ग्रामपंचायतींतर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि. २७ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ,अक्कलकोटचा वर्धापन दिन व श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत असल्याबद्दल चपळगाव व बावकरवाडी ग्रामस्थ-ग्रामपंचायततर्फे अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचा मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. सरपंच वर्षा भंडारकवठे, सामाजिक कार्यकर्ते सिद्धाराम भंडारकवठे, गणेश कोळी, ग्रामपंचायत अधिकारी विनोद डावरे, सीए ओंकारेश्वर उटगे, ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर वाले, लिपीक उमेश सोनार, विजय कोरे, धर्मेंद्र दुलंगे, प्रकाश बुगडे, रतन कोरे, विष्णुवर्धन कांबळे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या कार्यामुळे अक्कलकोटचे नाव जगभरात पोहोचले आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त चालणारे कार्यक्रम तरुणांसाठी दिशादर्शक आहेत. परिणामी सामाजिक बांधिलकीतून भोसले पिता-पुत्रांचा सन्मान आम्ही ग्रामस्थ करीत असल्याचे वर्षा भंडारकवठे यांनी सांगितले. भविष्यातही सेवा, संस्कार आणि समाजहिताचे उपक्रम अधिक जोमाने सुरू राहतील, असे सत्काराच्या उत्तरात संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

### बावची येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**मंगळवेढा, दि. २७ जुलै-**

बावची येथे दारुच्या नशेत तरुणाने झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. २२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता महेश भोसले (रा.बावची) यांना गावातील एका व्यक्तीने फोन करुन सांगितले की, तुझा मावस भाऊ विश्वनाथ सुतार याने जायाप्पा चव्हाण यांच्या शेतातील लिंबाच्या झाडास गळफास घेतला आहे. लागलीच नातेवाईकांसह घटनास्थळी गेले असता शर्ट व पँटच्या सहाय्याने मल्लिकार्जून सुतार (वय ३५) याने दारुच्या नशेत गळफास घेवून मयत झाल्याचे निदर्शनास आले. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# आषाढी वारीत ३२ लाख भाविकांची विक्रमी गर्दी

### एआय तंत्रज्ञानाचा वापर करून मोजणी

### सोलापूर ग्रामीण पोलिसांची वाखाणण्याजोगी कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ जुलै -**

पंढरपूर येथील आषाढी वारीत यंदा सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने सुरक्षेसोबतच गर्दी व्यवस्थापनात ऐतिहासिक आणि अत्याधुनिक टप्पा गाठला आहे. सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली यंदाच्या वारीत सेंटियंट लॉजिक्स या तंत्रज्ञान संस्थेच्या मदतीने अत्याधुनिक 'कॉग्निटिव्ह व्हिज्युअल ह्युमन न्यूरल एआय' तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर करण्यात आला. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने २४ ते २६ जुलै दरम्यान पंढरपुरात दाखल झालेल्या ३१ लाख ९८ हजार १२९ (सुमारे ३२ लाख) भाविकांची अचूक नोंद केली आहे.

एआय प्रणालीने केलेल्या अचूक मोजणीनुसार तीन दिवसांत पंढरपुरात २४ जुलै रोजी ६ लाख ७५ हजार २७४ वारकरी आले. २५ जुलै (आषाढी एकादशी) रोजी १८ लाख ९६ हजार ५७३ आणि २६ जुलै रोजी ६ लाख २६ हजार २८२ वारकरी, असे एकूण मिळून ३१ लाख ९८ हजार १२९ वारकऱ्यांची नोंद करण्यात आली. आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजेच दि.२५ जुलै रोजी सर्वाधिक १९ लाख



#### नागरिकांच्या गोपनीयतेचे तंतोतंत पालन

मोजणीदरम्यान भाविकांच्या गोपनीयतेची पूर्ण दक्षता घेण्यात आली. भारताचा 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट' (डीपीडीपी) आणि जीडीपीआर नियमावलीचे तंतोतंत पालन केले. कोणत्याही व्यक्तीचा फोटो किंवा वैयक्तिक माहिती सर्व्हरवर सेव्ह केलेली नाही. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा भविष्यातील गर्दी व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होईल.

**- अतुल कुलकर्णी, जिल्हा पोलीस अधीक्षक.**

वारकऱ्यांनी पंढरपुरात प्रवेश केल्याचे स्पष्ट झाले आहे.पंढरपूर आषाढी वारी सोहळा हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक सोहळ्यांपैकी एक आहे. लाखो वारकऱ्यांची सुरक्षितता आणि नियोजनासाठी गर्दीचा अचूक अंदाज असणे आवश्यक असते. पारंपरिक पद्धतींमधील त्रुटी दूर करून यंदा सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने एआय तंत्रज्ञानाचा वापर करून सुमारे ३२ लाख युनिक भाविकांची अचूक नोंद केली.

#### दुबार मोजणी टाळणारे आधुनिक एआय तंत्रज्ञान

पारंपरिक कॅमेरा पद्धतीमध्ये एकच व्यक्ती विविध कॅमेऱ्यांसमोर आल्यास आकडेवारी फुगण्याची शक्यता असते. मात्र, सोलापूर ग्रामीण पोलिसांनी वापरलेल्या एआय प्रणालीने ही दुबार नोंद पूर्णपणे टाळली. मुख्य प्रवेशद्वारांवर एआय आयडेंटिटी: सरगम चौक ते इंदिरा गांधी चौक, तीन रस्ता ते दगडी पूल, गोपाळपूर पूल, सावरकर चौक व मिलिटरी हॉस्टेल आणि सांगोला चौक एन्ट्री चा पाचवा मुख्य मार्गांवर खास एआय कॅमेरे बसवण्यात आले होते. व्यक्तीचा चेहरा, कपड्यांचा रंग आणि टोप्यांचा ताळमेळ लावून प्रत्येक वारकऱ्याची एक 'युनिक एआय ओळख' तयार केली जात होती.

#### क्रॉस-कॅमेरा ट्रॅकिंग व पुनर्प्रवेश पडताळणी

वारकरी शहरात फिरताना इतर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी त्यांना न मोजता एकाच ओळखीने ट्रॅक केले. तसेच शहराबाहेर जाऊन पुन्हा प्रवेश करणाऱ्या भाविकांची जुन्या नोंदीशी पडताळणी करून दुबार मोजणी रोखण्यात आली.

## नदी, कालवे दुथडी भरून; खरीप मात्र वाया!

### माळशिरस तालुक्याला मोठ्या पावसाची गरज; आता रब्बीवर आशा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ जुलै-**

यावर्षी माळशिरस तालुक्याला पावसाने हुलकावणी दिली आहे. अद्याप एकही मोठा पाऊस झाला नाही. परिणामी बोअरवेल, विहिरी अद्यापही कोरड्याच आहेत. तालुक्यातील पाझर तलाव तळाला गेले आहेत. दुसरीकडे धरण क्षेत्रात पाऊस झाल्याने वीर, भाटघर, निरा देवधर ही धरणे शंभर टक्के भरली आहेत. वीर धरणातून निरा नदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले आहे. परिणामी तालुक्यात नदी, कालव्यात दुथडी भरून पाणी वाहत आहे. तर दुसरीकडे पावसाअभावी पेरण्या न झाल्याने किंवा पिके संकटात आल्याने खरीप वाया जाणार आहे.

नीरा नदी ही माळशिरस तालुक्यातील मुख्य नदी आहे. नीरा नदी तसेच नीरा उजवा कालवाही पूर्ण क्षमतेने वाहत आहे. पाऊस नसल्याने शेतकरी कालव्याचे पाणी घेऊन पिके वाचवत आहेत. माळशिरस तालुक्यात यंदा वरूणराजाने हुलकावणी दिली आहे. जेमतेम पावसावर खरिपातील बाजरी, मका, सोयाबीन,





एकीकडे नीरा नदी दुथडी भरून वाहत आहे. दुसरीकडे गिरझणी तलावातील पाणी संपत आहे.

तूर आदी पिके थोड्या प्रमाणावर पेरली आहेत. त्यांनीही पावसाने ओढ दिल्याने माना टाकल्या आहेत. बळीराजा मात्र आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. अधून-मधून येणाऱ्या भरपूर पावसाने शेतामध्ये तण मात्र उगवले आहे. परिणामी मेहनतीचा खर्च वाढला आहे. लवकरच रब्बी हंगामाला सुरुवात होत असून आता रब्बीची तयारी करावी लागत आहे.

तालुक्यात निमगाव, फोडशिरस, खंडाळी, गिरझणी, कोथळे येथे पाझर तलाव आहेत. या तलावात कालव्याचे पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. परिणामी परिसरातील विहिरी, बाअेरवेल यांना पाणी येऊन जनावरांची आणि पिण्याच्या पाण्याची समस्या सुटेल. पावसाने ओढ दिल्याने जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला असून चारा महागला आहे. तालुक्यात पशुधन मोठ्या प्रमाणावर असल्याने बाहेरून चारा मागवण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या मागणीकडे प्रशासनाने व लोकनेत्यांनी लक्ष देऊन नदीतून वाहून जाणारे

#### खते, बियाण्यांची विक्री ठप्प

यंदाही खते, बियाण्याच्या किमतीत वाढ झाली आहे. पाऊस नसल्याने खत व बियाण्यांना ग्राहक नाही. अद्याप दहा टक्केही विक्री झाली नाही. शेतकरी येतात चौकशी करून जातात. पावसावर सर्व अवलंबून आहे.

**- राजकुमार गुळवे, खत-बियाणे विक्रेते, अकलूज.**



## तात्काळ उपचाराने ६ वारकऱ्यांना जीवनदान

### आषाढी यात्रेत हृद्यविकाराचा झटका; पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाकडून तत्परता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२७ जुलै -**

आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूरात आलेल्या भाविकांना उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर उत्तम आरोग्य सेवा देण्यात आली. तीव्र हृदयविकाराच्या झटका आलेल्या ६ वारकऱ्यांना तात्काळ उपचार दिल्याने त्यांचे जीव वाचविण्यात यश आल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार सरडे यांनी दिली.

दिगंबर जाधव (वय ६०, रा. हदगांव, जि.नांदेड), पार्वती गोडगे (रा. मालेगाव, जि. सोलापूर), कमलाबाई बुगडे (वय ६० रा. मोहगाव, जि.वर्धा), भैरूनाथ असकुले (वय ३४, रा. कळंब, जि.धाराशिव), छबू अकोलकर (वय ७३, रा. अकोला), महेश कदम (वय ५१, रा. तुळजापूर) या भाविकांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला होता. त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे दाखल केले होते.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्याचे आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक डॉ. भगवान पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, उपजिल्हा रुग्णालय पंढरपूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार सरडे, आयसीयू नोडल अधिकारी डॉ. महेशकुमार सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली फिजिशियन डॉ. सीमा इंगोले यांनी उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे संबंधित ६ रुग्णाचा इसीजी काढून तातडीने आयसीयूमध्ये दाखल केले.

सदरील ६ रुग्णांना वेळेत थ्रोम्बोलायसिस उपचार देण्यात आले. उपचारामुळे रक्तवाहिनीतील अडथळा दूर करण्यात मदत झाली. त्यानंतर आवश्यक वैद्यकीय उपचार व देखरेखीखाली रुग्णाची प्रकृती सुधारली असल्याचे डॉ. विजयकुमार सरडे यांनी सांगितले.

## बार्शी तालुक्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याची अनोखी वारी

### काटेगावच्या दिंडीत मुस्लिम बांधवांसह १५० वारकऱ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ जुलै -**

बार्शी तालुक्यातील काटेगांव येथून प्रथमच आयोजित आषाढी पायी दिंडीने हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला. १५० स्त्री-पुरुष वारकऱ्यांच्या सहभागाने निघालेल्या या दिंडीत मुस्लिम बांधवांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक ऐक्याचा अनोखा आदर्श निर्माण केला.

दि. २१ जुलै रोजी ग्रामदैवत



श्री हनुमान मंदिर व सय्यद बादशहा दर्ग्याचे दर्शन घेऊन दिंडीने पंढरपूरकडे प्रस्थान केले होते. दिंडीचे आयोजन गावातील ज्येष्ठ समाजसेवक तथा पुणे येथील उद्योजक लायकअली पटेल यांनी केले होते. संपूर्ण दिंडीचे नियोजन पुणे येथील उद्योजक जलाल पटेल यांनी केले. एवढेच नव्हे तर त्यांनी स्वतः वारकऱ्यांसोबत काटेगाव ते पंढरपूर असा पायी प्रवास करुन सर्व काळजी घेतली. दिंडीचा संपूर्ण आर्थिक भारही त्यांनी स्वतः उचलला.

दि. २६ जुलै रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणींचे दर्शन घेऊन परतीच्या प्रवासात दिंडी कानिफनाथ मंदिर, गाताचीवाडी येथे महाप्रसादासाठी थांबली. यावेळी उद्योजक रवी राऊत व बाळासाहेब तातेड यांनी दिंडीस सदिच्छा भेट दिली. तसेच सर्व वारकरी व जलाल पटेल यांचे अभिनंदन केले. पुढील वर्षी बार्शी मुक्कामी दिंडीसाठी भोजन व्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. बार्शी तालुक्यातील या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. वारीचे पहिले वर्ष संस्मरणीय ठरले.

## पंढरपूर येथे अपर पोलीस अधीक्षक कार्यालय मंजूर

### माजी आमदार प्रशांत परिचारक; ५ वर्षांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपुर,दि.२७ जुलै -**

पंढरपूर येथे अप्पर पोलिस अधीक्षक कार्यालयाबाबत ५ वर्षांपासून पाठपुरावा सुरु होता. अखेर ती मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली असल्याची माहिती माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिली.

परिचारक यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. वाढती लोकसंख्या आणि भौगोलिक विस्तार पाहता पंढरपूर येथे स्वतंत्र अपर पोलीस अधीक्षक कार्यालय आणि उपमुख्यालय अत्यंत गरजेचे होते. यासाठी गेल्या ५ वर्षांपासून राज्य शासन व गृह विभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता. दक्षिण आणि पश्चिम सोलापूर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पंढरपूरला स्वतंत्र अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय स्थापण्यास गृह विभागाने मंजुरी दिली आहे. २४ जुलै रोजी शासन निर्णय निर्गमित केल्याचेही परिचारक म्हणाले. निर्णयाबद्दल परिचारक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री गोरे, तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्विनी सातपुते, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे आणि सध्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचे आभार मानले.

#### गुन्हेगारी व अवैध वाळू उपशावर बसणार वचक

पंढरपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत पंढरपूर, मंगळवेढा, अकलूज उपविभागांमधील ११ पोलीस ठाणी जोडली जातील. यामुळे पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण, पंढरपूर मंदिर सुरक्षा, करकंब, सांगोला, मंगळवेढा, अकलूज, माळशिरस, नातेपुते व वेळापूर परिसरातील पोलीस प्रशासनावर गतिमान नियंत्रण राहील.



## गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त अक्कलकोटात विद्युत रोषणाई

### उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात;महाप्रसादालयासह महत्त्वाच्या ठिकाणी झगमगाट

**अक्कलकोट, दि. २७ जुलै -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापन दिन आणि श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. महाप्रसादालय, परिसरातील विविध मंदिर, शिवस्मारक, यात्री निवास आदी ठिकाणी विद्युत रोषणाई केली आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचे मार्गदर्शन व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडत आहे. बुधवार दि.२९ जुलै रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त सकाळी ७ ते ९ पर्यंत महाप्रसादगृह येथे श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० पर्यंत नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा, सकाळी १० वा. श्रींची महाआरती व महानवैद्य दाखविण्यात येणार आहे. केंद्रीय नागरी उड्डाण राज्य मंत्री मुरलीधर मोहळ, पालकमंत्री जयकुमार गोरे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजीमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, सी.ए. महेश गावस्कर, यासाचे विश्वस्त जनार्दन थोरात, सचिन सांबरेकर, पालखी परिक्रमा संयोजक बेळगावी, ललिता वीर, आगासखिंड नाशिक देणगीदार, यांच्या हस्ते व उपस्थितीत श्रींची महाआरती व महानवैद्य होत आहे.

महाआरतीनंतर सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद, सायं ४ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी निघणार आहे. न्यासाच्या सुशोभित रथाच्या भव्य मिरवणूकीचा प्रारंभ होणार आहे.

यावेळी दिंड्या व वाद्यासह नादब्रह्म पुणे व आराध्या चुनाभट्टी, मुंबई या ढोलवादन आणि अमोलराजे लेझीम संघाचा शानदार खेळ होणार आहे. आमदार शेखर निकम- चिपळूण, भरत मित्र मंडळ पुणे अध्यक्ष बाळासाहेब दाभेकर, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजीराजे पवार, सो.म.पा. नगरसेवक अमोल शिंदे आदींच्या हस्ते मिरवणुकीचा प्रारंभ आहे.